
डॉ. स्मिता दामले

# प्राचीन भारतातील दोन प्रज्ञावंत पांथस्थ





हयुएन त्संग

अलबेरुनी

## प्राचीन भारतातील

# दोन प्रज्ञावंत पांथस्थ

## हयुएन त्संग

## अलबेरुनी

डॉ. स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

# प्राचीन भारतातील
# दोन प्रज्ञावंत पांथस्थ
# ह्युएन त्संग
# अलबेरुनी

## लेखिका- डॉ. स्मिता दामले
Emails:
suhasdamle341@hotmail.com
suhas.smita48@gmail.com
Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव कळवा)

**प्रकाशन : १४ एप्रिल २०२५**


©esahity Pratishthan®2025

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फ़े आज डॉ. स्मिता दामले यांचे चौदावे पुस्तक, “दोन प्रज्ञावंत पांथस्थ” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची आणि दर्जेदार लेखकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळया अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहाबरोबरच त्यांचा काचांची नक्षी हाही कथा संग्रह वाचकांना आवडला. त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त”

हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक हे. ई साहित्य तर्फ़े डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते “इतिहासाची विलग पाने”. इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. पाचही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना. सल्तनत ए दिल्ली हे सहावे पुस्तकही याला अपवाद नाही. त्यांचे आठवे पुस्तक कावेरीचा दुभंग: लाही वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

डॉ स्मिता दामले यांना राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन

वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय, व्यक्तिगत चरित्र प्रसिध्द आहे.

“असं घडलं होतं” व “अस्ताचलावरील तारे” या ४५० पानी व दोनशे पानी पुस्तकात त्यांनी भारताच्या पारतंत्र्याच्या ग्रहण दशेतलं वास्तव मांडलं आहे. ७५० वर्षांच्या साडेसातीतून हे राष्ट्र कसं बाहेर पडलं याचा हा इतिहास आहे. युगानुयुगे, शतकानुशतके, सर्वांना यातून काय घडलं होतं व का घडलं होतं हे सांगण्याचा हा प्रयत्न केला.

ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली चौदा मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य दिली ही आमच्यासाठी डॉ. स्मिता दामलेंची खरी ओळख.

ई साहित्य प्रतिष्ठान डॉ. स्मिता दामले यांचे कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**

# प्राचीन भारतातील

# दोन प्रज्ञावंत

# पांथस्थ.

# हयुएन त्संग,

# अलबेरुनी.

**डॉ.स्मिता दामले.**

# तथागतांचे भारतीय सुपुत्र
# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या
# स्मृतीस वंदन.
# १४ एप्रिल २०२५.



## डॉ. स्मिता दामले..

suhasdamle341@hotmail.com

# प्रस्तावना

खनिज साधनसंपत्तीने समृद्ध, गोड जळाने तुडुंब भरून वाहणाऱ्या नद्यांच्या काठची पाचूसारखी हिरवीगार कुरणे, उंच पहाड, दाट जंगले, विविध वनस्पति, हिंस्र श्वापदं, मरूभूमी, हिरे-माणिक-पाचू-सोनं यांच्या खाणी, या वैभवाने भरलेल्या या समुद्र वलयांकित जंबुद्वीपात शतकानुशतके दूरदूरचे पांथस्थ येत राहिले. प्राचीन काळापासून हे वैभव स्वदेशात न्यायला इथे आक्रमणं झाली. इथल्या गणित, वैद्यकशास्त्र, खगोलशास्त्र, पंचागशास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य यांचीही कीर्ती जगभर पोचली होती. जसे दौलतीच्या लोभाने आले, तसेच काही परकिय प्रज्ञावंतही या बौद्धिक श्रीमंतीच्या शोधात आले. त्यांनी भारतभेटीच्या आपल्या आठवणी लिहून ठेवल्या.

या जंबुद्वीपाला भेट देऊन गेलेले आणि ग्रंथरूपाने विख्यात झालेले प्राचीन पांथस्थ म्हणजे पहिला मेगास्थेनीस जो ग्रीक सत्ताधीश सेल्युकसचा वकील म्हणून चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारी इसवीसनपूर्व ३०२ मध्ये भारतात आला. त्याने इंडिका नावाचं पुस्तक लिहिलं. ख्रिस्तपूर्व काळात ४११ ते ४०५ मध्ये चीनमधून बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी फा हाइन नावाचा अभ्यासक भारतात आला. गुप्त साम्राज्याचा त्याने अनुभव घेतला आणि आपल्या आठवणी लिहून ठेवल्या. त्यानंतर चीनमधून आलेला प्रवासी म्हणजे, हयुएन त्संग. इ. स. ६३० ते ६४५ इतकी वर्षे बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी तो भारतात राहिला. या १५ वर्षांमध्ये, अनेक राजांच्या भेटीला त्या त्या प्रांतात तो गेला आणि जे बघितलं ते ते सर्व शब्दरूपाने चित्रित करणारा बहुमौलिक स्मृतिग्रंथ Si Yu KI म्हणजे पाश्चिमात्य देशाचा इतिहास त्याने लिहिला. त्याने

गांधार, तक्षशीला, सिंध, काश्मीर, पंजाब, कपिलवस्तू, कुशिनगर, सारनाथ, बुद्धगया, ओरिसा, बंगाल, नालंदा, कांचीपुरम, दख्खन, माळवा, सौराष्ट्र, उज्जैयिनी, या राज्यांना भेटी दिल्या. कान्यकुब्जला - कनोजला सम्राट हर्षवर्धनाच्या दरबारातही तो गेला. त्याच्यामुळे आपल्याला सम्राट हर्षवर्धनाची कारकीर्द समजली. भारतातील आचार- विचार- पेहराव- चालीरीती, सामाजिक-आर्थिक परिस्थिती कळल्या. भारतातून परत जातांना नालंदामधील अनेक ग्रंथ, प्रतिकृती करून आणि काही अनुवादीत करून नेले.

इ. स. १००१ साली, गझनीचा महंमद भारतातील दौलत लुटायला अनेक वेळा आला. त्याच्या बापाने, सुबक्तगिनने भारतावर आक्रमण करण्यासाठी आपल्या हयातीत उत्तम रस्ते तयार करून ठेवले होते. सुबक्तगीन स्वत: भारतात राजा जयपालशी लढायला येऊन गेला होता. त्याने भारतातील राजे, निसर्गाची मुक्त हाताने केलेली उधळण, सांपत्तिक ऐश्वर्य पाहिलं होतं. सुलतान महंमदबरोबर राजकैदी म्हणून अलबेरुनी हा प्रकांड विद्वान भाषापंडित, वैज्ञानिक, गणिती, बुद्धीचा सागर, भारतात आला आणि भारतातून परत गेल्यावर त्याने आठवणींच्या रूपाने भारतीय जगताची सर्वांगीण माहिती सांगणारे किताब-अल-हिंद, तारीख अल हिंद, तहकिक-ई-हिंद ग्रंथ लिहिले. गणित, खगोलशास्त्र, संस्कृती, आर्थिक विषयांची ओळख करून दिली.

त्यानंतर मार्को पोलो हा व्हेनीसचा व्यापारी सुप्रसिद्ध पांथस्थ ऐतिहासिक दृष्टीने खूप गाजला. त्याने जगाचा प्रचंड मोठा भूभाग पायाखाली घातला. त्यानेही आपल्या आठवणी The Travels of Marco polo मध्ये लिहून ठेवल्या. मृत्यूशय्येवर असतांना तो म्हणाला की मी जे बघितलं त्यातील अर्धसुद्धा लिहू शकलो नाही. इब्न बतुटा हा फिरस्ता फिरंगी असाच मोरोक्कोहून

निघाला, दानत्व आणि क्रौर्य या दोन्ही मानसिकतेचा सुलतान महंमद तुघलकाच्या काळात भारत भेटीला आला. पुढे १७ व्या शतकात मुगल बादशहा शहाजहानच्या काळात आणखी एक व्हेनीसहून आलेला मनुशी हा भारतातच राहिला..त्याने शहाजहानचा दरबार, त्याची मुलं, राजकारण, औरंगजेब यांचं व्यवस्थित वर्णन केलं आहे. Storia do Mogor हा भारताचं विस्तृत वर्णन करणारा ग्रंथ लिहिला. डॉक्टर असल्यामुळे आणि बादशहाचा विश्वास असल्यामुळे त्याला जनानखान्यात प्रवेश मिळत असे. त्यातील बायकांची मानसिकता त्याने पाहिली. शिवाजी महाराजांना त्याने प्रत्यक्ष पाहिलं आणि त्यांचं वर्णन लिहून ठेवलं. त्यावेळी

शहाजहानच्या दरबारात डॉक्टर म्हणून फ्रान्समधला एक डॉक्टर बर्निएर यानेही मुघल दरबार खूप जवळून पाहिला. मयूर सिंहासनाचं वर्णन लिहून ठेवलं. शहाजहानचा आवडता पुत्र, दारा शुको याचा तो डॉक्टर होता, ते सर्व शब्दरूपाने लिहून ठेवलं. Travels In the Mogul Empire हे त्याचं पुस्तक खूप गाजलं०

या सर्वांच्यात सर्वश्रुत झाले ते हयुएनत्संग आणि अलबेरुनी. या दोघांनी भारतीय आचार-आहार-विचार-पेहराव-श्रद्धा-सामाजिक-आर्थिक-वैद्यक- खगोलशास्त्र-तसंच भाषाशास्त्र, गणित-भूगोल संस्कृत साहित्य, या हिंदूंच्या जीवनमानाच्या प्रत्येक अंगाची माहिती आपल्या वहीत नोंद करून ठेवली. आणि मायदेशी परत गेल्यावर त्या आठवणी लिहून काढल्या. या दोघांच्या भेटीच्या काळात सन ६५० ते सन १०१७ एवढ्या काळाचा फरक आहे. हयुएन त्संग ७ व्या शतकात आले, जेव्हा गौतम बुद्धांच्या आणि सम्राट अशोकाच्या निर्मितीच्या स्तूप-विहार-चैत्याच्या खुणा शिल्लक होत्या आणि

नंतर ५०० वर्षांनी अलबेरूनी भारतात आले तेव्हा बौद्ध धर्म अस्तंगत होऊ लागला होता. हिंदू धर्म परत पुनर्जीवित झाला होता. पण मुस्लिमांनी सत्ता काबीज केली नव्हती.

बौद्ध प्रवासी हयुएन त्संग हा चीनमधून बौद्ध धर्माच्या अभ्यासाच्या ओढीने सन ६२९ मध्ये, वयाच्या २७ व्या वर्षी भारतात आला. सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार करून प्रसारासाठी देशाबाहेर भिख्खू पाठवले. बौद्ध भिक्षूंनी जगभर प्रवास करून बौद्ध धर्माचा प्रसार केला. गौतम बुद्धांचा लिखित उपदेश नसल्यामुळे चीनमध्ये आलेल्या या भिख्खुंच्या धर्म प्रसारात एकवाक्यता नव्हती. चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार खूप झाला पण गोंधळाचा होता. एक अभ्यासक म्हणून त्यातील त्रुटी समजून घेण्यासाठी हयुएन त्संग भारतात आला. त्याने आपले सर्व अनुभव, भेटीची ठिकाणं यांच्या बारीकसारिक नोंदी करून ठेवली. त्याच्या चरित्राची ही एक ओळख. धर्माच्या अभ्यासासाठी वाहून घेतलेल्या या धर्मगुरूने विवाह न केल्यामुळे, त्याचा अभ्यास हेच चरित्र बनलं. वाचकांच्या सोयीसाठी गौतम बुद्धांचा आणि बौद्ध धर्मप्रसार करणाऱ्या

सम्राट अशोकाचाही थोडक्यात परिचय करून दिला आहे.

गझनीहून आलेले अलबेरुनी यांच्या वैयक्तिक जीवनाबद्दल काही माहिती मिळत नाही. ते अविवाहित असावेत. संस्कृत पुराणे, गीता, सन १००० साली असलेलं भारतीय समाज जीवन, भाषा यांचं त्यांनी केलेलं निरिक्षण यांची माहिती होणं ही आजच्या काळाला एक पर्वणी आहे. त्यांचं खगोलशास्त्रीय आणि गणित यातील गहन पांडित्य, खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ अभ्यासक यांनाच कळेल असं आहे. त्यामुळे त्याची ओळख करून

दिलेली नाही. दुसरं कारण म्हणजे त्यांच्या ग्रंथाचा अनुवाद केलेला नाही. भारतीय संगीत आणि नाटक यावर त्यांनी दोघांनी काही लिहिलं नाही.

हयुएन त्संग यांनी फक्त बौद्ध धर्म, त्याचा अभ्यास आणि स्तूप-विहार ही पवित्र स्थळे एवढाच अभ्यासाचा विषय ठरवला होता आणि त्या उद्देशाने ते एकटेच स्वबळावर भारतात पोचले होते, तर अलबेरुनी हे राजकैदी म्हणून गझनीहून आले होते. दोघांचाही आपापल्या अभ्यासाशी स्वदेशात परिचय होता. सम्राट अशोकामुळे बौद्ध भिक्षू चीनमध्ये पोचले होते तर काबूलवर स्वारी करून सुलतान महंमदने जे लाखो व्यापारी, अधिकारी, विद्वान, गणिती, धर्मपंडित कैद करून गझनीमध्ये आणले होते, त्यांच्याशी अलबेरुनी यांचा भारतीय तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र, गणित वगैरे विषयांशी थोडा थोडा परिचय झाला होता. राजसेनेबरोबर असल्यामुळे जिथे जिथे सुलतान स्वारी करायला गेला तिथेच अलबेरूनी यांना जाता आलं तर हयुएन त्संग यांनी भारत-अफगाण सीमेपर्यंत भ्रमण करून आपला व्यासंग पूर्ण केला.

हयुएन त्संग हे बौद्ध मठात बौद्ध भिख्खूंच्या सहवासात, विद्यापीठांमद्धे, राहिले आणि राजदरबारात राजांच्या भेटीला गेले. त्यामुळे त्यांनी राजांचं वैभव, संपत्ती जवळून पाहिली. पण या उलट, महमंदच्या स्वारीत असल्यामुळे, अलबेरुनी यांनी कोणताही राजदरबार पाहिला नाही. फौजेत राहिलेले अलबेरूनी गावागावातील सामान्य हिंदूंच्यात राहिले. त्यांनी हिंदू आणि मुसलमान चालीरितींची मनोमन कायम तुलना केली असावी. म्हणूनच हिंदू कुटुंब व्यवस्थेबद्दल लिहितांना ते म्हणतात की, हिंदू पाहुणा नवीन घरात शिरतांना ‘’ आत येऊ का ‘’ असं विचारत नाही, पण परत जाण्यासाठी निरोप घेतांना मात्र ‘’ निघू का? ‘’ असं विचारतो. त्यांना प्रश्न विचारला की उत्तराआधी

ते पत्नीचं मत विचारतात. विवाह संस्थेबद्दल त्या काळाची माहिती ते देतात, त्यात १००० साली सती प्रथा होती, पण ब्राह्मण स्त्रियांच्या केशवपनाचा उल्लेख करत नाहीत. हरितालिका सणाची माहिती देतात पण गणेशोत्सवाचा उल्लेख करत नाहीत. असे खूप बारकावे त्यांनी निरिक्षणाने मांडले आहेत. दुसरीकडे मत्स्यपुराण आदित्यपुराण, विष्णुपुराणातील इंद्र-महादेव-विष्णू वगैरे देवतांच्या कथा, आपल्या पूर्वजांनी ह्या एवढ्या कथा कशा निर्माण केल्या, याचं आश्चर्य वाटत राहतं.

हयुएन त्संग यांनी भारत आठवणींवर सी-यू-की या नावाने पुस्तक लिहिलं तर अलबेरूनी यांनी तहकिक इ हिंद, किताब अल हिंद, अशा २६ पुस्तकांमध्ये आपल्या भारतभेटीच्या आठवणी लिहून ठेवल्या. पण त्या पुस्तकातील तहकिक ए हिंद हेच पुस्तक जास्त गाजलं. अलबेरूनी सुलतान महंमदबरोबर आले, पण त्यांचं पुस्तक मात्र सुलतान १७३० सालामध्ये मरण पावल्यावर पूर्ण झालं. अलबेरुनी हे भारतीय ज्ञानाचा अरबी महासागर वाटतात. ही दोन्ही चरित्रे हा त्या पुस्तकांचा अनुवाद नाहीत, पण ओळख आहे. वाचकांना आपलीच भारतीय खूप जुनी माहिती नव्याने कळेल याची खात्री आहे.

डॉ. स्मिता दामले.
१४ एप्रिल २०२५

# बौद्ध भक्त हयुएन त्संग.

# गौतम बुद्ध.

हिंदुस्थान हा केवळ नैसर्गिक साधनसंपत्तीने नटलेला देश नव्हे तर अनेक क्षेत्रातील प्रज्ञावंतांच्या संशोधनाने, लखलखणाराही देश होता. या हिंदू धर्मियांच्या विशाल तत्त्वज्ञानाच्या कीर्तीने विचारवंतही अभ्यासाच्या ओढीने भारतात आले. हिंदू हा आचार-आहार-सामाजिक-आर्थिक-भौगोलिक एकविचाराने बनलेला समाज होता. ख्रिश्चन, मुसलमान, झरतुष्ट्र या धर्मांसारखा ना त्या हिंदू पंथाचा कुणी प्रेषित होता, ना त्याचे काही कडक निर्बंध होते. या धर्माने कुणावर धर्मांतराची सक्ती केली नाही.

इसवीसनपूर्व ६ व्या शतकात सर्व जगातच तत्त्वज्ञानाच्या विचारांना बहर आला होता. ग्रीक तत्त्वज्ञानी सॉक्रेटिस, पायथागोरस, ॲरिस्टोटल, चीनमध्ये कन्फ्युशियस विचार, जपानमध्ये शिंतो तत्त्वज्ञान, उदयाला येत होतं. भारतात, बौद्ध-जैन-पुनर्जन्मावर विश्वास न ठेवणारे पंथ, यावत् जीवेत् सुखं जीवेत् हा आयुष्याचा मूलमंत्र देणारा चार्वाक पंथ, हे वेदांना न मानणारे, नास्तिक पंथही आले होते. सनातन दर्शन, षट्दर्शन, सांख्यदर्शन, मीमांसा दर्शन, यासारखे मूळचे आस्तिक पंथ होतेच. पुढे कालौघात शीख, आर्य समाज असेही प्रवाह त्यात आले. सर्वांचे विचार आत्मा-ईश्वर-मानवी सुख, विश्वनिर्मिती यांच्या शोधाभोवतीच फिरत होते. सिंधू नदीच्या विस्तीर्ण जलप्रवाहाच्या काठी जी

मानवी वस्ती झाली, तिला हिंदू संस्कृती अशी ओळख मिळाली होती. इराण्यांना स म्हणता येत नसे, ते ह म्हणत. म्हणून मूळच्या सिंधू शब्दातील स च्या जागी हिंदू हा शब्द आला..

बौद्ध धर्माचे संस्थापक भगवान गौतम बुद्ध हे शुद्धोधनाचे पुत्र. शाक्य गणराज्याचा प्रमुख शुद्धोधन याने मायावती आणि तिची बहीण प्रजापती गौतमी या दोघींशी विवाह केला. त्याची पत्नी मायादेवी हिच्या पोटी सिद्धर्थाचा जन्म, इ. स. पूर्व ६२२ मध्ये वैशाखी पौर्णिमेला कपिलवस्तू इथे लुंबिनीत झाला. श्रीक्षेत्र काशीच्या ईशान्येस, ५० कोसांवर ही राजधानी होती. सिद्धार्थच्या जन्माच्या सातव्या दिवशी मायादेवींचा स्वर्गवास झाला. त्यानंतर सिद्धार्थचा सांभाळ त्याच्या मावशीने, प्रजापती गौतमीने केला. म्हणून त्यांना गौतमही म्हणतात. जेव्हा मृत शरीर, रोगग्रस्त शरीर, संन्यासी, वृद्ध शरीराचं दर्शन झालं तेव्हा तरुण सिद्धार्थला या नश्वर जगाच्या दु:खाची ओळख झाली आणि त्याचं मन विचारात बुडून गेलं..ऐहिक सुख, पत्नी व पुत्र, सर्व विलासी प्रपंचाचा त्याग करून, इ. पूर्व ५९२ मध्ये म्हणजे वयाच्या ३० व्या वर्षी, तो राजकुमार सत्याच्या शोधात निघाला.

राजकुमार सिद्धार्थने प्रथम अन्नत्यागाचा मार्ग स्वीकारला. दिवसभरात केवळ एक पान खाऊन तपश्चर्या केली. त्यात पोट पाठीला चिकटलं पण थकव्यामुळे, मन शांत नाही म्हणून ज्ञान नाही हे त्यांना उमगलं. मग ध्यानाचा मार्ग निवडला. त्यात ज्ञान मिळेपर्यंत उठायचं नाही असं ठरवलं. ऊरुवेला इथे निरंजना नदीच्या काठी, पिंपळाच्या वृक्षाखाली ते ध्यानस्थ झाले. त्यांना ४९

दिवसांच्यानंतर ज्ञान प्राप्ती झाली. त्यांना बोधि म्हणजे आकाशाएवढं ज्ञान प्राप्त झालं. त्या सततच्या चिंतनातून त्यांनी जे विचार मांडले त्यातून बौद्ध पंथ इ. पू. ५८८ मध्ये उदयाला आला. त्यांना बुद्ध नावाने ओळखलं जाऊ लागलं. तथागत म्हणजे बोले तसा चाले, आणि अर्हत्त ही उपाधी त्यांना मिळाली.

ज्ञानप्राप्ती झाल्यावरही ते ध्यानस्थ राहिले. त्याचवेळी तप्पुस्स आणि भल्लीक हे दोन व्यापारी त्या मार्गाने जात होते, त्यांनी सिद्धार्थ यांना पाहिलं आणि त्यांच्या दर्शनाने खूप प्रभावित झाले. आपल्याजवळचं अन्न अर्पण केलं. तथागतांनी ते स्वीकारलं. त्यांच्या विनंतीवरून भगवानांनी त्यांना " बुद्धं शरणं गच्छामी, म्हणजे ज्ञानाला शरण जा, हा मंत्र दिला. ज्ञानप्राप्तीनंतर आपला संदेश समाजासमोर मांडायला ते भ्रमण करू लागले. वाराणसीजवळ सारनाथ येथे, त्यांनी आपला पहिला उपदेश दिला. त्यांचे पहिले पाच शिष्य, कोंडीण्य, भाद्दिय, वप्प, महाम, असज्जी, हे होते. **हा दिवस धम्मचक्रपरिवर्तन म्हणून ओळखला जातो..**

त्यांनी पाली भाषेत संदेश देण्यास सुरुवात केली. आपल्या प्रवचनात, सारं आयुष्य हे दु:खाने भरलेलं आहे असं सांगून, दु:खाची कारणे आणि दु:खापासून मुक्तता यावर त्यांनी मार्गदर्शन सुरू केलं. आत्मोन्नती आणि मनोनिग्रह ही त्यांच्या विचारांची मूलतत्त्वे होती. त्यांच्या प्रवचनातून त्यांनी सत्य, प्रेम, अहिंसेचा विचार मांडून नवीन मार्ग लोकांना दाखवला. हा विचार इ. पूर्व काळात क्रांतिकारक होता. तोपर्यंत भारतात राज्यं, लढाया, मृत्यू, पशुबली, ईश्वर, वर्णभेद, उच्च नीच भेद या विश्वासांनी समाज वेढलेला होता.

अहिंसेच्या मार्गाने दु:ख निवारण ही कल्पनाच समाजाला नवीन होती. त्यामुळे सामान्य आणि ज्ञानी, दोन्ही वर्ग अचंबित झाले. आपल्या प्रवचनातून त्यांनी वेगळेच विचार मांडले. ज्या भारतात ईश्वरभक्ती, जप, पूजा, अशा कर्मकांडाचा दु:ख निवारणासाठी मार्ग होता त्या काळात, गौतम बुद्ध यांनी आपले ४ विचार मांडले. ज्ञानी मानव ज्ञानाने कायम स्वयंप्रकाशित राहतो हे सांगितलं हा त्यांचा उपदेश होता. १. मानवी जीवन हे दु:खमय असतं. २. तृष्णा ही दु:खाचं मूळ आहे. ३. सर्व प्रकारची आसक्ती सोडण्याने दु:ख निवारण होतं. ४. सदाचार हाच त्यावरील मार्ग आहे. त्यासाठी त्यांनी अष्टांग मार्ग दाखवला. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मान्त, सम्यक आजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृति, सम्यक समाधी, हे ते मार्ग होते. हिंसा, चोरी, खोटं बोलणं, कामवासनेतून अनाचार, मद्य यांचा त्याग हे त्यांनी दाखवलेले पंचशीलाचे मार्ग होते. हे त्यांचं चिंतन आजवरच्या सांप्रदायिक सनातनी समाजाला फारच वेगळं होतं.

जगात ईश्वर नाही आणि ईश्वराला शरण न जाताही संकट विमोचन होऊ शकतं, हा विचारही भाबड्या पापभीरू लोकांना नवीन होता. सुख देखील क्षणिक असतं आणि म्हणूनच तेच दु:खाला कारण असतं हा त्यांचा आयुष्यावर केलेला नवीन विचार होता. सारी सृष्टी ही उत्पत्ति आणि विलय या सूत्राने बनते, आणि ती परिवर्तनशील आहे, या सूत्राचा विचार मांडून, ब्रह्मा-विष्णू- महेश यांना सृष्टीचे विधाते मानण्याला या निरिश्वरवादामुळे पूर्ण तडा दिला. आपल्या शिष्यांना आत्मनिर्भर होण्याचा उपदेश केला. आत्मदीप म्हणजे तुमचा प्रकाश

तुम्हीच शोधा असा मार्ग दाखवला. ही सगळी विचारसारणी इ. पू. ४०० काळात क्रांतीकारकच होती. त्यामुळे ज्यांना हिंसेचा, युद्ध, लढाया, नरसंहार, रक्तपात, सत्तेचा हव्यास, यांचा तिटकारा होता, जे शाकाहारी होते, ते आपोआप गौतम बुद्धाचे अनुयायी बनले. त्यांची लिखित प्रवचनं नसल्यामुळे त्यांचे भिख्खू अनुयायी त्यांच्या विचारांचा प्रसार स्वत:च्याच शब्दात करायला लागले. गौतमबुद्ध जेव्हा आपल्या वडिलांना भेटायला गेले तेव्हा त्यांनी आपला पुत्र राहूल याला खूप वर्षांनी पाहिलं आणि त्याला आपल्या विचारांची दीक्षा दिली. आपल्या राज्याचा वारस असा अहिंसेच्या मार्गाने गेलेला पाहून, कमालीचे व्यथित झालेले शुद्धोधन गौतम बुद्धांना म्हणाले की यापुढे आई वडिलांची संमती घेतल्याशिवाय कोणत्याही तरुणाला तुझ्या धर्मात घेऊ नकोस. गौतमाने ते मान्य केलं. राजा शुद्धोधनाच्या मृत्यूनंतर, तथागतांची पत्नी यशोधरा, मावशी गौतमी आणि पुत्र राहूल त्यांच्याबरोबर निघाले.

भारतासारख्या वैदिक परंपरेच्या देशात या अगदी उलट बौद्ध तत्वज्ञानाचा वेगाने प्रसार झाला. गौतम बुद्धांचा उपदेश, बौद्ध वाङ्मय, संस्कृत आणि पाली भाषेत संग्रहित होतं. प्रत्येक अनुयायाला बुद्धं शरणमं गच्छामी, धम्मम शरणम गच्छामी, संघम शरणं गच्छामी या व्रताचा अंगीकार करणं जरूर होतं गौतम बुद्धांचा मृत्यू कुशीनगर इथे इ. पू. ५४३ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी झाला. यात काही मतभेदही आहेत. त्या दिवसाला **महानिर्वाणदिन** म्हणतात.

-------------

# चक्रवर्ती सम्राट अशोक

सम्राटांचा सम्राट तो चक्रवर्ती अशी चक्रवर्ती शब्दाची व्याख्या आहे. गौतम बुद्धांच्या महानिर्वाणानंतर, इ. पू. ५८३ नंतर मगधाचा सम्राट अशोकाचा जन्म, मौर्य राजघराण्यात, इ. पू. ३०४ मध्ये पाटलीपुत्र इथे झाला. त्याची जन्मकथा खूप रंजक आहे. चंद्रगुप्त मौर्याचा पुत्र बिंदुसार हा गादीवर आला. एकदा त्याच्या दासीने त्याची केशरचना खूप सुंदर केली. तेव्हा बिंदुसार खूष झाला आणि तुला हवं ते माग म्हणाला. त्या दासीने एक रात्र त्याच्याबरोबर घालवण्याची मागणी केली तेव्हा, मी सम्राट तू नाभिक कुळातील दासी, म्हणून हे अशक्य आहे म्हटल्यावर ती म्हणाली की महाराज, मला एका ज्योतिषाने, तुझ्या पोटी अक्षय कीर्तीचा चक्रवर्ती जन्मणार आहे असं भविष्य सांगितलं आहे. त्यावर चक्रवर्ती पुत्राच्या लोभाने बिंदुसार कबूल झाला. तिला जो पुत्र झाला, त्यामुळे ती राजप्रासादात रक्षिता (सुरक्षा) पदावर वास्तव्याला आली. तिचा शोक संपला, म्हणून आपल्या पुत्राचं नाव अ- शोक ठेवलं. जसं साकेत नाव असूनही अजिंक्य नगरी म्हणून अ- योध्या नगरी गाजली. अशोकाच्या आईचं नाव धर्मा आणि काही ठिकाणी चंपा असं आहे.

सम्राट अशोकाने कलिंगच्या विजयानंतर बौद्ध धर्माचा स्वीकार केला. कलिंग जिंकणे हे त्याच्या पूर्वजांपासून असाध्य असलेलं एक स्वप्न होतं, हेही लक्षात ठेवायला पाहिजे. या धर्माला राजाश्रयाचं व्यापक अधिष्ठान लाभलं.

सम्राट अशोकाने आपला भाऊ महेंद्र ( हयुएन त्संग भाऊ म्हणतात, काही ठिकाणी पुत्र असा उल्लेख आहे ) आणि कन्या संघमित्रा यांनाही धर्मप्रसारासाठी श्रीलंकेत पाठवलं. सम्राट अशोकाच्या प्रेरणेने, गौतम बुद्धांचा विचार घेऊन त्यांचे शेकडो अनुयायी आग्नेय आशिया आणि मध्य आशियात, तिबेट, चीनपर्यंत सर्वत्र हिंडू लागले. त्यांच्या वसतीसाठी आणि प्रार्थनेसाठी सम्राट अशोकाने मगध राज्यात हजारो विहारांची आणि स्तूपांची निर्मिती केली. तेव्हा त्या राज्याला विहारांचं राज्य म्हणू लागले. तोच आजचा बिहार. स्तूप म्हणजे बौद्ध शिल्पस्मारक. या ठिकाणी गौतम बुद्धांचे केस, नखं असे अवशेष पुरून त्यावर रचना केली जाते. ज्या पात्रात ते अवशेष असतात त्यास दागोबा म्हणतात. हयुएन त्संग यांनी आपल्या प्रवासात वर्णन केलेल्या प्रत्येक राज्यातील स्तूप आणि विहारांचं वर्णन वाचल्यावर सम्राट अशोकामुळे बौद्ध धर्माचा प्रसार किती प्रचंड झाला होता, सम्राट अशोकाच्या शीलालेखांमुळे बौद्ध भिख्खू किती दूरवर गेले होते याची कल्पना येते.

काळाच्या ओघात बौद्ध धर्मामध्ये मतभेद वाढू लागले आणि इ. सनाच्या पहिल्या शतकात महायान आणि हीनयान अशा दोन शाखा निर्माण झाल्या. काश्मीरचा राजा कनिष्क याच्या प्रभावामुळे हीनयान विचारसरणीला प्रोत्साहन मिळालं. या दोन्हीत फरक असा होता की महायान शाखा हा गौतम बुद्धांच्या शिकवणीला अनुसरून चालत होती. त्यातील सर्व ज्ञान हे संस्कृतमध्ये होतं, तर हीनयान पंथियांचा आग्रह, सर्वसामान्याला कळण्यासाठी पाली भाषेत ते असावं असा होता. महायान पंथी गौतम बुद्ध यांना देव- भगवान मानत असत

तर हीनयान म्हणत की भगवान मूर्तिपूजेच्या विरुद्ध होते, म्हणून त्यांना सर्व सामान्य व्यक्ति म्हणूनच ओळखलं गेलं पाहिजे. महायान पंथ बुद्धांच्या पूर्वजन्मातील अनेक कहाण्या-जातककथांवर विश्वास ठेवत तर हीनयान यांना ते मंजूर नव्हतं. मग विहारात अन्न शिजवले वगैरे असले मतभेद होतेच. चंद्रगुप्त मौर्याचा ओढा जैन विचारांकडे असला तरी, बिंदुसार, सम्राट अशोक, प्रसन्नजित हे महायान पंथाचे मुख्य आधार होते. त्यांनी या धर्माचा खूप प्रसार केला. त्या धर्माच्या सखोल अभ्यासाच्या ओढीने चीनमधून एक बौद्ध अभ्यासक भारतात खऱ्या बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी आणि ज्ञानप्राप्तीसाठी १०००० हजार मैलांचा खडतर प्रवास करून भारतात आला. **त्याचं नाव हयुएन त्संग**.


=========================================



# ह्युएन त्संग.

**जन्म – ६ एप्रिल इ. स. ६०२**

**मृत्यू – ५ फेब्रुवारी ६६४.**






**कुशिनगर येथील महानिर्वाण दिन.**

# हयूएन त्संग.

ह्युएनत्संग इसवीसन ६२९ मध्ये भारतात आले. १५ वर्षे भारतभर फिरले. बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी तक्षशीला, नालंदा, या त्यावेळी जगविख्यात असलेल्या विद्यापीठात राहिले. काबूल-काश्मीर-नेपाळपासून दक्षिणेला कांचीपुरमपर्यन्त अनेक राज्यांना, राजांना त्यांनी भेटी दिल्या. ठिकठिकाणाचे राजशिष्टाचार पाहिले. तिथलं सामाजिक, प्रापंचिक धार्मिक जीवन जवळून अभ्यासलं, भारतात येईपर्यंत, प्रवासातील प्रत्येक स्तूप, विहार आणि तथागतांच्या पुतळ्याची माहिती करून घेतली आणि त्या १५ वर्षांच्या सर्व आठवणी लिहून ठेवल्या. श्रीलंकेला मात्र गेले नाहीत.

ते प्रवासाला लागले तेव्हापासून त्यांनी भेटी दिलेल्या सर्व ठिकाणच्या नोंदी **"ली"** या परिमाणात करून ठेवल्या. प्रवासातील दोन गावातील अंतर आणि क्षेत्रफळ याचा समावेश आहे. भारताचं क्षेत्रफळ हे त्यांनी ६०,००० ली असं दिलं आहे. ४० ली म्हणजे एक योजन अशा आकड्यांमद्धे त्या नोंदी होत्या. या **"ली"** अंतराचं कोष्टकही त्यांनी नोंदवून ठेवलं..राजाची सेना एका दिवसात चालते ते अंतर म्हणजे योजन अशी सर्व सर्वसाधारण व्याख्या. ती साधारण ३०/४० ली अशी मानली आहे. एक योजन म्हणजे ८ कोस, एक कोस म्हणजे जिथपर्यंत गाईचं हंबरणं पोचतं, ते अंतर. एक कोस म्हणजे ५००

धनुष्यांची लांबी, एक धनुष्य म्हणजे ४ हात, एक हात म्हणजे २४ अंगठे, असं करत हे परिमाण, उवांची लिख, मग गाईचं केस, मेंढीचा केस इथपर्यंत पोचल्यावर वाळूच्या कणापर्यंत जातं. वाळूच्या एका कणाचे सात भाग केल्यावर प्रत्येक भाग हा अणू समजला जातो. आणि जेव्हा त्या कणाचंही विभाजन होणं शक्य होत नाही, तिथे त्याला परमाणु हा शब्द येतो.

वेळ-समय याचं लघुतम रूप क्षण आहे. १२० क्षण म्हणजे तत्क्षण, ६० तत्क्षण म्हणजे एक लव, ३० लव म्हणजे एक मुहूर्त, ५ मुहूर्त म्हणजे एक काल, आणि ६ काल म्हणजे एक दिवस आणि रात्र. याप्रमाणे चंद्र वाढत गेला की १५ दिवसांचा एक शुक्लपक्ष, आणि १४ दिवसांचा कृष्ण पक्ष होतो कारण १५ व्या दिवशी चंद्राचा लोप होतो. हे कोष्टक त्यांनी नोंदवून ठेवलं. या हिंदू देशातील ब्राह्मण अतिशय कुलीन, पवित्र, विद्वान, पूजनीय असल्यामुळे या देशाला त्याकाळात ब्राह्मण देश अशी ओळख होती. या देशाचं चारी दिशांचं, तीन बाजूंचा समुद्र- हिमालय पर्वत-नद्या-यांचं त्यांनी सुरुवातीलाच वर्णन करून ठेवलं. मग भारतीयांचे आचरण, पोशाख, सभ्यता, भिख्खू लोकांची वस्त्रे, राजा, त्याचं जाड गादीसारखं, रत्नजडीत सिंहासन, लोकांचा आहार, जाती, याची वर्णनं नोंद करून ठेवली. भारतीय लिपि, वर्णमाला, विभक्ती, भाषा, वेद, पुस्तकं, विद्याध्ययनाची रीत, बदलत जाणाऱ्या भाषा, उच्चार, शिक्षण पद्धती याची नोंद त्यांनी केली. सात वर्षांच्या आधी मुलाला १२ आर्यांचा सिद्धवस्तू पाठ शिकवला जात असे. सातव्या वर्षांनंतर पंचविद्या शिक्षण सुरू होत असे. त्यात पहिली शतविद्या म्हणजे लिपि, धातू, भाषा यांचा अभ्यास, दुसरी शिल्पायन

म्हणजे कारागिरी, ज्योतिष शास्त्र, यंत्र बनवण्याचा अभ्यास, तिसरी वैद्यक शास्त्र, चौथी ज्ञान-अज्ञान, सत्य, असत्य, हेतुविद्या आणि पाचवी अध्यात्मविद्या. त्यानंतर मग शेती, राजाची सेना, कायदे-खटले, वृक्ष, व्यापार, जीवनमान, भारतातील ऋतु, या सर्वांचं विस्तृत वर्णन त्यांनी लिहून ठेवलं. लढाईची पद्धत, खंजर, फरशा, बर्ची, ढाल, तलवार, धनुष्य तीर, ही शस्त्रं, रथ यांचा उल्लेख केला आहे.

हयुएन त्संग यांचा, ६ एप्रिल, इ. सन ६०२ मधे, हेनान सुभ्यात, चिनल्यू गावात, आताच्या लोयांग गावात जन्म झाला. त्यांना घरात चिन्न म्हणत. चार मुलांमधला हा सर्वात धाकटा मुलगा. यांच्या घराण्यात आजोबा-पणजोबा-खापरपणजोबा सर्वच विद्वत्तेचे पुजारी होते. त्यांचे वडील व्हे, चीनमधे लोकप्रिय असलेल्या कॉन्फुशिअस विचारधारेचे अनुयायी होते. लहानपणापासूनच त्यांचा धर्मग्रंथ वाचण्याकडे ओढा होता. ते ८ फूट उंच होते. चीनमध्ये १ फूट म्हणजे ९.५ इंच असत, म्हणजे ते सव्वा सहाफूट उंच होते. सुयी राजवटीच्या पडत्या काळात त्यांनी आपली नोकरी सोडून दिली आणि अध्यात्मिक वाचनातच स्वत:ला गुरफटून घेतलं.

हयुएन त्संग लहानपणापासूनच तीव्र बुद्धीचे होते. ते ९ वर्षांचे असतांना एकदा आपल्या वडिलांबरोबर टेबलवर शेजारी बसले होते. वडील मोठ्या आवाजात फिलिओ पाएटी हे कन्फ्युशियन विचारांचं पुस्तक वाचत होते, ज्यात मोठ्यांचा आणि पालकांचा आदर करायला शिकवलं जातं. वाचता वाचता त्यांनी पुढील वाक्यं म्हटलं की, गुरु आल्याबरोबर त्सांग त्सु उठला, त्याने

आपले कपडे सावरले आणि तो उभा राहिला. हे वाक्य ऐकल्याबरोबर हयुएन त्संग उभे राहिले. वडिलांनी असं का केलंस विचारल्यावर तो ९ वर्षांचा मुलगा उत्तरला की, जर त्सांग त्सु उभा राहतो, तर हयुएन त्संग तरी ही शिकवण ऐकतांना कसा बसेल..? हे उत्तर ऐकल्यावर वडील अगदी खूष झाले.

नवव्या वर्षापासूनच हयुएन त्संग बौद्ध धार्मिक पुस्तकं वाचायला लागले. त्या गावात एक बौद्ध मठ होता तिथे जाऊन निर्वाण सूत्र वाचायला लागले आणि त्या वाचनात इतके रमले की तहान भूक विसरले. १३ वर्षाचे होईपर्यंत त्यांनी ४ वर्षात या धर्माचा एवढा अभ्यास केला की त्या मठातील महंत, शिक्षक सर्व थक्क झाले. त्याच वेळी देशात बंडाळी होऊन सुयी राजसत्ता उलथली. त्यामुळे सगळीकडे हिंसा अत्याचार माजला. त्याची झळ लोयोंग गावालाही लागली, तेव्हा हयुएन त्संग यांनी आपल्या मोठ्या बंधूंना विनंती केली की हा गाव सोडून आपण दूर सिञ्चुयानला जाऊ.. मग दोन्ही भाऊ सिंचुयानाला पोचले.

हयुएन त्संग यांचा द्वितीय भाऊ चिङ्ग्सू हाही बौद्ध धर्माकडे आकृष्ट झाला होता. हयुएन त्संगांचे वडील सन ६११ मध्ये वारले तेव्हा ते आपल्या या भावाजवळ राहिले. अंतर्गत बंडाळीमुळे धोक्यात आलेली ही सुयी राजवट तांग घराण्याने सन ६१८ मध्ये संपवली. सिंचुयानमद्धे शिंग-तू मठात ते दोघे भाऊ दाखल झाले. देशातील अस्थिर वातावरणामुळे तिथे सर्व राज्यातून अनेक बौद्ध अभ्यासक महंत गोळा झाले होते. कारण त्या नगरात शांतता आणि कायद्याचा अंमल चालू होता. त्यांनी सर्वांनी एक धार्मिक सभामंडल स्थापन केलं. महायान

समपरिग्रहशास्त्र आणि अभिधर्मशास्त्र यांचा तिथे अभ्यास सुरू झाला. या सभांमध्ये हयुएन त्संग यांच्या बुद्धी वैभवाने सर्वच अचंबित झाले. तिथे त्यांनी बौद्ध धर्मशास्त्राचा एवढा अभ्यास केला की त्यांच्या कुशाग्र बुद्धीमुळे वयाच्या २० व्या वर्षी ते पूर्ण भिक्षू झाले. पण अभ्यास करतांना आलेल्या त्यातील शंका निवारायला कुणीही पंडित त्यांना मिळाला नव्हता. त्यावेळी चीनमध्ये बौद्ध धर्माचे अनेक प्रसारक येऊन गेले असल्यामुळे, आणि धर्माचं लिखित साहित्य नसल्यामुळे, प्रत्येकाने आपापल्या कुवतीप्रमाणे विचार मांडले होते. त्यामुळे हयुएन त्संगग यांचा वैचारिक गोंधळ झाला होता.

त्या शंका संपवण्यासाठी भारतातील धर्मपंडितांना भेटायची हयुएन त्संग यांना ओढ लागली. म्हणून ते आपल्या मोठ्या बंधूंना न विचारता, एकदा गुपचूप गावातील व्यापाऱ्यांच्या साथीने नदी, घाट ओलांडत हांग-जो शहरात पोचले आणि तिथल्या तिएन-वांग मंदिरात राहिले. त्यांची धर्म पांडित्याची कीर्ती आधीच तिथे पोचली होती. तिथे जमलेल्या बौद्ध भिक्षूंनी त्यांना महायानावर प्रवचनं द्यायला सांगितली. तिथे असतांना बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी भारतात जाण्याची उर्मि त्यांना स्वस्थ बसू देईना. त्यांनी सरकारकडे रितसर अर्ज केला पण त्यांना परदेशी जायला परवानगी मिळाली नाही. त्यावेळी तांगत्सु हा राजा सत्तेत आला होता. त्याने आपली राजधानी चांगानला हलवली होती. तेव्हा त्यांनी परवानगीशिवायच पश्चिमेकडे धर्माच्या अभ्यासासाठी जायचं ठरवलं. त्यांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या मातेने एक स्वप्न पाहिलं होतं. त्यात ते बाळ पांढऱ्या वस्त्रात होतं आणि कुठेतरी निघालं होतं. ‘’

मातेने बाळाला विचारलं, बाळा, तू कुठे निघाला आहेस? तेव्हा ते बाळ म्हणालं की मी पश्चिमेकडे ज्ञान प्राप्तीसाठी जात आहे. '' आता ती वेळ आली होती.

हजारो मैलांचा खडतर मार्ग करून एकट्याने जाणं आणि सुखरूप परत येणं हे फार कठीण व्रत पार पाडायचा त्यांचा निश्चय झाला होता. तेव्हा वयाच्या २७ व्या वर्षी सप्टेंबर सन ६२९ मधे ते दोन सहकाऱ्यांना घेऊन गुप्तपणे राजधानी चांगानहून ( आता सियान ) प्रवासाला निघाले. देश सोडायची राजाने परवानगी दिली नव्हती म्हणून रात्री प्रवास आणि दिवसभर लपून राहणे हा नेम त्यांनी सुरू केला. तिथपासून अडचणी सुरू झाल्या. क्वा चौ पार केल्यावर ते चीनच्या सीमेवर पोचले. या प्रवासात वाटेत हू-लू नदी आली, पुढे सीमेवर ५ सुरक्षा करणारे सुरक्षा-मनोरे होते. त्यापुढे मोठं वाळवंट लागणार होतं. त्या पहारेकऱ्यांना चुकवण्याचं मोठं दिव्य पार करायचं होतं. हे सगळं कळल्यावर हयुएन त्संग निराश झाले. त्यातच त्यांचा घोडाही मेला.

निराश आणि हतबुद्ध होऊन ते त्या गावात एक महिनाभर राहिले. त्याचवेळी लियांग-चौ इथले काही गुप्तहेर तिथे आले. त्यांनी हयुएन त्संग यांना पकडलं आणि वर्दी दिली की एक धर्मगुरू इथे आहे. त्याचं नाव हयुएन त्संग आहे. तो सि-फान भागात घुसखोरी करू पाहतो आहे. तेव्हा त्याला अटक करण्याचा हुकूम काही अधिकाऱ्यांनी दिला, पण ली चांग इथला एक धार्मिक वृत्तीचा गव्हर्नर होता, त्याला हे हयुएन त्संग नाव खूप परिचित होतं. त्याने हयुएन त्संग यांना त्यांचं खरं नाव विचारलं आणि ते खरंच हयुएन त्संग आहेत आणि धर्मशास्त्राच्या अभ्यासाला निघाले आहेत हे कळल्यावर त्याने आपला अटक

करण्याचा हुकूम फाडून टाकला. लवकरात लवकर इथून पुढील प्रवासाला लागा असा सल्लाही दिला. त्यावेळी त्यांचा घाबरलेला एक सहकारी परत फिरला. तेव्हा हयुएन त्संग यांनी दुसऱ्यालाही परत पाठवलं. ते एकटेच या ज्ञानयात्रेला निघाले.

आता मात्र त्यांना मार्गदर्शकाची गरज भासली. त्या रात्री ते एका बुद्ध मंदिरात झोपले. तिथे रात्री एक धर्म नावाचा धर्मगुरू यात्री आला. त्याने हयुएन त्संग एका कमळात बसून पश्चिमेला जात असल्याचं रात्री स्वप्न पाहिलं. सकाळी हे स्वप्न त्यांनी हयुएन त्संग यांना सांगितलं. पण हयुएन त्संग म्हणाले की स्वप्नं फसवी असतात. पण त्याचवेळी एक चमत्कार झाला. तिथे एका बौद्ध भक्ताने प्रवेश केला. हयुएन त्संग यांनी त्याचं नाव विचारलं. हयुएन त्संग यांचं व्यक्तिमत्व पाहून तो भारून गेला. थोड्या वेळाने बाहेर जाऊन आला आणि खाद्यपदार्थ घेऊन आला. हयुएन त्संग भारतात अभ्यासाला जात आहेत हे कळल्यावर त्या धर्मगुरूने, मी वाटेतील ५ सुरक्षा मनोरे तुम्हाला ओलांडून द्यायची मदत करीन असं म्हटल्यावर हयुएन त्संग यांचा आनंद गगनात मावेना. दुसरे दिवशी तो नवीन धर्मगुरू एका दाढीवाल्या माणसाला घेऊन आला आणि हा माणूस तुम्हाला मार्ग दाखवेल म्हणाला. याने निदान ३० वेळा पश्चिमेकडचा प्रवास करून तो परत आलाय असं सांगितल्यावर हयुएन त्संग यांना मार्गदर्शक मिळाल्याचं खूप समाधान झालं. पण त्या माणसाने वाटेतील वाळवंट, गरम वारे, बोचरी थंडी वाळूची वादळे यांची कल्पना देऊन, तुम्ही जाऊ नका असा सल्ला दिला तेव्हा हयुएन त्संग यांनी काही झालं तरी मी जाणारच, परत नाही

आलो तरी चालेल असं निक्षून सांगितलं. तेव्हा तो दाढीवाला मार्गदर्शक हयुएन त्संग यांना म्हणाला की तुमच्याजवळचा घोडा मला द्या आणि माझा हा तगडा घोडा तुम्ही घ्या. हा घोडा १५ वेळा त्या रस्त्याने जाऊन आला आहे. तुम्हाला तो बरोबर मार्गाने नेईल जेव्हा हयुएन त्संग यांनी तो घोडा पाहिला तेव्हा त्यांना एक घटना आठवली. चांगान इथे एका भविष्यवेत्त्याने, ते परदेशात अभ्यासाला जातील तेव्हा भारत प्रवासात जो घोडा असेल तो असाच लाल रंगाचा आणि याच वर्णनाचा सांगितला होता. या नवीन मार्गदर्शकाबरोबर आणि मंदिरातील धर्मगुरूबरोबर हयुएन त्संग निघाले. रात्रीच्या वेळी दोन मनोऱ्यांवरची टेहेळणी वाचवून ते तिघे तिसऱ्या टेहेळणी बुरूजाजवळ आले. थोड्या अंतरावर एक छोटी अरुंद नदी वाहत होती, तेव्हा त्या सहाय्यकाने वाटेतील गवत कापून जमिनीवर टाकून ती अरुंद नदी पार केली. मग मात्र सगळे दमले आणि जमिनीवरच झोपले. पण मध्यरात्री हयुएन त्संग यांना जाग आली आणि त्यांनी पाहिलं की तो दुसरा माणूस हातात चाकू घेऊन त्यांच्या जवळ येतो आहे, तेव्हा त्यांनी बोधिसत्त्व म्हणायला सुरुवात केली. त्याबरोबर तो सहाय्यक परत आपल्या जागी जाऊन झोपला. सकाळी त्या सहाय्यकाने हयुएन त्संग यांना सांगितलं की यापुढे जाणं धोक्याचं आहे. तिथे पाणीही मिळणार नाही. पण पुढे जाण्यावर ते ठाम होते तेव्हा त्यांचा सहाय्यक परत मागे फिरला आणि निघून गेला. त्यानंतर तो दुसरा मंदिरातील धर्मगुरूही मागे फिरला. आता हयुएन त्संग एकटेच पुढच्या प्रवासाला निघाले.

आता मार्ग शोधण्यासाठी जिथे घोड्याची लीद पडली असेल त्या रस्त्याने ते जायला लागले. काही अंतर गेल्यावर त्यांना एक सैन्याची तुकडी समोरून येतांना दिसली. पण परत नाहीशी झाली. असं दोनतीनदा घडलं. तो एक वाळवंटात दिसणारा आभास होता. त्या भयप्रद परिस्थितीतही चालत राहिल्यावर ते पुढच्या टेहेळणी बुरुजापाशी आले पण आपल्याला कुणी बघू नये म्हणून वाळूत स्वत:ला गाडून लपले. थोड्या वेळानंतर त्यांना थोड्या अंतरावर पाणी दिसलं म्हणून ते पाणी प्यायला गेले तेव्हा त्यांच्या अंगाजवळून एक बाण निसटून गेला. पाठोपाठ दुसराही बाण आला. तेव्हा ते जोरात ओरडले की मला मारू नका मी एक धर्मगुरू आहे. तेव्हा एक सैनिक जवळ आला आणि त्यांना घेऊन आपल्या वांग सियंग या अधिकाऱ्याजवळ गेला. त्या अधिकाऱ्याने हयुएन त्संग यांना न्याहाळत विचारलं की तुम्ही कसला अभ्यास करायला ब्राह्मणांच्या देशात जात आहात..? तेव्हा हयुएन त्संग यांनी आपली इच्छा आणि खरी कहाणी सांगितल्यावर त्या अधिकाऱ्याने त्यांना त्यांच्या गावाच्या धर्मगुरूकडे पोचवण्याची व्यवस्था केली. त्या रात्री तिथे विश्रांति घेऊन तो अधिकारी हयुएन त्संग यांना घेऊन काही अंतर गेला आणि म्हणाला की या रस्त्याने सरळ गेलात की तिथे चौथा टेहेळणी बुरूज लागेल, तिथे एक सुरक्षा अधिकारी असेल, त्याला माझं नाव सांगा म्हणजे तो तुम्हाला सोडेल. हयुएन त्संग तिथून पुढे निघाले. त्यांचा पुढचा प्रवास अत्यंत हालाचा झाला. अनेक फाटे असलेले रस्ते, कोणत्या मार्गाने जावं याचा गोंधळ, बरोबर असलेलं पाणीही संपलं. तेही कुठे मिळेना. पोटात अन्न नाही, आणि परत मागे फिरण्यापेक्षा मरण पत्करण्याची शपथ घेतलेली, असे ४ दिवस गेले. तेव्हा

ताकद संपली आणि ते वाळूतच झोपले. त्या गाढ झोपेत त्यांनी हातात परशू घेतलेला एक उंच अलौकिक पुरुष पाहिला, त्याने हयुएन त्संग यांना म्हटलं की झोपून का राहिला आहेस ? प्रयत्न का करत नाही आहेस..? तेव्हा हयुएन त्संग गाढ झोपेतून जागे झाले. घोड्यावर बसून निघाले त्यावेळी त्यांचा घोडा विशिष्ट मार्गानेच जाण्यासाठी अडून बसला. म्हणून ते त्या मार्गाने निघाले..तेव्हा त्यांना काही अंतरावर पाण्याचा झरा आणि हिरवं गार गावात दिसलं. ते खूष झाले. ते आणि घोडा मधुर पाणी पिऊन तुष्ट झाले. मग पाणी भरून घेऊन आणि घोड्यासाठी हिरवा चारा घेऊन ते प्रवासाला लागले आय-गू नावच्या प्रदेशात पोचले. तिथल्या राजाने आपल्या देशात राहण्याचा खूप आग्रह केला पण नम्रपणे ते नाकारून ते परत पुढे चालायला लागले. त्यांना निरोप द्यायला स्वत: तो राजा, त्याचे मंत्री, नागरिक, आणि धर्मगुरू काही अंतर चालत गेले. आणि त्यांचा निरोप घेतला.

जेव्हा ते पश्चिमेच्या मार्गाला लागले तेव्हा राजा आणि बाकी सर्वजण परत फिरले. आता हयुएन त्संग तो-त्सिन देश ओलांडून ओ-की-नि–येनकीमध्ये पोचले. मधला वाळवंटाचा प्रवास त्यांनी ६ दिवसात पूर्ण केला. तिथे आ-फू या करंज्याजवळ झोपले. ह्या कारंज्याची कहाणी म्हणजे एकदा काही व्यापारी प्रवास करत इथे आले आणि तहानेने अत्यंत व्याकुळ झाले, तेव्हा त्यांच्या जथ्यात एक बौद्ध धर्मगुरूही होता. त्याच्याकडे सर्व यात्री गेले. तेव्हा भगवान बुदधांची उपासना करा तर मी पाणी आणतो असं म्हणून त्याने या यात्रींकडून सद्वर्तनाची शपथ घेऊन त्यांच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून हा संत जवळच्या

डोंगरावर गेला. तो तिथे वरती पोचल्यावर अचानक पाण्याचा लोट वाहायला लागला. पण साधू परत आला नाही, तेव्हा ते व्यापारी या चमत्काराने थक्क झाले. पाणी पिऊन तृप्त झाल्यावर त्या साधूला शोधत वर गेले. तेव्हा तो बौद्ध संत मृत झालेला दिसला. त्याचावर अग्निसंस्कार करून सर्व लोकांनी तिथले दगड गोळा करून एक स्मारक उभं केलं. जेव्हा कुणी प्रवासी नसतो तेव्हा तो प्रवाह नाहीसा होतो आणि कुणी पांथस्थ आला तर वाहायला लागतो अशी या जागेची कहाणी होती. सकाळ झाल्यावर हयुएन त्संग अत्यंत उंच अशा सिल्वर माऊंटनवर पोचले. या ठिकाणाहून पाश्चिमात्य देशांना चांदीचा पुरवठा होत असे. त्या मार्गाने जात असताना काही लुटारू आडवे आले. त्यांनी हयुएन त्संग यांच्या वस्तू लुटून नेल्या. तिथून पुढे जेव्हा ते किऊ-ची नगरात पोचले तेव्हा तिथल्या बौद्ध धर्मगुरूंनी आणि राजाने त्यांचं स्वागत केलं, सन्मान केला. हे नगर सोडतांना तिथल्या राजाने हयुएन त्संग यांना पुढील प्रवासासाठी घोडे, उंट, गरजेच्या वस्तू दिल्या. राज्यातील काही भिख्खूही सोबतीला दिले. दोन दिवसांच्या प्रवासानंतर त्यांना एका २००० तुर्की चोरांनी गाठलं. हाती आलेल्या लुटीवरून आपापसात वाटणीवरून त्यांच्यात भांडणं झाली आणि ते निघून गेले. त्यानंतर हयुएन त्संग ज्या समुदायाबरोबर जात होते ते सर्व एका त्यांत बर्फाळ पर्वतावरून हाल सोसत सुशी मध्ये पोचले आणि काउ चांगच्या तुर्की राजाला भेटले. तिथे एक महिना राहून त्या राजाचा पाहुणचार घेऊन पुढे निघाले.

फरगाण, समरकंद, बुखारा, चघनिया, क्युमिटो, कपिसा असे विविध देश, पर्वत, दऱ्या, ऋतू ओलांडत, भारताच्या प्रत्येक ठिकाणच्या सम्राट

अशोकाने बांधलेल्या पुरातन स्तूपांना, मठांना, राजांना, भेट देत वाटेत दीपांकर नगरात आले. या नगरापासून दूर डोंगरांमद्धे एक गुहा होती. जो मनापासून तथागतांची भक्ति करतो त्याला साक्षात भगवान बुद्धांचा अवतार पाहायला मिळतो अशी तिची ख्याती होती. हयुएन त्संग साक्षात भगवानांच्या दर्शनाला आसुसले होते. ते तिथे जायला निघाले. त्या गुहेपर्यंत पोचण्याच्या मार्गावर ५ गुंड त्यांना आडवे आले आणि तलवारी काढून कुठे चाललास असं विचारायला लागले. तेव्हा हयुएन त्संग यांनी, मी तथागतांची छाया पाहायला चाललोय असं उत्तर दिलं. तेव्हा त्या चोरांनी पुढे जाऊ नका, तिथे दरोडेखोर आहेत असा दम भरला. त्यावर ते म्हणाले, म्हणजे तीही माणसंच आहेत ना, मग भीती कशाची? आपल्याशी इतक्या सन्मानाने बोलणाऱ्या या उत्तराने ते चोर थक्क झाले. त्यांना गुहेपर्यंत जाऊ दिलं.

गुहेपाशी पोचल्यावर, तिथे बसलेल्या एक वृद्धाने गुहेत शिरल्यावर कसं आत जायचं आणि बुद्धांचं दर्शन घडेल ते सांगितलं. तसे हयुएन त्संग आत शिरले. एकदा छाया उमटली, भिक्षा पात्र दिसलं, पण लगेच विरून गेलं. दोन वेळा असं झालं पण त्यांना भगवानांची प्रतिमा पूर्वेकडील भिंतीवर दिसेना. तेव्हा त्यांनी अत्यंत भक्तीने बौद्ध सूक्तं म्हटली. दोनदा असा प्रयत्न झाल्यावर एकाएकी चमत्कार झाला. सर्व गुहा प्रकाशाने उजळली. त्या भिंतीवर अकस्मात तथागतांची छाया उमटली. तांबूस वस्त्रांमधे कमळावर बसलेली त्यांची प्रतिमा, त्यांच्या मागे बोधिसत्त्व, आणि काही महंत त्यांनी पाहिले. काही क्षणातच लगेच ती छाया विरून गेली. हयुएन त्संग त्या दर्शनाने कृतार्थ झाले. एका क्षणात इथवर

येण्याचे त्याचे श्रम विरून गेले. पुढचे अनेक डोंगर, नद्या, नगरं पार करत ते गांधार देशात पोचले. पुरुषपूर ही या देशाची राजधानी होती. इथे त्यांनी कनिष्क राजाने बांधलेला ४०० फूट उंच आणि २००० फूट घेराचा खूप मोठा स्तूप पहिला. तिथे खूप मोठ्या संख्येत स्तूप होते ते सर्व ह्यूएन त्संग यांनी पहिले. सम्राट अशोकाने बांधलेल्या स्तूप, विहार, पुतळे यांचं दर्शन घेतलं. कनिष्क राजाने बांधलेल्या स्तूपाचं आणि पिंपळ वृक्षाचं दर्शन घेतलं. इथेच तथागतांनी आनंद शिष्याला सांगितलं होतं की ४०० वर्षांच्यानंतर इथे कनिष्क नावाचा राजा होईल, तो इथे स्तूप बांधेल. हयुएन त्संग यांनी त्या स्तूपाचं दर्शन घेतलं.

गंधारहून ते काश्मीरच्या मार्गाला लागले. वाटेत त्यांनी पुष्पकलावति नगरी पार केली आणि ते शुभवास्तूच्या (आताची स्वात नदी) काठावर असलेल्या उदयन राजाच्या देशात पोचले. या राजाबद्दल अशी आख्यायिका सांगितली जाते की तथागतांची हुबेहुब मूर्ती बनवण्यासाठी राजाने, एका शिल्पकाराला त्यांना बघून येण्यासाठी ३ वेळा स्वर्गात पाठवलं होतं. तिथल्या स्तूप आणि विहारांचं दर्शन घेऊन ते तक्षशिलाला पोचले. भारतात प्रवेश केल्यावर ते काबूलच्या सीमेवरील लमघान इथे आले. याचं मूळ संस्कृत नाव लंपक आहे. एकेक प्रदेश ओलांडत ते एक वर्षाने सिंधू नदी पार करून तक्षशिलाला येऊन पोचले. तिथे त्यांना चार भव्य, सुंदर असे सम्राट अशोकाने बांधलेले स्तूप पाहायला मिळाले. तिथे विद्यापीठात आपले सर्व महिने त्यांनी अभ्यासात व्यतीत केले. मग त्यांनी पुढील दोन वर्षे सन ६३१ ते ६३३ मधे,

काश्मीरमध्ये घालवली. तिथे त्यांना हीनयानाचे जास्त भिक्षू भेटले. तिथून परत बाहेर पडून जालंदरला पोचले तेव्हा तिथे ४ महीने मुक्काम केला.

यानंतरची त्यांची भेट मथुरेतील बौद्ध भिक्षूंशी झाली. मथुरा, यमुना, गंगेचं दर्शन घेत ते कान्यकुब्ज म्हणजे कनौजला सन ६३६ सालात पोचले. हयुएन त्संग यांनी या राज्याचं नाव कान्यकुब्ज का पडलं त्याचीही कथा सांगितली आहे. त्या राज्याच्या अरण्यात एक ऋषि तपश्चर्या करत होते. एकदा काही सुंदर कन्या तिथे विहाराला आल्या. त्यांना पाहून ऋषि तपापासून भ्रष्ट झाले. तेव्हा ते राजाकडे गेले आणि म्हणाले की या मुलींनी माझी तपश्चर्या भंग केली आहे, म्हणून तू त्या मुलींचा माझ्याशी विवाह लावून दे. राजाने त्या मुलींना ऋषींची इच्छा सांगितल्यावर त्या मुलींनी नकार दिला. तेव्हा राजा घोर संकटात सापडला. त्या तपस्वीला संताप आला तर काय होईल या भीतीने दु:खी झाला. त्यावर त्यांच्या कन्येने, मी त्यांच्याशी लग्न करून तुमचं संकट कमी करीन असं सांगितलं. तेव्हा राजा त्या ऋषींकडे जाऊन वस्तुस्थिती सांगितली. तेव्हा आपल्याला नकार मिळाला हे ऐकून संतापलेल्या ऋषींनी तुझ्या राज्यातील सर्व मुली कुब्जा होतील असा शाप दिला. त्यामुळे गावातील सर्व कन्या कुब्जा झाल्या. त्यामुळे त्या देशाला कान्यकुब्ज नाव पडलं. या राज्यात शिलादित्य म्हणजेच राजा हर्षवर्धन राज्य करत होता. या राजाने आपले वडील प्रभाकर वर्धन आणि बंधू राज्यवर्धन यांच्या मृत्यूनंतर वयाच्या १६ व्या वर्षी स्थानेश्वर राज्य हाती घेतलं. ५००० हत्ती, २०,००० घोडेस्वार आणि, ५०,००० फौज घेऊन ६ वर्षात सारा उत्तर भारत जिंकला आणि हर्षवर्धन सम्राट

पदवीला पोचला. कनौज हा त्याच्या बहिणीचा राजश्रीचा देश. तिचा पती युद्धात मारला गेल्यावर तेही राज्य हर्षवर्धनाने सांभाळलं. या सम्राटाशी हयुएन त्संग यांची भेट झाली.

त्या सम्राटाचं राज्य वैभव त्यांनी विस्ताराने लिहिलं. या सम्राटाकडे ६०,००० हत्ती, एक लाख घोडदळ होतं. त्याने हिंसा बंद करून जनतेलाही मांसाहार न करण्याची सक्ती केली. गंगेच्या काठाने हजारो स्तूप निर्माण केले. राज्यात त्याने अनेक धर्मशाला बांधल्या जिथे प्रवाशांना अन्न-पानी आणि वैद्यकीय सेवा मिळत असे. त्यामुळे गरीब, पीडितांची मोठी सेवा होत असे. हा राजा जिथे जिथे जाई, तिथे अनेक भवन निर्माण करत असे आणि ती घरं धान्यांनी भरून ठेवत असे. त्यामुळे त्या गावातील लोकांना आनंद मिळत असे. त्या राजाचा दानशूर स्वभाव, विद्वत्ता, दरबार, यामुळे हयुएन त्संग खूप प्रभावित झाले. सम्राट हर्षवर्धन यांचा बौद्ध धर्माकडे ओढा होता. त्यांनी ३ फूट उंचीची बुद्धदेवांची सोन्याची मूर्ती तयार करून, दिमाखाने ती मिरवत नेऊन तिची प्रतिष्ठापना केली तो सोहळा हयुएन त्संग यांनी पाहिला. तो सोहळा त्यांनी विस्ताराने लिहून ठेवला. बुद्धाची सोन्याची मूर्ती एका शृंगारलेल्या हत्तीवर अंबारीत ठेवण्यात आली. त्यापुढे शृंगारलेले ५०० हत्ती चालत होते. युवराज चवऱ्या ढाळत मूर्तीबरोबर होता. त्यामागे १०० हत्तींवर वाद्ये बसवून ती वाजतागाजत मिरवणूक निघाली होती. मिरवणूकीने मूर्ती नेत असतांना सम्राट हर्षवर्धन मार्गावर अनमोल मोती, रत्ने, सोन्याचांदीची फुले उधळत चालला

होता. मग ती मिरवणूक मंदिरात पोचली. मूर्तीला रत्नहार, रेशमी वस्त्रे घातली गेली. मग अन्नदानानंतर समारंभ संपन्न झाला.

तिथल्याच एका मोठ्या प्रशस्त विहारात अनेक सुंदर बुद्ध मूर्ती ठेवेलेल्या होत्या. अनेक बौद्ध भिख्खू तिथे वास्तव करत होते. तिथे एका सुंदर डबीत भगवान बुद्धांचा दीड इंच लांब, चमकदार दात ठेवलेला असे. त्याच्या दर्शनासाठी दूरदूरचे भक्त त्या विहारात येत. ती गर्दी इतकी अलोट असे की शेवटी राजाने त्यावर नियंत्रण आणण्यासाठी एकेक सुवर्ण मुद्रेचं बंधन घातलं, तरी गर्दी कमी होत नसे. दरवर्षी हर्षवर्धन राजा गौतम बुद्धांचा हा दात उंच सिंहासनावर ठेऊन त्याचं दर्शन भाविकांना घडवत असे. कनौजमधे ह्युएन त्संग ३ महिने राहिले. .

तिथून ह्युएन त्संग अयोध्येला गेले. तिथले सगळे स्तूप आणि विहार यांचं दर्शन घेतलं. अयोध्येहून ते गंगेच्या काठाने हयमुखच्या मार्गाला लागले. त्यांच्याबरोबर १०० एक प्रवासी होते. चालताचालता ते अशोक वृक्षाच्या घनदाट जंगलात शिरले. तेव्हा त्यांना नदीपात्रात १० नावा दिसल्या. अचानक त्या ठिकाणी काही दरोडेखोर आले. ते देवीचे उपासक होते आणि देवीला नरबळी देण्यासाठी माणसांची वाट पाहत होते. ह्युएन त्संग यांचा हा जथा पाहिल्याबरोबर ते पुढे आले आणि त्यांनी साधू वस्त्रातील ह्युएन त्संग यांना बळी देण्यासाठी निवडलं. बाकी सगळे प्रवासी खूप घाबरले पण ह्युएन त्संग शांत राहिले तेव्हा त्या दरोडेखोरांना खूप आश्चर्य वाटलं..एवढा स्थिरचित्त माणूस त्यांनी प्रथमच पाहिला होता. त्या गुंडांनी ह्युएन त्संग यांना बळी

देण्यासाठी चौथऱ्यावर उभं केलं. त्यांचे डोळे काढण्यासाठी सुरा घेऊन एकजण जवळ गेला पण त्यांचं स्थिर शांत मन पाहून थक्क झाला. मी भिख्खू आहे, इथे माझ्या श्रद्धेच्या बोधिच्या दर्शनासाठी खूप दुरून आलो आहे. मी ते दर्शन घेतो मग मला मारा अशी विनवणी केली. पण त्यांनी ऐकलं नाही. तेव्हा, मला माझी प्रार्थना करू द्या, जर ते करू दिलं नाहीत तर तुमच्यावर संकट येईल असं म्हटल्यावर ते गुंड तयार झाले.

मग हयुएन त्संग यांनी अत्यंत भक्तीने मैत्रेयाची आराधना सुरू केली. त्या प्रार्थनेत, या अपप्रवृत्तीला लागलेल्या लोकांना सुपंथाला लावण्याचं कार्य माझ्याकडून घडू दे अशी आराधना केली. त्याबरोबर अचानक मेघ दाटून आले, वादळी वारे वाहायला लागले आणि अतिवृष्टी सुरू झाली. हा निसर्ग कोपाचा चमत्कार पाहून दरोडेखोर घाबरले. ते हयुएन त्संग यांना शरण गेले आणि सन्मार्गाला लागण्याची त्यांनी शपथ घेतली. आपली सर्व शस्त्रे नदीपात्रात फेकून दिली. जथ्यातील इतर प्रवासीही या चमत्काराने आश्चर्यचकित झाले.

हयुएन त्संग या घटनेनंतर प्रयागच्या दिशेने चालायला लागले. प्रयागला पोचल्यावर, अनेक अडचणी, हाल सोसत, जे स्वप्न उराशी बाळगून ते भारतात आले त्या गंगा यमुनेच्या संगमाला त्यांनी ‘’ याची डोळा याची देही ‘’ पाहिलं. गंगेचा वालुकामय परिसर पाहिला. अनेकानेक प्रवासी इथे येतात आणि दानधर्म करतात म्हणून या नगरीला महादान भूमी म्हणतात असं लिहून ठेवलं. त्या संगमावर एक आठवभर उपास करून, शेवटी एक एक तांदळाचा दाणा खाऊन देहत्याग केल्याने स्वर्गप्राप्ती होते असा समज आहे, म्हणून इथे दूरदूरचे लोक

येऊन प्राणार्पण करतात, त्यासाठी संगमावरील वृक्षावर चढतात आणि स्वत:ला गंगाजलात झोकून देतात असं त्यांनी नमूद केलंय..प्रयागमधील सर्व मठ-विहार-स्तूपांना त्यांनी भेट दिली. प्रयागवरून कौशंबिला भेट दिली. इथे उदयन राजाने भगवानांसारखी हुबेहूब दिसणारी मूर्ती घडवून घेतली होती, तिचं दर्शन घेतलं.

मग श्रीवस्तीला जाऊन तथागतांची मावशी प्रजापती गौतमीचा विहार पाहिला. याच नगरात गौतमांनी, ज्ञानप्राप्तीनंतर आपल्या वडिलांची भेट घेतली होती. या सर्व तीर्थस्थानांचं दर्शन घेऊन ह्युएन त्संग कपिलवस्तूला पोचले. प्रत्यक्ष बुद्धदेवांचं हे जन्मस्थान. ते गाव उजाड झालेलं होतं, जुन्या खुणा भग्नावस्थेत होत्या. राजा शुद्धोधनाचा महाल, राणी महामायाचा शयनमहाल होता, तिथे विहार बनवला होता, आणि त्यांची मूर्ती त्यात होती. तुमचा हा पुत्र बुद्धपदाला पोचेल हे असित ऋषींनी राजकुमारांचं भविष्य सांगितलं होतं. जेव्हा बुद्धदेवांचा जन्म झाला तेव्हा शुद्धोधन राजाने ज्योतिषांना बोलावून आपल्या या पुत्राचं भविष्य विचारलं होतं. तेव्हा त्यांनी सांगितलं की हा तुझा पुत्र चक्रवर्ती तरी होईल किंवा संसार त्याग करून संन्यासी झाला तर बुद्ध होईल..मग ह्युएन त्संग यांनी, बुद्धदेव जिथे कला-कौशल्य शिकत होते त्या जागेला भेट दिली. मग ते लुंबिनी वाटिकेत पोचले. बाळंतपणासाठी माहेरी निघालेल्या मायादेवींना वाटेतच याच जागी प्रसववेदना सुरु झाल्या होत्या. याच ठिकाणी महाराणी माया प्रसूत होऊन पुत्र जन्मला होता. आपल्या बाळाचं नाव त्यांनी सिद्धार्थ ठेवलं होतं. सिद्धार्थ ज्या ठिकाणाहून सर्वसंग परित्याग करून बाहेर पडले, तिथेही एक विहार होता. वाटेत त्यांनी एका मंदिराला भेट दिली. आख्यायिका अशी होती

की शुद्धोधन जेव्हा लुंबिनीहून बाळाला बघून परत येत होते तेव्हा या मंदिरात आले. इथे खूप लोक येतात आणि देवाकडे याचना करतात, आणि ती लगेच पूर्ण होते, असं त्यांनी ऐकलं होतं, म्हणून आपल्या नवजात पुत्राला इथे आणावं असं शुद्धोधन राजाला वाटलं. इतक्यात त्यांची दाई बाळाला घेऊन आलीच.. तेव्हा त्यांना एक चमत्कार दिसला. दाई मंदिरात पोचल्याबरोबर ईश्वराची ती मूर्ती स्वयं बाळाजवळ आली आणि बाळ गेल्यावर परत आपल्या जागी गेली.

कपिलवस्तू पाहून हयुएन त्संग परत प्रवासाला लागले आणि कुशीनगरला पोचले.

हा सारा गाव उध्वस्त झालेला होता. ज्या चूंडा नावच्या माणसाने बुद्धदेवांच्या पूजेसाठी विहीर खोदून दिली त्याचं भग्न भवन होतं आणि विहीर होती, ती मात्र पाण्याने भरलेली होती. गावाच्या वायव्येला शाल वृक्षांच्या बागेत गेले. तिथे त्यांना ४ खूप उंच शालवृक्ष दिसले..तिथे एक विहार दिसला. बुद्धदेवांच्या अंतिम क्षणांची ती जागा होती. त्यात निर्वाणदशा दाखवणारं चित्र होतं. त्यात बुद्धदेव उत्तरेकडे मस्तक करून झोपले होते. जवळच एक विहार आणि एक स्तंभ होता, त्यावर बुद्धदेवांच्या निर्वाणाच्या वेळचा प्रसंग लिहिलेला होता, पण तारीख नव्हती. त्यावेळी त्यांचं वय ८० वर्षे होतं, पण महिना, दिवस याबद्दल मतभिन्नता होती.

तिथून जवळच एक अग्निनाशक स्तूप होता. एका पूर्वजन्मी बुद्धदेव तितर पक्षी होते. एकदा त्या वनात वणवा पेटला आणि प्राणी मरायला लागले, तेव्हा या तितरने आपल्या पंखाने पाणी शिंपडायला सुरुवात केली. ते पाहून

इंद्रदेव हसला आणि त्याने स्वत: आग विझवली, त्या कथेवर आधारित तो स्तूप बांधला गेला होता. तिथे आणखी एक स्तूप होता. जेव्हा भगवान बुद्धांचा अंतिम क्षण निकट आला, तेव्हा चहूकडे विलक्षण तेजस्वी प्रकाश पसरला. तेव्हा लोक शोक करू लागले आणि आता या जगाला आश्रय कोण देईल म्हणून रडू लागले. तेव्हा भगवान बुद्ध उजव्या कुशीवर वळले आणि त्यांनी सर्व भक्तांना उपदेश केला की रडू नका. हा धर्म कायम राहील. त्यात फेरफार होणार नाहीत, तुम्ही आळस सोडा, आणि व्रताचरण करत रहा. जेव्हा भगवानांचा अंत झाला तेव्हा त्यांची माता महामायाराणी स्वर्गात दु:खाने शोक करू लागली आणि स्वर्गीय शरीराने आपल्या पुत्राजवळ शाल वृक्षाजवळ आली. बुद्धदेवांचा दंड, वस्त्र आणि पात्र छातीशी धरून रडू लागली आणि बेशुद्ध झाली. तेव्हा बुद्धदेवांनी आपल्या मातेला शांत केलं. नगरापासून उत्तरेला ३०० पावलांवर एक स्तूप होता, तिथे भगवानांचा अग्निसंस्कार झाला. मग सर्व भक्तांनी सात बहुमूल्य धातूंची पालखी बनवली. त्यावर सुंदर छत्र केलं. त्यात बुद्धदेवांचा देह अनेक सुंदर वस्त्रात लपेटून पालखीत ठेवला. ती पालखी मल्ल लोकांनी उचलली आणि हिरण्यवती नदी पार कारून स्मशानात नेली. तिथे सुगंधी द्रव्ये फुलं यात त्या देहाला अग्नि देण्यात आला. पण चमत्कार असा की अग्नि शांत झाल्यावर भगवान बुद्धांचा देह, वस्त्र, नखं, केस जळलेच नव्हते. ते सर्व अवशेष भक्तांनी गोळा केले.

त्याचवेळी तिथे कश्यप आले आणि त्यांनी भगवानांचं दर्शन घेण्याची इच्छा प्रगट केली. पण बुद्धदेवांचा देह तर हजार वस्त्रांमध्ये लपेटला गेला होता.

तो कसा दाखवायचा या चिंतेत शिष्यगण असतांना चमत्कार झाला. अचानक बुद्धदेवांनी आपला पाय बाजूला करून कश्यपांना दर्शन घडवलं. असं तीन वेळा बुद्धदेव सजीव झाले. पहिल्यांदा, जेव्हा त्यांना पालखीत ठेवलं गेलं तेव्हा त्यांनी आपला हात बाजूला करून, सर्व ठीक आहे ना, असं आपला शिष्य आनंदाला विचारलं, एकदा आपल्या मातेला मायाराणीसाठी, आणि एकदा कश्यपांसाठी. बुद्धदेवांचं निर्वाण झाल्यावर त्यांचे अवशेष सर्व भक्तांनी पूजेसाठी नेले. त्या अवशेषांचे तीन भाग केले. एक देवलोकांसाठी, एक भक्तांसाठी आणि एक भाग आठ राजांसाठी वाटले गेले. या सर्व प्रसंगाचं वर्णन त्या स्थळाच्या समोरच्या स्तंभावर लिहून ठेवलं गेलं.

कुशीनगरचं दर्शन, सर्व स्तूप पाहून हयुएन त्संग वाराणसीकडे निघाले. वाराणसीत त्यांना गंगेचं दर्शन झालं. नगर दाट लोकवस्तीचं, सुखवस्तू लोकांचा आणि हीनयान पंथाच्या भिक्षूंचं होतं. इथले लोक विद्याचरणी, सौम्य स्वभावाचे होते. बौद्धांची संख्या इथे कमी होती. इथल्या ३० विहारांमध्ये ३००० भिख्खू राहत होते. त्या नगरातील १०० मंदिरांमद्धे विविध धर्मांचे १०,००० भक्त राहात होते. ते सदैव शंकराच्या आराधनेत व्यग्र होते. त्यातील काही भस्म लावलेले, काही दिगंबर, काही जटाधारी, काही मुंडण केलेले भाविक होते. महेश्वराची मूर्ती १०० फूटांपेक्षा थोडी कमी, तांब्याच्या धातूची होती. मंदिराच्या सभोवती वृक्षांची गर्द छाया होती. मंदिराभोवती पाणी खेळवलेलं होतं. गर्द वनराई, शांत परिसर यामुळे तिथे प्रसन्न वातावरण होतं. हयुएन त्संग यांनी वाराणसीमधले सर्व स्तूप पाहिले आणि विहारांना भेटी दिल्या. यानंतर हयुएन त्संग सारनाथला

गेले. सारनाथची मृगराजाची आख्यायिकाही त्यांनी लिहून ठेवली. इथेच बुद्धदेवांनी आपल्या पहिल्या पाच शिष्यांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली होती.

वाराणसीवरून गाजीपूर ओलांडून हयुएन त्संग वैशालीत पोचले. हीच ती नगरी, जिथे तथागतांनी नगरवासी विमलकीर्तीला सूत्राचा उपदेश केला होता. ते वरचेवर या नगरीत वास्तव्याला येत असत. बुद्धांच्या मावशीने आणि शिष्यांनी निर्वाण प्राप्त केलं होतं. आणखी एक स्तूप होता, जिथून मगधाला जातांना त्यांनी वैशाली नगरीवर शेवटचा कटाक्ष टाकून अखेरचं दर्शन घेतलं होतं. तिथे असलेल्या आम्रवनात आपल्या निर्वाणाचा संदेश दिला होता. वैशालीतील भगवानांच्या पवित्र स्मृतींचे स्तूप-विहार पाहात पाहात काही डोंगर-घाट ओलांडून ते नेपाळला पोचले.

नेपाळमध्ये त्यांनी थोडेच दिवस मुक्काम केला आणि मग वैशालीमार्गे मगधाला पोचले. मगध म्हणजेच पाटलीपुत्र. महाभारतातील जरासंघाचं राज्य. मौर्यकुलाच्या सम्राट अशोकाच्या प्रचंड साम्राज्याची राजधानी. हयुएन त्संग त्या राजधानीचा उल्लेख कुसुमपूर करतात. कारण इथला मौर्य कुळातील, बिंबीसाराचा पणतू, अजातशत्रू राजा फुलांचा वेडा होता म्हणून त्या नगरीला कुसुमपूर म्हटलं होतं. अत्यंत सुपीक जमीन, इथले सुगंधी तांदूळ फार लोकप्रिय होते. वर्षा ऋतूत इथे इतकं भरतं की शिशिर ऋतूपर्यंत लोक नौकेतून येजा करतात असं त्यांना कळलं. या गावाचं कुसुमपूरचं नाव पाटली वृक्षांमुळे पाटलीपुत्र असं झालं.

ह्युएन त्संग, सम्राट अशोकाचा बौद्ध धर्माकडे वळण्याच्या घटनेची कहाणी लिहून ठेवली. या देशाचा, मौर्य राजवंशाचा सार्वभौम सम्राट अशोक हा गादीवर आला तेव्हा अत्यंत क्रूर होता. प्राणी आणि लोकांना छळण्यासाठी त्याने नरकगृह बनवलं होतं. तिथे उंच भिंतींच्या आत, मोठ्या मोठ्या भट्ट्या होत्या. त्यावर तापलेल्या कढया तेलाने उकळत असायच्या. या नरकगृहाच्या दारावर क्रूर अधिकारी नेमले होते. ते गरीब भोळ्या लोकांना या तप्त कढईत घालत असत. आणि त्याची मजा घेत असत. एकदा एक श्रमण, बौद्ध भिख्खू, हिंडत हिंडत तिथे आला. त्याला या दुष्ट लोकांनी पकडून नरकस्थानात आणला आणि त्याला त्या गरम भट्टीत टाकणार होते. तेव्हा त्या धर्मशील भिक्षुने थोडा वेळ मागितला. इतक्यात दुसऱ्या एका माणसाला पकडून आणून त्या क्रूरांनी त्या भट्टीत टाकलेला त्या भिक्षुने पाहिलं. ती अवस्था आपलीही होणार हे त्याला लगेच कळलं. सर्व काही क्षणभंगुर आहे हा, भगवान बुद्ध यांचा उपदेश त्याला लगेच समजला आणि तो अर्हट – निर्वाण पदाला पोचला. तो जन्म-मरणाच्या बंधनातून मुक्त झाला. त्यामुळे जेव्हा त्या लोकांनी या भिख्खूला त्या गरम कढईत टाकलं त्याबरोबर ते कढई-तेल सर्व शीतल होऊन गेलं आणि तिथे एक कमळ निर्माण झालं आणि त्यावर हाच अर्हट बसलेला सर्वांनी पाहिलं. हा चमत्कार पाहून सर्व थक्क झाले. तिथल्या अधिकाऱ्याने लगेच ही बातमी सम्राट अशोककडे पोचवली. तेव्हा अशोक राजा धावतच तिथे आला आणि तोही थक्क झाला.

पण त्यावेळी त्या नरकवासचे अधिकारी अशोक राजाला म्हणाले की राजन, आता तुम्हालाही या कुंडात टाकवं लागेल कारण तुम्हीच आज्ञा दिली होती की या नरकगृहातून कुणीही बाहेर जीवंत जाता कामा नये. तेव्हा सम्राट अशोक म्हणाला की, नक्कीच हा नियम लागू करायला हवा, पण माझ्या आधी तू इथे होतास म्हणून तुलाच त्या कढईत टाकायला हवं. असा म्हणून सम्राटाने आपल्या सेवकांना आज्ञा दिली ते अधिकारी मारले गेले. आणि नंतर अशोकाने तो नरकवास मोडून टाकला. ती भयंकर प्रथा बंद करून टाकली. तिथून जवळच एक स्तूप हयुएन त्संग यांनी पाहिला. सम्राट अशोकाने जे ८४००० स्तूप आपल्या आयुष्यात बांधले, त्यातला तो पहिला स्तूप होता. हा त्यावेळच्या राजभवनाच्या आत होता. यात बुद्धदेवांचे अवशेष ठेवलेले होते.

नंतर राजा अशोक उपगुप्त नावच्या धर्मगुरूला शरण गेला, त्यांचा शिष्य झाला आणि बुद्धदेवांचा भक्त झाला. राजा अशोक म्हणाला की पूर्वपुण्याई मोठी म्हणून मी राजा झालो, पण आता आजवर केलेल्या पापांमधून मुक्त होण्यासाठी अनेक स्तूप निर्माण करीन. हयुएन त्संग यांनी तो स्तूप पाहिला. तिथे जवळच एक पत्थर होता, त्यावर बुद्धदेवांची चरण चिन्हे उमटलेली होती, त्याचं दर्शन त्यांनी घेतलं. ती पदचिन्हे १८ इंच लांब आणि ६ इंच रूंद होती. दोन्ही पावलांवर चक्र चिन्ह होतं. जेव्हा भगवान महानिर्वणासाठी कुशीनगरला जायला निघाले तेव्हा त्यांनी आनंदाला सांगितलं होतं की मी जिथे आत्ता उभा आहे त्या दगडावर माझी पदचिन्हे उमटतील. १०० वर्षांनी इथे अशोक नावाचा राजा जन्म घेईल. तो इथे राजधानी बनवेल आणि या चरणचिन्हांचं रक्षण करेल.

भगवान म्हणाले तसंच घडलं. २०० वर्षांनी राजा अशोकाचा जन्म मौर्य घराण्यात पाटलीपुत्रात झाला. त्याने बौद्ध धर्म स्वीकारला आणि या शीळेच्या रक्षणासाठी राजगृह उभारला. सम्राट रोज या चिन्हांची पूजा करत असे. अशोकानंतर जे राजे झाले त्यांनी हा दगड हलवण्याचा खूप प्रयत्न केला, पण तो किंचितही हलला नाही..हयुएन त्संग एकेक स्थळांना भेट देत असतांना जातक कथाही त्यांना आठवत गेल्या. हयुएन त्संग तिथून गयेला गेले.

बुद्धदेव ज्या प्राग्बोधी पर्वतावरून खाली आले आणि जिथे जिथे ते गेले त्या सर्व ठिकाणी सम्राट अशोकाने स्तूप बांधले. त्या सर्वांचं दर्शन घेऊन हयुएन त्संग गयेहून बोधिवृक्षाच्या स्थळाजवळ गेले. सम्राट अशोक जेव्हा राजा झाला तेव्हा त्याचा या बौद्ध धर्मावर विश्वास नव्हता, म्हणून त्याने बुद्धांच्या सर्व स्मृती नष्ट करण्याची आज्ञा दिली. त्यात बोधिवृक्षही होता. तो स्वत: सेनेला घेऊन वृक्षाजवळ आला. त्या वृक्षाची मुळं, शाखा, पानं, सगळं तोडून त्याने लांब फेकून तिथे ढीग करून ठेवला. मग तो सर्व ढीग त्याने जाळून टाकण्याची आज्ञा दिली, त्याबरोबर तसाच एक वृक्ष त्या ठिकाणी उत्पन्न झाला. त्याला भस्म बोधिवृक्ष नाव पडलं.

हा चमत्कार पाहून सम्राट अशोकाला परम आश्चर्य वाटलं. त्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला आणि कापून थकलेल्या मुळांना त्याने सुगंधी दुधाने शिंपायची आज्ञा दिली. दुसरे दिवशी सकाळी त्याने पाहिलं तेव्हा पाहिल्यासारखाच एक वृक्ष तिथे उगवला होता. त्यामुळे अशोकाला बौद्ध धर्माबद्दल कमालीची ओढ वाटली. तो तिथे इतका रमला की घरी जाणं

विसरला. सम्राटाची अशोकाची राणीसुद्धा बौद्ध धर्माची द्वेष्टी होती. तिने गुप्तपणे रात्री आपल्या सेवकला पाठवून ते नवीन उगवलेलं रोप नष्ट करायला सांगितलं. सकाळी सम्राटाने परत त्या जागी भेट दिली तेव्हा ते नवीन रोप नष्ट झालेलं त्याला दिसलं आणि परम दु:ख झालं. सम्राटाने परम भक्तीने त्या जळक्या झाडावर सुगंधी दूधाचा शिडकावा केल्यावर परत ते झाड बहरलं तेव्हा अशोकाने त्या वृक्षभोवती १० फूट उंच भिंती बांधून त्या नववृक्षाचं संरक्षण केलं. हयुएन त्संगनी त्या बोधिवृक्षाची ती भिंत पाहिली. वैशाख, शुक्ल अष्टमीला बुद्धदेवांना संपूर्ण ज्ञान प्राप्त झालं, तेव्हा ते ३० वर्षांचे होते. कुणी ३५ वर्षांचे होते असं म्हणतात..या बोधिवृक्षाखाली भगवान ७ दिवस बसले होते. जरासुद्धा हलले नव्हते. जेव्हा त्या जागेवरून उठले तेव्हा पूर्व पश्चिम १० पावले ते चालले, त्या जागी फुले उमलली होती अशी कथा होती. या जागी येऊन भक्त मंडळी चालतात आणि पावले जास्त भरली तर आपलं आयुष्य जास्त आणि कमी भरली तर कमी अशी त्यांची श्रद्धा होती. बोधिवृक्षाच्या आग्नेय दिशेला एक स्तूप होता तिथे बुद्धदेवांची बैठी मूर्ती होती. संपूर्ण ज्ञान प्राप्त झाल्यावर भगवान विचारात पडले की माझा उपदेश कोण धारण करेल, तेव्हा याच ठिकाणी ब्रहमदेवांनी गौतमबुद्ध यांना चक्र अर्पण केलं होतं. याच भागात स्वर्गातून खाली उतरलेल्या आपल्या मातेला महामायाराणीला त्यांनी उपदेश केला होता. जवळपासच्या सर्व भागांचं, जिथे जिथे बुद्धदेवांचा पदस्पर्श झाला होता, जिथे त्यांनी स्नान केलं, विहार केला, निद्रा केली, उपदेश केला, त्या सर्व स्थळांना, स्तूपांना आणि विहारांना, निरंजन नदी, त्या जंगल-डोंगर-गुहा, त्या सर्वांचं हयुएन त्संग यांनी तपशीलवार वर्णन लिहून ठेवलं.

भगवानांच्या महानिर्वाणानंतर सर्व शिष्यांनी त्यांच्या उपदेशाचा लिखित स्वरूपात संग्रह केला. सूत्रपिट्टक, अभिधम्मपिट्टक, धारणापिट्टक, विनय पिट्टक, सन्निपात निकाय, अशा पाचही पिट्टकांचा पुस्तक संग्रह ज्याठिकाणी ठेवला होता, त्या बृहत सभा स्थळालाही भेट दिली. सर्व पवित्र स्थलं हयुएन त्संग यांना तीर्थस्थानांसारखी होती. या सर्व स्थळांच्या भेटीने प्रत्यक्ष बुद्धभगवानांची भेट त्यांनी अनुभवली होती. इथून पुढे त्यांचा प्रवास चालू झाला तो नालंदा नगरीशी थांबला.

६३७ सालात नालंदा मठात शिरले तेव्हा तिथे त्यांचं भव्य स्वागत झालं. मग नालंदाचे अत्यंत वृद्ध प्रमुख शीलभद्र यांनी हयुएन त्संग यांचं स्वागत केलं. पुढील २ वर्षे ह्युएन त्संग यांनी त्यांच्याच हाताखाली मार्गदर्शन घेतलं. नालंदा हा एक उद्यानाचा परिसर होता. बौद्ध संप्रदायाचं विश्व विख्यात विद्यालय. इथे अनेक देशातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी येऊन राहत. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह ही गुरुकुल व्यवस्था इथे होती. १० लाख सुवर्ण मुद्रांना हा परिसर ५०० व्यापाऱ्यांनी विकत घेतला आणि गौतम बुद्धांना दिला. भगवानांनी इथे 3 महिने ज्यांना धर्मशास्त्र शिकवलं ते सर्व अर्हट पदाला पोचले. हयुएन त्संग यांनी इथे राहून अनेक धार्मिक ग्रंथांचा मजकूर लिहून घेतला. नालंदा मधे ते २ वर्षे राहिले. ह्यूएन त्संग तिथे पोचले तेव्हा १०,००० विद्यार्थी तिथे अभ्यासाला राहात होते. ह्यएन त्संगनी मग तिथे हिंदू आणि बौद्ध संप्रदायाचा सखोल अभ्यास केला.

भगवानांच्या महानिर्वाणानंतर गुप्त राजवंशाच्या कुमारगुप्त राजाने या जागी बौद्ध अभ्यासाचं विद्यापीठ उभारलं. त्या राजाच्या पुढील वारसांनी त्यात भर घालत त्याचा खूप विस्तार केला. सम्राट हर्षवर्धनाने १०० गावांचा महसूल या विद्यापीठासाठी लावून दिला होता. विविध शास्त्रांचा इथे अभ्यास चालत असे. प्रत्येक स्तूप, विहार, त्याच्या बुद्धदेवांशी जोडलेल्या कहाण्या ऐकत, हयुएन त्संग आता मोगिरमधे एक वर्ष राहून, चंपा, आसाम, पूर्वबंगाल, कालिंग, कोसल, आंध्र, चौल, कांचीपुरम, कुंभकोणम- या राज्यातील विहारांना भेट देत, बौद्धसंप्रदायाचा अभ्यास केला. आंध्रमद्धे अमरावती आणि नागार्जुकोंडा इथल्या स्तूपांना भेट दिली. ते कांचीपुरमला पोचले. हे धर्मपाल बोधिसत्त्वचं जन्मस्थान. इथल्या प्रधानमंत्र्याचा हा पुत्र होता. त्याचं लग्नाचं वय झालं तेव्हा त्याचे आई वडील वधू शोधायला लागले आणि त्यांनी पुत्राचा विवाह निश्चित केला. पण त्याला लग्न करण्याची इच्छा नव्हती. तो तथागतांचा भक्त होता. जसजशी लग्नाचे घटिका जवळ आली, तसतसा तो अधिक दु:खी होऊ लागला आणि लग्न टाळण्यासाठी भगवानांच्या मूर्तीसमोर प्रार्थना करत बसला. तेव्हा एक चमत्कार झाला, आणि अज्ञात शक्तींनी त्याला उचलून दूर डोंगरांमधल्या बौद्ध मंदिरात नेऊन ठेवलं. जेव्हा आपला नवरदेव पुत्र सापडत नाही हे वडिलांना कळलं तेव्हा त्याच्या शोधार्थ त्यांनी माणसं पाठवली. इकडे त्या मंदिराचा पुजारी जेव्हा आत आला तेव्हा त्याने या मुलाला पाहिलं आणि माहिती विचारली. नंतर धर्मपाल बोधिसत्त्व पूर्णपणे संन्यास वृत्तीने राहायला लागला. बौद्ध धर्माचा त्याने खूप अभ्यास केला.

हयुएन त्संग कांचीपुरमला असतांना दोन बौद्ध भिक्षू आणि त्यांच्याबरोबर ३०० धर्मगुरू हयुएन त्संग यांच्या भेटीला श्रीलंकेहून आले. यावेळी श्रीलंकेचा राजा मरण पावला होता आणि राज्यात मोठा दुष्काळ होता. या जंबुद्वीपात सुबत्ता आहे, शांती आहे, आणि बुद्धांचं जन्मस्थान आहे म्हणून आम्ही आपल्या भेटीला आलो असं कारण त्यांनी दिलं. त्यामुळे हयुएन त्संग यांची सिंहल देशाला जाण्याची इच्छा पूर्ण झाली नाही. पण त्यांनी त्या देशातील तपशीलवार माहिती या धर्मगुरूंना विचारून घेतली. सिंहलद्वीप नावाची जन्मकथाही त्यांनी विचारून घेतली. ती कथा अशी होती एकदा जंगल पार करणाऱ्या लोकांनी, जंगलातील सिंहाची डरकाळी ऐकून घाबरून आपल्याबरोबर असलेल्या स्त्रीला जंगलात सोडून पलायन केलं, तेव्हा त्या सिंहाने काही फळं आणून तिच्यासमोर टाकली आणि तिचं रक्षण केलं. या सिंह आणि एक स्त्री यांच्या संयोगातून तिला एक पुत्र आणि एक कन्या झाली. हा सिंह आपल्या कुटुंबाबरोबर राहत होता. पण जेव्हा त्या मुलाला आपली जन्मकथा कळली तेव्हा तो आई आणि बहिणीला घेऊन दुसऱ्या गावात राहायला गेला. सिंहाला घरी आल्यावर कुटुंब दिसेना तेव्हा तो त्यांच्या शोधार्थ जोरात डरकाळ्या फोडत हिंडू लागला.

त्यामुळे गावातील सर्व भयभीत झाले. तेव्हा तिथल्या राजाने जो कुणी या भयंकर सिंहाला मारेल त्याला भरपूर सोन्याची नाणी देण्याची घोषणा केली. तेव्हा या पुत्राने ते आव्हान स्वीकारलं. तो आईला म्हणाला की आपल्याला इथे पाहून माझा बाप आपल्याला मारणारच, त्यापेक्षा मीच मारतो आणि या

लोकांची भीती संपवतो.असं म्हणून तो बापाला भेटायला गेला आणि जवळ जाऊन या पुत्राने आपल्या बापाला म्हणजे सिंहाला मारलं. आधी आपल्या पुत्राला पाहून आनंदित झालेला तो सिंह मुलाने मारल्यावर मात्र शांत पडून राहिला आणि मेला. म्हणून तिथल्या राजाने सोन्याची प्रचंड नाणी देऊन देश सोडायला सांगितलं. तेव्हा दोन नावांमधून तिघे जात असतांना वादळामुळे बोट फुटली. आई आणि मुलगा एका बेटावर पोचले. त्या निर्जन बेटावर त्या मुलाने बाहेरच्या लोकांना आणून मनुष्य वस्ती वाढवली. ते रत्नांच्या खाणीचं बेट होतं. त्या सिंह आणि स्त्रीच्या मुलाच्या नावावरून त्या बेटाला **सिंहलद्वीप** नाव पडलं. बोट फुटल्यावर, त्या मुलाची बहीण, समुद्रात वाहात जाऊन पर्शियाच्या किनाऱ्याला लागली. तेव्हा तिथल्या गुंडांनी तिच्याशी विवाह केला. तिला खूप मुली झाल्या. त्यांचा जो वंश वाढला, त्यावरून तिथल्या स्त्रियांना **पाश्चिमात्य स्त्रिया** असं लोक म्हणू लागले. हयुएन त्संग यांनी मग ही कथा लिहून ठेवली. श्रीलंकेतील मठ, विहार, तथागतांचा दात याचीही माहिती लिहून ठेवली.

कांचीपुरमहून ते मलबार घाटाने प्रवास करू लागले आणि महाराष्ट्रात आले. ते कंकणपूरावरून महाराष्ट्रात आले. त्यावेळी पुलकेशी राज्य करत होता. हा अत्यंत शूर आणि लोकप्रिय होता. हयुएन त्संग यांनी लिहून ठेवलं आहे की सम्राट हर्षवर्धन पुलकेशीला हरवू शकला नाही. महाराष्ट्राबद्दल त्यांनी वर्णन लिहून ठेवलं की इथली भूमी सुपीक आहे, इथले लोक साधे, इमानदार आणि वीरतापूर्ण स्वभावाचे आहेत. ते उपकारकर्त्यावर जेवढी कृतज्ञता दाखवतात, तितकंच शत्रूला पीडित करणंही उत्तम प्रकारे जाणतात. दुःखी

व्यक्तीसाठी सर्वस्व अर्पण करायला तयार असतात पण अपमानाचा बदला घेतल्याशिवाय राहत नाहीत. शत्रूवर हल्ला करताना शत्रूला सांगून करतात. पण भूमीवर पडलेल्या आणि शरण आलेल्या शत्रूला मारत नाहीत. हे लोक विद्याप्रेमी आहेत. इथे बौद्ध संप्रदायाचे दोन्ही पक्ष खूप आहेत. इथले राजेलोक हत्ती पाळतात. मग त्यांच्यासमोर कोणताही शत्रू टिकत नाही.

महाराष्ट्रातील अजिंठा लेणी त्यांनी पाहिली नाहीत. ते गुजरातच्या दिशेला वळले आणि नर्मदा नदी ओलांडून भरूचला पोचले. भरूच हिंडून ते सुजलाम सुफलाम माळव्याला पोचले. माळव्यातील धार्मिक, अभ्यासू, जिज्ञासू लोकांच्यात राहून, त्यांची भाषा सुस्पष्ट, मनोहर, आणि यांची विद्वत्ता विशुद्ध आणि परिपूर्ण आहे. भारतात माळवा आणि मगध हे दोनच देश विद्वत्तेसाठी प्रसिद्ध आहेत हे त्यांनी लिहून ठेवलं. माळव्याचा शिलादित्य राजा खूप विद्वान, बुद्धिमान, दयाळू, सदाचरणी होता. जंतूनाही त्रास होऊ नये म्हणून आपल्या हत्ती घोड्यांच्या पोटातही जंतू जाऊ नयेत म्हणून त्यांना पाणी गाळून पाजत असे. आपल्या राजभवनाजवळ विहार बांधून तिथे मोक्ष परिषद आयोजित करत असे. देशभरचे विद्वान तिथे येत. त्यांना अमूल्य रत्न, वस्त्र देऊन तो त्यांचा सत्कार करत असे.

माळव्यावरून हयुएन त्संग कच्छ, वलभी, सौराष्ट्र, गुजर, उज्जयनीला पोचले. मग खूप हाल सोसत, सबंध वाळवंट पार करत, सिंधू नदी ओलांडत त्यांनी सिंध देश गाठला. एकच वशीण्ड असलेले उंट, लाल रंगाचं मीठ आणि लोहाणा जमातीच्या या देशाचं दर्शन घेऊन मुलतानला पोचले. तिथल्या सुवर्ण

आणि बहुमोल रत्नांनी मढवलेल्या प्रसिद्ध सूर्यमंदिराचं दर्शन घेतलं. तिथून पर्वत राज्यात आले. तिथे काही महिने राहिले. तिथून पर्वत राज्यात आले आणि मग परत मगध राज्याच्या मार्गाने नालंदा विद्यापीठात पोचले.

नालंदामध्ढे त्यांनी चारही वेद, खगोलशास्त्र, गणित, ज्ञानाच्या इतर शाखांचा अभ्यास केला. २ वर्षे ते इथे राहिले. तिथून ते यष्टीवनात जयसेन नावाच्या शास्त्रीकडे गेले आणि नंतर तिथेच राहिले. तिथे असतांना त्यांना एका रात्री स्वप्न पडलं. त्या स्वप्नात त्यांनी सबंध नालंदा परिसर उद्ध्वस्त झालेला पाहिला. मग ते एका महाद्वाराने आत शिरले आणि एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावर पोचले. त्याठिकाणी सुवर्ण वर्णाचा पुरुष उभा होता. हयुएन त्संग वर चढायचा प्रयत्न करायला लागले पण त्यांना मार्ग सापडेना, तेव्हा त्यांनी त्या सुवर्ण वर्णी पुरुषाला मदत करण्याची विनंती केली. त्यावर तो पुरुष म्हणाला की, मी मंजुश्री बोधिसत्त्व आहे. तुझ्या हातून या ठिकाणी पोचण्याइतकं कार्य झालेलं नाही. असं म्हणून त्या पुरुषाने आपलं बोट एका दिशेने केलं आणि हयुएन त्संग यांना तिकडे बघायला सांगितलं.. जेव्हा त्यांनी त्या दिशेने पाहिलं, तेव्हा त्यांना मोठा वणवा पेटलेला दिसला. त्या मोठ्या आगीत सगळी घरं जाळून राख झाली होती. तेव्हा तो पुरुष हयुएन त्संग यांना म्हणाला की आणखी १० वर्षांनी शिलादित्य राजा मृत्यू पावणार आहे, म्हणून लगेच तुला त्याच्याकडे जायला हवं. एवढं बोलून ती आकृती नाहीशी झाली. आणि हयुएन त्संग लगेच जागे झाले. सकाळी त्यांनी हे स्वप्न जयसेनाला सांगितलं. आणि खरंच तसंच झालं. १० वर्षांनी शीलादित्य – हर्षवर्धन सम्राटाचा स्वर्गवास झाला. त्यानंतर

देशात मोठा दुष्काळ पडला. अनेक लोक त्यात मरण पावले. जयसेनाकडे राहत असतांना त्यांनी गयेला दरवर्षी भगवान बुद्धांच्या शरीराचे अवशेष आणून त्यांचं देशभरातील उपासकांनी दर्शन घ्यायची प्रथा होती, ते अवशेष पाहायला गेले. तिथे त्यांना शेंगांच्या आकाराचे, तांदळाच्या दाण्याएवढे त्वचेचे भाग आणि लहान मोठ्या अस्थि पाहायला मिळाल्या.

त्यावेळी आणखी एक घटना घडली. सम्राट हर्षवर्धन कलिंगच्या मोहिमेवर असतांना त्यांना काही हीनयान पंथीय भेटले. त्यांचा महायान विचारांना विरोध होता. त्यांनी एका दक्षिणी प्रज्ञागुप्त नावच्या पंडिताने लिहिलेले ७०० श्लोकांचे काव्य हर्षवर्धनाला दाखवले. त्यात महायनविरूद्ध मजकूर लिहिला होता. म्हणून हर्षवर्धनानेच निर्णय घेतला आणि नालंदाच्या शीलभद्र यांना पत्र लिहिलं की मी महायान आणि हीनयान या दोन शाखांची परिषद भरवणार आहे, तेव्हा तुमच्याकडील सर्वज्ञानी असे ४ धर्मगुरू माझ्याकडे पाठवावेत. त्या चौघांमध्ये शीलभद्र यांनी हयुएन त्संग यांची निवड केली होती आणि सम्राटाच्या इच्छेप्रमाणे त्यांना कान्यकुब्जाला जायचं होतं०

नालंदामध्धे अभ्यास चालू असतांना तिथे कामरूप ( आसाम) देशाच्या कुमार राजाकडून स्वत:ला लोकातीय शाखेचा पंडित समजणारा एक अति विद्वान नालंदाला आला. त्याने आपले विचार नालंदा मंदिराचा द्वारावर लावले आणि घोषणा केली की जो कुणी माझे विचार खोडून काढेल त्याला मी माझं मस्तक अर्पण करीन. हयुएन त्संग यांनी ते कागद वाचले आणि आपल्या सेवकाला फाडून टाकायला सांगितलं. मग त्या पंडिताची आणि हयुएन त्संग

यांची जी चर्चा झाली, त्याने तो भिख्खू प्रभावित झाला. त्या ब्राह्मणाने कुमार राजाजवळ त्यांची खूप स्तुति करून आपल्याकडे त्यांना बोलवा अशी विनंती केली. त्यावरून कुमार राजाने नालंदा अधिपति शीलभद्र यांना विनंती केली आणि ह्युएन त्संग यांना आमच्याकडे पाठवा असा निरोप घेऊन एका दूताला पाठवलं. पण त्याचवेळी हर्षवर्धन राजाने त्यांना आपल्या दरबारात मोठ्या सभेचा आयोजन करून महायान-हीनयान यावर चर्चा करण्यासाठी ह्युएन त्संग यांना आमंत्रण दिलं होतं. म्हणून शीलभद्रांनी ती विनंती नाकारली. त्याचा कुमार राजाला खूप राग आला. त्याने शीलभद्र यांना धमकीचं पत्र लिहून मी सैन्य पाठवून त्यांना पकडून माझ्याकडे घेऊन येईन असा परत निरोप पाठवला. तेव्हा ह्युएन त्संग आणि शीलभद्राचा नाईलाज झाला. त्याचवेळी आणखी एक घटना घडली. त्यानंतर मात्र ह्युएन त्संगचा परतीचा विचार सुरू झाला.

ते आपल्या मठीत बसलेले असतांना वज्र नावाचा, निरग्रंथ दिगंबर ( जैन उपासकाला निर्ग्रंथी म्हणत असत ) उपासक आत आला. निरग्रंथी उपासक भविष्यवेत्ते असतात हे ह्युएन त्संग यांना माहीत होतं. म्हणून त्यांनी आपला मातृदेशी परत जाण्याचा विचार सांगितला आणि प्रवास सुखरूप होईल ना, आणि आपलं आयुष्य किती शिल्लक आहे असं विचारलं. तेव्हा निरग्रंथाने हातात एक खडू घेतला, जमिनीवर एक आकृती काढली, त्यावर विचार करत तो म्हणाला की, तुम्हाला अजून दहा वर्षे आयुष्य आहे, तुम्ही इथे राहाल तर सर्वांना आनंदच आहे, पण परत जाण्यासाठी वाईट काहीच दिसत नाही आहे. तेव्हा त्संग यांनी विचारलं की माझ्याबरोबर मी खूप मौल्यवान पुस्तकं मूर्ती

आणि स्मृतिचिन्हं घेतली आहेत. ती माझ्या देशापर्यंत नीट पोचतील का ? तेव्हा वज्रने तुमचं प्रवास सुखरूप होईल असं सांगितलं. तुमच्या वस्तूंची काळजी घ्यायला आणि ती वाहून न्यायला शिलादित्य राजा आणि कुमार राजाने तुमच्यासाठी आधीच माणसे पाठवली आहेत असं म्हटलं, त्यावर त्संग म्हणाले की पण मी तर या राजांना ओळखतच नाही, तेव्हा उत्तर दिलं की कुमार राजाने तुम्हाला आमंत्रण देण्यासाठी आधीच दूत पाठवला आहे, ती २/३ दिवसात पोचेलच तुमच्याजवळ. असं म्हणून वज्र निघून गेल्यावर हयुएन त्संग यांनी आपल्या सर्व पुस्तकांचा आणि मूर्ती, प्रतिमा, स्मरणवस्तूंचा अंदाज घेतला.

हयुएन त्संग कुमार राजाकडे पोचले. एक महिना तिथे राहिले. राजाने त्यांचं भव्य स्वागत केलं. त्याचवेळी हर्षवर्धन राजा कलिंगच्या मोहिमेवरून परत येत असतांना, त्याला हयुएन त्संग कुमार राजाकडे गेले आहेत असं कळल्यावरून त्याला राग आला. मी इतक्यावेळा आमंत्रण देतो तरी माझ्याकडे आले नाहीत पण आता त्या राजाकडे कसे गेले असा प्रश्न विचारून त्यांनी कुमार राजाला तातडीने संदेश पाठवला आणि हयुएन त्संग यांना ताबडतोब माझ्याकडे पाठवा असा निरोप पाठवला. तेव्हा कुमार राजाने तेवढ्याच उद्दामपणे, मी माझं शीर पाठवीन पण त्यांना पाठवणार नाही असं उत्तर पाठवलं. त्यावर लगेच सम्राट हर्षवर्धनाने लगेच तुमचं शीर पाठवा, मी माझ्या दूताला पाठवतो असा निरोप पाठवला. तेव्हा कुमार राजा जरा नरम झाला आणि गंगेच्या तीरावर वास्तव्याला असलेल्या हर्षवर्धनाला भेटायला २०००० हत्ती आणि ३०००० फौज घेऊन निघाला. जिथे सम्राट हर्षवर्धन राहत होते तिथे हयुएन त्संग आणि कुमार राजा

पोचले. कुमार राजा हर्षवर्धनाला एकटाच भेटला तेव्हा सम्राटाने हयुएन त्संग का आले नाहीत, कुठे रहात आहेत असं विचारलं आणि मी त्यांना स्वत: भेटायला उद्या येईन असं सांगितलं. कुमार राजा आपल्या तळावर परत आला. हयुएन त्संग यांना सर्व वृत्तान्त सांगून म्हणाला की माझ्या अंदाजाप्रमाणे सम्राट आज रात्रीच येतील तेव्हा तुम्ही त्यांची भेट घेऊ नका. तेव्हा हयुएन त्संग यांनी, भगवान बुद्धांच्या शिकवणीप्रमाणेच मी वागीन असं स्पष्ट उत्तर दिलं. कुमार राजाच्या अंदाजाप्रमाणेच झालं. त्याच दिवशी रात्री नदीपात्रामद्धे हजारो मशाली दिसायला लागल्या. सम्राट हर्षवर्धनांच्या प्रत्येक पावलाला सुवर्ण चौघडे वाजत असत त्यांचा आवाज यायला लागला. ही टिपरी वाजवण्याची प्रथा फक्त हर्षवर्धन सम्राटांसाठी होती. इतर राजांना परवानगी नव्हती.

सम्राटांनी हयुएन त्संग यांना अभिवादन केलं आणि माझ्या आमंत्रणचा स्वीकार का केला नाही असं विचारलं. एवढ्या दुरून मी धर्मशास्त्राचा अभ्यास करायला आलो आहे, तो माझा अभ्यास झाला नव्हता, त्यामुळे मी आलो नाही. मग दुसरे दिवशी कुमार राजा आणि हयुएन त्संग सम्राटांच्या भेटीला गेले.

सम्राट हर्षवर्धन कलिंगला असतांना त्यांची हीनयान आणि महायान वरून तिथल्या भिख्खूंची चर्चा झाली होती. म्हणून हर्षवर्धन सम्राटांनी महायान-हीनयान शाखांच्या चर्चेवर परिषद आयोजित केली, आणि त्यावर बोलण्यासाठी देशातील सर्व बौद्ध अभ्यासकांना कान्यकुब्ज धर्म परिषदेसाठी आमंत्रित केलं. ३००० बौद्ध धर्मीय भिक्षू, ३००० इतर धर्मांचे पंडित, आणि नालंदाहून हजारभर अभ्यासक उत्सुकतेपोटी तिथे आले..या सभेत महायन

विरुद्ध हीनयान अशी वादविवाद चर्चा होणार होती, पण हयुएन त्संग यांच्या महायानाची बाजू मांडून झाल्यावर जैन, हिंदू धर्मपंडितांना पराभव मान्य करावा लागला. हयुएन त्संग याची हयुएन त्संग यांच्या अलौकिक विद्वत्तेमुळे सर्व धर्मपंडित खूश झाले० कान्यकुबजाची मोठी परिषद आनंदात पार पडली. हयुएन त्संग यांच्या विलक्षण बुद्धिमत्तेमुळे आणि निरुपणामुळे सर्व विरोधक नमले. पण त्यातील काही असंतुष्ट पराभूत पंडितांनी असूयेपोटी, हयुएन त्संग यांचा जीव घेण्याचा गुप्त कट आखला. तरीही सम्राटांच्या कानावर हे बातमी गेलीच. ज्यांच्या अंगावर शस्त्र सापडेल त्याला कठोर शिक्षा दिली जाईल अशी घोषणा केली, त्यामुळे बेरंग न होता धर्म परिषद पार पडली.

हयुएन त्संग यांच्या पांडित्याची कीर्ती भारतभरच नव्हे तर परदेशीही पोचली. त्यानंतर सम्राट हर्षवर्धनाने हयुएन त्संग यांचा सत्कार म्हणून त्यांना १०,००० सुवर्ण मोहोरा, ३०००० चांदीची नाणी, १०० तागे उत्तम मलमल कापडाचे दिले पण हे सर्व हयुएन त्संग यांनी सप्रेम नाकारलं. महायान संघाने त्यांना महायानदेव बिरुदाने आणि हीनयान संघाने मोक्षदेव या नावाने त्यांना सन्मानित केलं. मग सम्राट हर्षवर्धनाने एका मोठ्या सभागृहात, १८ देशांचा राजकुमारांना, १००० विद्वान इतर धर्मांच्या पंडितांना, ५०० विद्याविभूषित ब्राह्मणांना, २०० मंत्री मंडळींना, आसनस्थ व्हायला आमंत्रित केलं. त्यानंतर प्रत्येकाला सुवर्णाची एक थाळी, एक वाडगा, ७ पाण्याचे प्याले, एक दंड, धर्मोपदेशकाची ३००० सूती वस्त्रे, आणि ३००० सुवर्ण नाणी देऊन सत्कार केला. अशातऱ्हेने १८ दिवस चाललेली ही धर्म परिषद संपन्न झाली. त्यानंतर

हयुएन त्संग यांनी सर्व भिक्षुंचा निरोप घेतला आणि तेही मायदेशी जाणार होते, पण हर्षवर्धनाने दानधर्माचा सोहळा आणि प्रयागचा कुंभमेळा अनुभवण्यासाठी त्यांना प्रयागला चालण्याची विनंती केल्यावरून ते सम्राटांबरोबर गंगा-यमुनेच्या संगमावर पोचले.

तिथे सम्राट हर्षवर्धन यांचा दर ५ वर्षांनी साजरा होणारा दानधर्माचा कार्यक्रम संपन्न होणार होता. एका प्रचंड विस्तीर्ण दानभूमीवर शेकडो कोठारं बांधलेली होती. त्यात अगणित सुवर्ण-रौप्य, जडजवाहिराच्या अलंकारांच्या, मोठ्या राशी होत्या. सुवर्ण रौप्य मुद्रा होत्या, रेशमी सुती वस्त्रांचे तागे होते. दुसऱ्या भागात अन्नदानाची व्यवस्था होती. येणाऱ्या प्रवाशांच्या विश्रांतीसाठी लांबलचक इमारती होत्या. १८ देशांचे राजे तिथे जमले. जवळजवळ ५ लाख लोक जमा झाले होते. त्या सर्वांची निवास-भोजनाची अत्यंत चोख व्यवस्था होती. सम्राट आणि त्याचे १८ राजे मिरवणूकीने गंगानदीच्या विशाल पात्रातून श्रृंगारलेल्या नौकांमधून समारंभ स्थळी आले. मग ३ दिवस, गौतम बुद्ध, आदित्य, देवतांच्या प्रतिष्ठापनेचा समारंभ झाला. चौथ्या दिवशी प्रत्येक धार्मिक संस्थांना, १०० सुवर्ण मुद्रा, एक मौल्यवान मोती, एक सुती वस्त्र, तरतऱ्हेची खाद्य-पेयं, फुलं दिली गेली. पुढचे २० दिवस सर्व ब्राह्मणांना दानधर्म केला. पुढील १० दिवस धर्म विरोधकांना दानधर्म झाला. मग दूरवरून आलेल्या दान इच्छुकांना पुढील १० दिवस संतुष्ट करण्यात आलं. शेवटचा एक महिना सर्व गरीब, विधवा, रोगी, वृद्ध, अनाथ यांना दानाचा आनंद मिळाला. त्याशिवाय हर्षवर्धनाने आपले अंगावरचे दागिने मौक्तिकमाला, रत्नहार, अंगठ्या,

मुकुटातील जवाहीर हेही दान करून टाकलं. तोपर्यंत सम्राटाचा सर्व खजिना रिता झाला होता. सम्राटाने मग स्वत:साठी एक साधं वस्त्र आपल्या बहिणीकडे मागितलं आणि अंगावरचं रेशमी वस्त्रही दान देऊन टाकलं.

सर्व दिमाखदार सोहळा पार पडला. मग सम्राटाने बुद्ध मंदिरात जाऊन दर्शन घेतलं. आणि हात जोडून म्हणाला की ही सर्व दौलत एकेजागी सुरक्षित राहिली नसती. आता तिचं वाटप झाल्यावर ती प्रत्येकाकडे सुरक्षित राहील याची खात्री आहे. परमेश्वराने पुढील जन्मीसुद्धा असाच धर्मासाठी दानधर्म करण्याची मला संधि द्यावी. हा दानधर्म सोहळा पार पडल्यावर जमलेल्या राजांनीही आपापला दानदानाचा सोहळा केला.

हयुएन त्संग यांनी सम्राट हर्षवर्धनाचे धर्म परिषद आणि दान धर्म हे दोन सोहाळे पाहिल्यावर सम्राटाला विनंती केली की आता मी मायदेशी परत जातो. त्यांना परवानगी देणं सम्राटाला कठीण गेलं, कुमार राजाने त्यांना आणखी राहा म्हणजे मी १०० मठ बांधीन अशी विनंती केली. पण हयुएन त्संग यांना आपल्याला जाऊ न देण्यासाठीची हे युक्ति आहे हे कळलं आणि त्यांनी नकार दिला. नकाराचं कारण देतांना म्हणाले की मी ज्या उद्देशाने बौद्ध वाङमय, भगवान बुद्धांचा उपदेश शिकण्यासाठी आलो होतो तो आता पूर्ण झाला आहे. मला आता माझ्या देशबांधवांना हा धर्म शिकवला पाहिजे. आपलं ज्ञान जर दुसऱ्याला दिलं नाही तर त्याला अंधत्त्व येत असा समज आहे. म्हणून मी परत जायलाच हवं. तेव्हा कुमार राजाने त्यांना समुद्र मार्गे, जावा - सुमात्रा बेटांच्यावरून जायला सांगितलं पण ते म्हणाले की मी इथे येताना वाटेत काउ

चांग (थायलंड मधील एक बेट) देशाच्या राजाला तुमच्याकडे वास्तव्य करीन असं कबूल केलं आहे. मी तिथेच जाईन..सम्राट आणि कुमार या दोन्ही राजांनी त्यांना सोनं, चांदी, मोहरा दिल्या पण हयुएन त्संग सगळ्याचा अव्हेर केला. मग दोन्ही राजांनी त्यांना मदतीची इच्छा म्हणून त्यांचं सामान वाहण्यासाठी लोक देण्याची इच्छा दर्शवली. हर्षवर्धन राजाने हयुएन त्संग यांना हत्ती आणि त्याच्या प्रवासातील खर्चासाठी ३००० हजार सुवर्ण मोहरा आणि १०,००० रुपयांची नाणी दिली. ते त्यांनी स्वीकारलं. शिवाय सुरक्षेसाठी सैनिक दिले. सामान वाहण्यासाठी खेचरं, बैल दिले. वाटेत लागणाऱ्या सर्व राज्यांच्या प्रवेशाला लागणारी दस्तकं दिली....

यावेळी उत्तर सिल्क मार्गाने न जाता त्यांनी दक्षिण सिल्क मार्गाने जायचं ठरवलं. याला कारणही तसंच होतं. भारतात येतांना त्यांनी काउ चांगच्या राजाला परतीच्या मार्गावर भेटीचं वचन दिलं होतं, पण तो राजा मरण पावल्याची वार्ता कळल्यामुळे त्यांनी हा दुसरा मार्ग निवडला. मग हर्षवर्धन आणि कुमारराजा दोघे ३ दिवस काही अंतर हयुएन त्संग यांच्याबरोबर निरोप देण्यासाठी चालत गेले. हयुएन त्संग पुढे निघाले तेव्हा तिघांचे कंठ भरून आले होते. खूप भिक्षू लोकही निरोपला आले होते. अत्यंत हृद्य असा निरोप समारंभ पार होऊन दोघे मागे फिरले. हयुएन त्संग आपल्या मातृभूमीकडे निघाले. महिना दोन महीने मुक्काम करत ते जलंधरला पोचले. तिथून तक्षशिला, काश्मीरवरून उंच पहाड ओलांडत पुढे चालू लागले. वाटेत दरोडेखोरांचा प्रदेश होता, म्हणून आपल्या लोकांना मागे ठेवत काही भिक्षूंना त्यांनी पुढे ठेवलं आणि

दरोडेखोरांशी, आम्ही धर्मगुरु आहोत, आमच्याजवळ मौल्यवान काहीही नाही असं सांगायला सांगितलं. त्यामुळे या मोठ्या जमावाला चोरांचा त्रास झाला नाही.

काश्मीरवरून ते सिंधु नदीच्या तीरावर आले. विशाल पात्र पार करून त्यांना पलीकडे जायचं होतं. त्यांच्याबरोबर अनेक धर्मग्रंथ, त्यांनी अनुवाद केलेली पुस्तकं, चीनमध्ये गेल्यावर लावण्यासाठी अनेक छोटी रोपं, वृक्षांच्या बिया, भगवान बुद्धांची स्मृतिचिन्हं अशा मौलिक वस्तू होत्या. भारतातील रत्ने-सुवर्ण-चांदी मोहरा न घेता हा मोठा मौल्यवान खजिना ते घेऊन चालले होते. पुढे विशाल पात्राच्या सिंधू नदीवर सगळे पोचले, तेव्हा ह्युएन त्संग यांनी आपली सर्व मौल्यवान पुस्तकं एका नावेत ठेवली. त्याच्यासाठी एक माणूस नेमला. ते स्वत: हत्तीवर बसले होते. सर्वजण नदीपात्राच्या मध्यावर असतांना जोरात वारे सुटले, पाणी उचंबळायला लागलं आणि त्यात पुस्तकांची नाव कलंडली. ५० हस्तलिखितं पुस्तकं पाण्यात पडली पण नाविकाला लोकांनी वाचवलं. बरोबर घेतलेल्या काही वृक्षांच्या बियाही वाहून गेल्या. नदी पार केल्यावर तिथला राजा स्वत:हून सन्मान करायला भेटीला आला. त्याने विचारलं की तुमची बहुमोल पुस्तकं वाहून गेली असं ऐकलं. तुम्ही फुलांच्या आणि फळांच्या बिया तर आणल्या नव्हत्या ना.? तेव्हा ह्युएन त्संग यांनी, हो आणल्या होत्या असं उत्तर दिल्यावर तो राजा म्हणाला की म्हणूनच उंच लाटा निर्माण झाल्या. या नदीची प्राचीन काळापासून ख्याती अशी आहे की जर कुणी प्रवासी रोपं, बिया नेत असेल तर त्याला या संकटाशी सामना करावा लागतो.

हयुएन त्संग मग ५० दिवस तिथेच राहिले. त्यांनी आपला एक माणूस परत पाठवला आणि काश्यपिय विद्यापीठातून त्रिपिटिकाचा परत मजकूर लिहून आणवला. तो आल्यावर परत प्रवासाला निघाले.

त्यानंतर लामघान-कपिशा-खोस्त-हिमताला-बदकशा-शांभी या मार्गाने करत बर्फाचे उंच पर्वत चढत-उतरत, थंड बोचऱ्या वाऱ्यांना तोंड देत पुढे पुढे निघाले. लेह - लडाख, काश, ओश, चेकालू, भागपा, खोतानला पोचले. काभांड वरून जाताना त्यांचा हत्ती दरीत पडला आणि काही मौल्यवान हस्तलिखितं त्यात गेली. हे नुकसान त्यांच्यासाठी फार मोठं होतं. खोतानला पोचल्यावर तिथून त्यांनी चीनच्या सम्राटला देशात प्रवेश करण्याची परवानगी मागणारं पत्र पाठवलं. त्याचं उत्तर यायला ८ महिने लागले. मग हयुएन त्संग मायदेशी जायला निघाले. खोतानाच्या राजाने त्यांना सामान वाहण्यासाठी खेचरं, मजूर, अन्नधान्य पुरवलं. खोतान सोडल्यावर ते एका वळवंटातून गेले. त्या प्रवासात त्यांचे अतिशय हाल झाले. तिथून हयुएन त्संग तुखाराला पोचले. वाळवंटातले गरम वारे झेलत, अनेक वेडीवाकडी वळणे ओलांडत चीनच्या सीमेवर पोचले. चीनच्या सीमेवर पोचल्यावर खोतानाच्या राजाने दिलेले घोडे, मजूर, सर्वांना परत पाठवलं. त्यांना बिदागी दिली पण त्यांनी ती नम्रपणे नाकारली.

शा चौ या ठिकाणी पोचल्यावर त्यांनी चीनच्या सम्राटाला, आपण येत असल्याची बातमी देऊन दूत पाठवला. सम्राटाला ही बातमी कळताच त्यांनी लियंगचा राजपुत्र फोंग हुयान लिंग याला आणि आपल्या अधिकाऱ्यांना

त्यांच्या स्वागतासाठी पाठवलं. आपण या देशातून बाहेर पडतांना सम्राटांची परवानगी घेतली नव्हती ही अपराधाची भावना अजूनही हयुएन त्संग यांच्या मनात होती म्हणून जलद गतीने सम्राटांना भेटायला कालव्याच्या मार्गाने निघाले. चीनमधील जनतेला ही बातमी मिळाल्याबरोबर अनेक लोक त्यांच्या दर्शनासाठी जमले इतके की चेंगचेंगरी होऊ नये म्हणून हयुएन त्संग यांना कालव्यातून बाहेर येता येईना. दुसरे दिवशी ते बाहेर आले आणि सीन गान फू या पश्चिमेकडील राजधानीत पोचले. सन ६४५ च्या हिवाळयात ते तिथे पोचले. तिथल्या मठात त्यांचं भव्य स्वागत झालं.

त्या मठात हयुएन त्संग यांनी आपण आणलेल्या सर्व भेटी जमा केल्या. त्यात, तथागतांच्या १. शरीराचे १५० कण, २. मगधातील प्रागबोधि डोंगरावरील बुद्धाची सोन्याची मूर्ती, ३. कौशम्बिच्या उदयन राजाने करून घेतलेल्या मूर्तीसारखी ३ फूट ५ इंच उंचीची चंदनाची मूर्ती, ४. स्वर्गातून अवरोहण करणारी मूर्ती ५. मगधातील पर्वतात सूत्रे सांगणाऱ्या बुदधाची चांदीची मूर्त, ६. नगरहारातील बुद्धाची मूर्ती, ७. वैशालीत उपदेशासाठी फिरत असतांनाची चन्दन मूर्ती, होत्या. याशिवाय महायांमधील २२४ सूत्रांवरची, १९२ शास्त्रांची, १५ अनुवाद स्थवीर शाखेची, १५ अनुवाद सामतीय शाखेची, २२ अनुवाद सूत्रे-शस्त्रे-विनयवरील महीशासक शाखेची, ६७ अनुवाद सरस्वतिवादिन, १७ अनुवाद कश्यापिय, ४२ धर्मगुप्त, ३६ प्रती हेतुविद्या शास्त्राच्या आणि १३ प्रती शब्दविद्या शास्त्राच्या, असे एकूण ६५७ ग्रंथ २० घोड्यांवर लादून आणले होते..

तिथून ते मग सम्राटांच्या भेटीला लोयंगला गेले. माझ्याशी चर्चा केल्याशिवाय का गेलात सम्राटांनी त्यांना असं विचारल्यावर ते म्हणाले की मी ३ वेळा आपल्या परवानगीचा अर्ज केला पण आपल्याकडून काहीच उत्तर आलं नाही. मला माझी अभ्यासाची तळमळ स्वस्थ बसू देईना म्हणून मी परवानगीशिवाय गेलो. सम्राटांबरोबर सविस्तर चर्चा झाल्यावर ह्युएन त्संग सी-गान-फूच्या हाँग फू मठात जाऊन राहिले आणि आपलं भारतीय बौद्ध धर्माच्या अनुवादचं व्रत करत राहिले. बोधिसत्व पीटिका सूत्र, बुद्धाभूमिसूत्र, शतमुखी धरणि आणि इतर ग्रंथांचा अनुवाद त्यांनी ६४७ वर्षाच्या अखेरपर्यंत संपवला. पुढच्या वर्षात साल ६४८ मध्ये आणखी ५८ पुस्तकं अनुवादीत केली. सम्राटांच्या इच्छेप्रमाणे सी-यू-की हे भारत दर्शनाच्या आठवणींवरील वरील पुस्तकसुद्धा त्याच वर्षी संपवलं. सन ६४९ मध्ये सम्राटांच्या विंनंतीवरून ते Sse-en मंदिरात राहायला गेले. सम्राट ताईसुंग ६५० सालात वारले. त्याच्या जागी त्यांचा पुत्र काओ त्सुंग हा गादीवर आला.

या मठात आल्यानंतर ह्युएन त्संग यांचा दिनक्रम ठरलेला होता. ते पहाटे उठत. पुढचे ४ तास ग्रंथांचा अनुवाद करण्यात जात असे. मग मठातील भिक्षूंसमोर प्रवचने करत. त्यावेळी अनेक विद्वान, उच्चपदस्थ लोक हजर असत. त्यांच्या प्रश्नांना, शंकांना ते उत्तरे देत. सभेतील लोकांना ती फार आवडत आणि ह्युएन त्संगाबद्दल भक्ति आणि आदर वाटे. इ. स. ६५२ मध्ये त्यांच्या इच्छेनुसार हाँग फू प्रासादाच्या दक्षिणेला एक पॅगोडा बांधण्यात आला. ह्युएन त्संग यांनी गौतम बुद्धांच्या आपल्या सर्व मौल्यवान वस्तू आणि पुस्तकं त्यात ठेवली. हा

५ भागांमध्ये १८० फूट उंच आणि भारतीय स्तूपासारखा दिसणारा आणि वरती घुमट असलेला बांधला गेला. त्याच्या सर्वात वरच्या भागावरील खोलीत सम्राटाने आणि राजपुत्राने हयुएन त्संग यांच्या अनुवादावर लिहिलेली प्रस्तावना ठेवली. हयुएन त्संग यांचं अनुवादाचा उपक्रम चालूच राहिला, पण ६५६ मध्ये ते आजारी पडले. त्यांच्यावर उपचार केले पण ते त्यातून पूर्ण बरे झाले नाहीत..

सन ६५८ मधे ते लोयांगला आले आणि सी-मिंग मठात राहू लागले. काळ पुढे पुढे सरकत होता. हयुएन त्संग वृद्धापकालाकडे सरकत होते. वयामुळे त्यांना अनुवाद करणे अशक्य होऊ लागलं. म्हणून सम्राटांच्या परवानगीने यू-फा (रत्नपुष्प) प्रासादात वास्तव्याला गेले. सन ६६० मध्ये त्यांनी २ लाख श्लोक असलेल्या महाप्रज्ञा परिमित पुस्तकाचा अनुवाद करायचा होता, पण एका स्वप्नातील दृष्टांताने त्यांना ते काम न करण्याची आज्ञा दिली आणि भारतातून आणलेल्या त्या तीन प्रतींची योग्य रितीने जुळणी करायचा दृष्टान्त दिला. आता त्यांचं वय ६५ वर्षांच्या जवळ आलं होतं. हाती घेतलेलं काम मरणापूर्वी त्यांना पूर्णत्त्वाला न्यायचंच होतं. त्या ध्यासाने आणि जिद्दीने त्यांनी ते काम तडीस नेलं. त्या कामाचे १०२ खंडांमद्धे ६०० भाग सामावले. आतापर्यंत त्यांनी वेगवेगळया ७४ कामांची १३३५ प्रकरणे पूर्ण केली होती. सगळं काम हातावेगळं केल्यावर मृत्यूची वाट पाहत ते स्तब्धपणे पडून राहिले. त्यावेळी ते मैत्रेयाची सूत्रे मनात म्हणत राहिले. भगवान बुद्धांचे पुढचे अवतार मैत्रेय यांना पाहण्याची आणि त्यांच्याबरोबर तुषित स्वर्गात राहण्याची त्यांना फार इच्छा होती.

साल ६६४ च्या दहाव्या महिन्याच्या १३ व्या दिवशी – ५ फेब्रुवारी ६६४ या दिवशी युहुया राजप्रासादात ते अनंतात विलीन झाले. त्यांचं पश्चिमेकडील राजधानीत दफन करण्यात आला, पण ६६९ सालात सम्राटांच्या आज्ञेनुसार उत्तरेकडील फॅन शुएनमध्ये परत दफन करून तिथे त्यांच्या स्मरणार्थ एक स्तंभ बांधण्यात आला. एका सुलेखनकाराला बोलावून हयुएन त्संगवरील मजकूर कोरून यांची स्मरणशीळा बसवली. इसवीसनाच्या पूर्व काळात गौतमबुद्ध भारतात जन्मले, मगध ही त्यांची धर्मप्रसार भूमी घडली. त्यांच्या धर्माच्या प्रसारासाठी, त्यांच्या निर्वाणानंतर २३९ वर्षांनी त्याच मगधात, सम्राट अशोकाचा जन्म झाला आणि त्याने बौद्ध धर्म स्वीकारून जगभर त्या धर्माचा प्रसार केला. त्यानंतर त्याच धर्माच्या अभ्यासासाठी परत हयुएन त्संग हा बौद्ध धर्मप्रज्ञावंताचा दूत परत तथागतांच्या भेटीच्या ओढीने ७ व्या शतकात प्रचंड त्रास झेलत १०,००० हजार मैल पार करत पोचला आणि सम्राट अशोकाने बांधलेल्या स्तूप-विहार-जातक कथांच्या आधाराने भगवानांच्या स्मृतींचं भारताचं दर्शन भारतीयांनाच घडवलं. भगवानांच्या ज्ञानाला शरण जा मंत्र स्वीकारला, त्यांचा निरिश्वरवाद मानला तरी या या दैवी चमत्काराला शरण जावंच लागतं॥

**व्हेन सांगकी भारत यात्रा – Travels In India.**

**मूळ लेखक व्हेन सांग - अनुवादक- ठाकूर प्रसाद शर्मा..**

**Watters Thomas - On Yuan Chwangs Travels in India.**

# The Life of Hieuen Tsiang – by the Shaman Hue li. By Samuel Beal.

# अलबेरुनी.


## भारतीय धर्म, तत्त्वज्ञान, भाषा,

## भूगोल, रितिरिवाज, खगोलशास्त्र,

## ज्योतिर्विद्या, कायदे, कालजंत्री

## यांच्या

## भारतीय ज्ञानाचा अरबी महासागर.



## जन्म – ९ सप्टेंबर. ९७३

## मृत्यू – १३ डिसेंबर १०४८.

# अल बेरुनी

भारताचं वर्णन लिहिणाऱ्या परदेशी प्रवाशांपैकी, गझनीच्या सुलतान महमंदबरोबर आलेला अलबेरुनी. प्रकांड भाषापंडित, विद्वान लेखक, खगोल शास्त्रज्ञ, गणिती, रत्न जाणकार, अशा विविध शाखांवर प्रभुत्त्व असलेला विद्येचा सागरच होता तो. त्यांचा जन्म उझबेकिस्तानमध्ये झाला..ख्वरिझम कास, आताचा खीवा प्रांत, हे अमू दर्यामधील एक प्रचंड मोठं मरू उद्यान, ओयासीस होतं..त्यातील काथ या खेड्यात त्यांचा जन्म सन ९७३ साली झाला..यांचं खरं नाव अबु रहायान महमद बिन अहमद अलबेरुनी..इराणी ख्वारीजम त्यांची मातृभाषा होती. विज्ञान आणि भाषा यांची उपजतच तीव्र बुद्धी लाभलेल्या या मुलाला त्यांचे गुरु अबु नस्र मन्सूर यांनी सृष्टीचं निरिक्षण कसं करावं याचे धडे दिले होते..

बालपणात अभ्यासात प्रगती करत असतांना, वयाच्या विसाव्या वर्षी ९९५ सालात परकीय आक्रमणामुळे, त्यांच्या कुटुंबाला रे या ठिकाणी जाऊन स्थायिक व्हावं लागलं. तिथे त्यांना अलखुजान्दी नावाचे ज्योतिष शास्त्रातील पारंगत गुरु भेटले. त्यांच्याबरोबर ते आकाश निरीक्षण, ग्रह, तारे, यांच्या

अभ्यासात रमले. वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत विज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात त्यांनी प्रचंड ज्ञान मिळवलं. परत सन ९९५ सालामध्ये मामुनीदांच्या स्वारीमुळे त्यांनी देश सोडला आणि ते बुखाराला पोचले. त्यांची कीर्ती सामानिड वंशाचा सुलतान इब्ननूह मन्सूर द्वितीय याच्या कानावर गेली तेव्हा अलबेरुनींना बुखाराच्या दरबारात नोकरी मिळाली. तिथे त्यांची गाठ आधुनिक वैद्यक शास्त्राचे आद्य प्रणेते इब्न सिना यांच्याशी पडली..त्यांच्यासारख्या विद्वानांच्या सहवासात अलबेरूनींना विविध क्षेत्रातील ज्ञान मिळालं..

सन ९९८ मध्ये ते तबरीस्तानच्या झियारीद अमिरच्या दरबारात पोचले. त्याकाळात त्यांनी आपलं पहिलं पुस्तक लिहिलं ते होतं, “ अल अथर अल बाकीयां अल कुराण अल खालीया '' तिथून ते बावन्द राजघराण्याच्या अल मर्जबान राजाच्या पदरी राहिले. त्यानंतर परत त्यांनी मायदेशावर राज्य करणाऱ्या मामुनिद सुलतानाशी मैत्री केली आणि गुर्गांज हया खीवाच्या त्यांच्या राजधानीत परतले. हा सुलतान बुद्धिवंतांचा आश्रयदाता होता.

तिथे त्यांना अनेक विद्वान भेटले..या काळात त्यांना ऐतिहासिक कालगणनेची जंत्री तयार करण्याची कला शिकता आली. त्या कलेवर त्यांनी पुस्तकं लिहून ते बादशहाला भेट दिलं..गुर्गांजच्या राजाचा ते राज्यमंत्री आणि खास सल्लागार बनले. त्यांचा सल्ला सुलतान महंमदला आणि त्याच्या दरबारातील मंत्री मेमांडी यांना न रुचणारा होता म्हणून तो खीवा प्रांत जिंकण्याची संधि शोधत असे. शेवटी गुर्गांजचा शहा आणि शहाचा मेहुणा गझनीचा सुलतान यांच्यात वाकडं आलं..तेव्हा गझनीचा महमंदने खीवावर सन

१०१७ मध्ये स्वारी केली. महमंदने केलेल्या या स्वारीत शहा मरण पावला. सुलतान महंमदने तिथली संपत्ती लुटली, फौज आपल्याकडे घेतली आणि तिथले प्रतिष्ठित सरदार, वैज्ञानिक, बुद्धिवंत यांना घेऊन तो गझनीला परतला..

या कैद्यांमद्धे अलबेरूनीही होते. महमंदचा कारभार अलबेरूनींनी जवळून अनुभवला. हा सुलतान स्वत:ला इस्लामचा संरक्षक म्हणवून घेत होता. त्यावर अलबेरूनीने लिहिलं होतं की भारताचं वैभव याने नष्ट केलं..त्याच्या एकेक लष्करी चाल खेळण्याने, मातीच्या कणांसारखे हिंदू त्यात गाडले गेले. महमंदला मात्र भारतातील खजिना लुटायचा होता, हिंदूंना तो जाळून टाकण्याच्या लायकीचे समजत होता..

जेव्हा अलबेरूनी गझनीत आले, तेव्हा महंमदच्या काबूलच्या आक्रमणाच्या वेळी कैदी म्हणून आणलेल्या लाखो हिंदूंची त्या प्रांतात वस्ती होती..त्यांच्यात कारागीर, शिल्पकार, चित्रकार, वैज्ञानिक, भाषापंडित, गणिती, व्यापारी, सरकारी नोकर, असे खूप बुद्धिमान लोकही होते..अलबेरुनींची या हिंदू पंडितांशी ओळख झाली होती आणि भारतातील विविध शास्त्रांबद्दल त्याचा परिचय झाला होता..गझनी ही त्यावेळी अत्यंत नावाजलेली राजधानी होती, तिथे स्वतंत्रपणे येणारे हिंदू पांथस्थही होते..गझनीमध्ये अबुल खैर अलखमार नावाचा त्याच्या ओळखीचा फक्त एक मित्र होता. हा मित्र स्वत: एक तत्त्ववेत्ता होता. हा धर्माने ख्रिश्चन आणि व्यवसायाने वैद्य होता. गझनीत असतांना त्यांना सुलतान महमंदच्या कचेरीमद्धे एक ज्योतिषी म्हणून ओळख मिळाली होती. गझनीचा सुलतान महमंद जेव्हा भारतावर स्वारी करण्यासाठी आला, तेव्हा

त्याच्याबरोबर राजकैदी म्हणून अलबेरुनीहि भारतात आले..त्यावेळी ते ४८ वर्षांचे होते. भारतच्या नैसर्गिक, खनिज संपत्तीने आणि ज्ञानाच्या विविध शाखांमधील संपदेने एवढे भारावले की तहकिक ऐ हिंद हे भारतावरील वर्णनात्मक पुस्तक गझनीला परत गेल्यावर त्यांनी लिहून ठेवलं. त्यांनी या भारत भेटीच्या विषयावर २६ पुस्तकं लिहिली पण तहकिक ए हिंद हे पुस्तक जास्त लोकप्रिय झालं..

२६ डिसेंबर १०३१ मध्ये, जेव्हा त्यांचं पुस्तक पूर्ण झालं तेव्हा त्याआधीच वर्षभर, सुलतान महमंद, ३० एप्रिल, बुधवार, १०३० या दिवशी मरण पावला होता. त्यामुळेच सुलतान महमंदला हे पुस्तक पाहता आलं नाही. सुलतान महमंद हा स्वत: एक फार मोठा, साहित्यिकांचा सन्मान करणारा सुलतान होता. तो काव्याचा मोठा भोक्ता होता. फिरदौसीसारखा, ज्याला भारतातील कालिदासाचं महत्त्व आहे असा कवी त्याच्या दरबारी होता. त्याच्या दरबारातील कवी ऊनसूरीच्या प्रोत्साहनामुळे गझनी राजधानीत उद्यानांमद्धे, महालांमध्ये ४०० कवींचे काव्यगायन, मैफिली सतत चालू असत..

भारताच्या आठवणींचा हा ग्रंथ लिहिण्यामागची घटना अलबेरूनी सांगतात की, भारतातून गझनीला परतल्यावर, एकदा त्यांची आणि त्यांच्या मित्राची, तत्त्वज्ञान आणि धर्म यांचा इतिहास, त्याची सद्यस्थिती, त्याचे गुणदोष, यावरील साहित्याची चर्चा चालू होती. त्यावेळी हिंदूंची श्रद्धा आणि तत्त्वज्ञान हा विषय निघाला आणि त्यावर वाद झाला. या झालेल्या वादांची शहानिशा करायला त्या मित्रानेही अलबेरूनींनी सुचविलेल्या हिंदू धर्म, तत्त्वज्ञानावरील

पुस्तकांचा अभ्यास केला तेव्हा अलबेरुनींची मतं मित्राला पटली. त्यावरून अलबेरूनींनी हे साहित्य अरबी भाषेत आणावं अशी सूचना त्याने अलबेरुनींना केली त्यामुळे हा ग्रंथ तयार झाला. हा ग्रंथ लिहितांना अलबेरूनी यांनी हेही स्पष्ट केलं की हिंदू धर्म, त्याचं तत्त्वज्ञान म्हणजे काय एवढंच मी यात मांडणार आहे. त्यात ज्या चुका असतील त्या माझ्या नाहीत तर हिंदूंच्यामुळे झालेल्या असतील. ज्यांना हिंदू विज्ञान, धर्म, साहित्य, यांच्याशी ओळख करून घ्यायची असेल, काही शंका असतील त्या मुसलमानांसाठी ह्या आठवणी आहेत. अलबेरूनींनी पुस्तक पूर्ण केलं तेव्हा ते ५८ वर्षांचे होते. अलबेरुनी हे पहिले मुसलमान विद्यारत्न होते ज्यांनी भगवतद्गीता, पुराणे अनुवाद करून मुसलमानांच्या समोर ठेवली.

सुलतान महमंदच्या मृत्यूनंतर गझनीमध्ये सत्तास्पर्धेमुळे प्रचंड अस्थिरता आली होती. सत्तेसाठी महमंदच्या मुलांमध्ये जोरात स्पर्धा सुरू होती. आपल्या पश्चात आपला वारस म्हणून बल्ख प्रांतात राहणाऱ्या, मुहम्मद या ज्येष्ठ मुलाला महमंदने नियुक्त केलं होतं. सुलतान मेल्यावर मुहम्मद हा शहजादा तख्त काबिज करण्यासाठी त्वरेने बल्खहून निघाला आणि ४० दिवसात गझनीला पोचला..त्याचा प्रतिस्पर्धी, त्याचा भाऊ मसऊद याला त्याने पत्र लिहून आपण सुलतान झालो आहोत हे कळवलं. मसऊदने ते मान्य केलं नाही तेव्हा मुहम्मद सैन्य घेऊन त्याच्यावर चालून गेला. ताकीनाबादला त्याचा तळ पडला होता तेव्हा एक दिवस तो दारूच्या नशेत असतांना सुलतानाच्या फौजेने, त्याचा काका, कुमार युसुफ, आणि घरातील इमानदार जुना नोकर अखिलेशबंद

यांनी संगनमताने मुहम्मदला कैद करून त्याला मसऊदच्या ताब्यात दिलं.. मसऊदने भावाला ताब्यात घेतलं, त्याचे डोळे काढले आणि तुरुंगात फेकलं..अखिलेशबंदला मारून टाकलं आणि युसुफला तुरुंगात टाकलं..त्यानंतर मसऊद ३ जून १०३१ या दिवशी गझनीत पोचला आणि तख्तावर बसला. मसऊदचा १३ वर्षांचा कारभार अलबेरूनींनी जवळून पाहिला..सुलतान मसऊदला अलबेरूनींनी आपलं “ अल-कानूनल” हे पुस्तक अर्पण केलं..त्यावर खूष होऊन अलबेरूनी यांच्यावरील महमंदच्या काळातील सर्व आरोप सुलतानाने माफ केले. अलबेरुनींना मसऊदच्या दरबारात मानाचं स्थान मिळालं. प्रतिष्ठाही मिळाली. सुलतानाने त्यांना दरबारी बंधनापासून मुक्त केलं आणि तनखा सुरू केला तेव्हा ते त्यांच्या अत्यंत जिव्हाळयाच्या खगोलशास्त्राच्या अभ्यासात रमले. त्यांनी असं लिहून ठेवलं आहे की विज्ञान आणि साहित्य या दोन अभ्यासांना राजकीय आर्थिक पाठबळाची गरज असते. ती तशी असेल तर ते पंडित मुक्त मनाने अभ्यास करू शकतात. ते म्हणतात की वैज्ञानिक आणि साहित्यिक आर्थिक मदतीचा सदुपयोग करणे जाणतात, मात्र त्या उलट श्रीमंत लोक विज्ञानाबद्दल अनभिज्ञ असतात.

पण त्यांच्या ज्ञानाच्या ओढीला मात्र आधीचा सुलतान महमंद हाच कारण ठरला होता. महमंदबरोबर भारतात आल्यामुळे त्यांची भारतीय तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, भाषा, साहित्य, खगोलशास्त्र, पंचांग, ज्योतिर्विद्या, ग्रहणाचं गणित, या अफाट ज्ञानसागराची ओळख झाली. पेशावर, पंजाब येथील वास्तव्यात त्याने अनेक पंडितांच्या गाठीभेटी घेऊन या ज्ञानाची माहिती करून

घेतली आणि अनेक पुस्तके विकत घेतली होती त्यामुळेच या क्षेत्रात मिळालेला आनंद अवर्णनीय होता. या अभ्यासातून जे जे योग्य वाटलं, ते ते वाचकांसमोर त्यांनी ठेवलं आणि जे जे चुकीचं वाटलं त्याचाही निर्भीडपणे उल्लेख आपल्या ग्रंथामधून केला..

आपल्या ७५ वर्षांच्या आयुष्यात अलबेरूनींनी १४६ पुस्तकं लिहिली, त्यात जास्त पुस्तकं खगोल शास्त्रावर होती. भाषा पंडित तर ते होतेच. त्यांना अरबी, फारसी, संस्कृत, हिब्रू, सिरियन, उर्दू, आणि ग्रीक भाषाही अवगत होत्या. ते विद्वान गणितज्ञ होते आणि खगोल शास्त्रज्ञही होते. त्यात त्यांची गती इतकी मोठी होती, वयाच्या १६ व्या वर्षी त्यांच्या काथ गावाचे अक्षांश, सूर्य भ्रमणाचा अभ्यास, निरीक्षण करून त्यांनी शोधून काढले होते. ज्योतिषशास्त्र आणि निसर्ग विज्ञानावर त्यांचं प्रभुत्त्व होतं, त्यावरही त्यांनी पुस्तकं लिहिली. फिजिक्समधेही त्यांची गती होती. शिवाय ते उत्तम रत्नपारखीही होते. नकाशे बनवण्यातही त्याचा हातखंडा होता..बालवयात अबु नस्र मन्सूर या गुरुकडे त्यांनी सृष्टी निरीक्षणाचे धडे घेतले होते. पृथ्वी स्वत:भोवती फिरते हे त्यांनी अभ्यासाने शोधून काढलं..एकूण रत्न भंडारातील १८ रत्नांचा त्यांनी विशिष्ट घनतेचा उल्लेख लिहून ठेवला आहे..वस्तूची घनता मोजायला त्यांनी स्वत:ची पद्धत विकसित केली.

त्या पद्धतीद्वारे धातू, रत्ने आणि वायूची घनताही मोजून दाखवली. प्रकाश आणि ध्वनीचा साक्षेपी संबंध त्यांनी शोधला. पृथ्वी विज्ञानाची, भूपृष्ठमिती शाखेचे ते जनक मानले जातात. पृथ्वीचा परीघ मोजण्यासाठी त्यांनी पर्वतांच्या उंचीचा

विचार केला आणि त्रिकोणमिती ( trigonometry) च्या सहाय्याने परिघ काढला. सर्व धर्मांच्या तौलनिक अभ्यासाचेही जनक तेच होते.

भारतात असतांना त्यांनी सूर्याची ऊंची मोजण्याचा भारतीय अभ्यास केला. ऋग्वेदात अत्री ऋषींनी सूर्यग्रहणाच्या अभ्यासासाठी "**तुरीय**" नावाचं यंत्र बनवलं होतं, हे वाचलं..पृथ्वीवरील अक्षांश, रेखांश, कालमापनासाठी अत्री ऋषींनी जे यंत्र बनवल्याचा उल्लेख आहे, त्यावरून एक तात्पुरतं यंत्र बनवलं. त्यांच्या १४६ पुस्तकांमधली ९५ पुस्तकं ही खगोल शास्त्र, गणित, भौगोलिक गणितावर होती. अब्बासिद खलीफांच्या काळात या अभ्यासाला खूप प्रोत्साहन मिळत होतं. अलबेरुनींची बौद्धिक व्यापकता एवढी होती की त्यांनी औषधशास्त्रावरही पुस्तक लिहिलं..

सुलतान महमंद बरोबर राजकैदी म्हणून भारतात आल्यावर, त्यांनी मुलतान, काश्मीर, झेलम नदी, काबूल, पेशावर, जलालाबाद, पंजाब हे भाग पाहिले..त्यांना भारत प्रत्यक्ष अनुभवता आला, त्यामुळे भारत दर्शनाने ते भारावून गेले. पेशावरचा कनिष्कने बांधलेला स्तूप, पूर्वेकडील उदानपूर येथील बौद्ध वाङमय लिहिली गेलेली भैचुकि लिपि यांचा निर्देश त्यात आहे..दक्षिणेतील लोक लेखनासाठी ताडपत्रीचा उपयोग आणि उत्तर भारतात कमलपत्रांचा उपयोग होतो हे त्यांनी लिहून ठेवलंय. जगात फक्त भारतीयांनाच हजार संख्येपुढील आकडे मोजता येतात याची नोंद त्यांनी केली आहे..भारतीय आयुर्वेदाबद्दलही त्याने बारीक निरीक्षण केलं आणि रोग्याला अनेक रस एकत्र करून दिले जातात हे लिहून ठेवलं. अलबेरुनी यांनी भारतीय संस्कृत पुस्तके

अरबी भाषेत आणि अरबी पुस्तके भारतीयांसाठी संस्कृतमध्ये अनुवादीत करून ठेवली.

अलबेरुनी यांनी जी पुस्तकं अरबी भाषेत अनुवादित केली, त्यांची यादी-

**१.** कपिल यांचं सांख्य, **२.** पतंजलीचे विचार, **३.** ब्रह्मगुप्ताचा पुलत्स्यसिद्धान्त, ब्रह्मसिद्धान्त, **५.** वराहमीहिरची लघुजातकम आणि **६.** बृहतसंहिता पुस्तकं, पंचतंत्र पुस्तकाचा त्यांनी केलेला अनुवाद, त्यांना स्वत:लाच विश्वासनीय वाटत नव्हता, म्हणून तो अनुवाद परत करायचा होता. या शिवाय त्यांनी काही निबंध लिहिले त्यात, **७.** हिंदूंच्या ग्रहणकालाच्या गणनेवर, ख्यालूलूकुशूफाईन हे पुस्तक, **८. हिंदूंच्या** गणिती शिकण्यावरच्या पद्धतीवर, शून्य संकल्पनेच्या उपयोगावर, गणितावरील पुस्तकं, **१०.** हिंदू कालनिर्णय विद्येचा मुहूर्त काढण्यावरचा अभ्यास, **११.** चांद्र स्थानावरून, स्थिर ताऱ्यांचा अभ्यासावर निबंध, **१२.** वासुदेवाच्या अवतारांची माहिती, **१३.** काश्मीरवरून आलेल्या १० प्रश्नांची उत्तरे, **१४.** निलूफरची कथा, **१५.** निंदनीय रोगांवरील भारतीय पुस्तकं, अशी अनेक विद्वत्तापूर्ण ग्रंथसंपदा त्यांनी अरबी भाषेत निर्माण केली. अरबी भाषेतील पुस्तके संस्कृतमध्ये आणली. त्यात **१.** ज्योतिषावर एक छोटी पुस्तिका अनुवादीत केली. **२.** मुसलमान विद्वान ज्याचा उपयोग करत होते त्या, ब्रह्मगुप्तसिद्धांतच्या अरबी “ सिंधीन्द “ या अनुवादावार एक निबंध. **३.** अरबी वाचकांना कळायला जड जात असलेल्या आपल्या जुन्या अल अरकंद्वर नव्याने संस्करण, ४. भौतिक

जीवनाच्या बंधांनातून मोक्ष मिळण्याच्या पतंजलिच्या पुस्तकाचा अनुवाद.
**५.** एवढा सगळा अभ्यास आणि लेखन १३ वर्षात त्यांनी केलं होतं. ग्रीक भाषेतील २४ पुस्तकांचं अरबी भाषेतील वाचन त्यांनी केलं होतं. भारतीय आणि ग्रीक दोन्ही तत्त्वज्ञानाचा त्यांचा गाढा अभ्यास होता.

चार्वाक-बौद्ध-जैन या तीन निरिश्वरवादी तत्त्वज्ञानाचा त्यांचा अभ्यास होता हे त्यांनी केलेल्या उल्लेखावरून स्पष्ट होतं. धर्म आणि तत्त्वज्ञान विषयावर लिहितांना ते सांख्य-पतंजलि-गीतेचा संदर्भ देतात. विष्णू-आदित्य-मत्स्य-वायु या पुराणांचा उल्लेख करतात. ज्योतिर्विद्या, नक्षत्र, कालगणना, भूगोल यावर पौलत्स्य, वराहमीहिर, बलभद्र, ब्रह्मगुप्त, वितेश्वर, विजयनंदिन, काश्मीरचे उत्पल, कनिष्ठ आर्यभट्ट, श्रीपाल, ब्राह्मणभट्टिल, श्रीपाल, दुर्लभ, जीवशर्मन यांचे विचार उद्धरुत करतात. हत्तींवर गज चिकित्सा, चरक यांच्यावरील वाचन, कृषि विषयावर भुवन कोश, औलियत्त, पंचल, महादेव चंद्रबीज, आणि छंद यावर हसरिभट्ट यांचा शब्दकोश या ग्रंथांचा उल्लेख करतात आणि त्यातील अवतरणे घालतात हा त्यांचा संस्कृतचा अभ्यास होता..

अल बेरूनी भारतात आले आणि त्याने ज्या स्थळांना भेटी दिल्या त्यात लमघान, अटक, पेशावर, जलालाबाद, सियालकोट, लाहोर, लाहोरच्या उत्तरेला असलेला मंधुकर, मुलतान, पंजाब आणि काबूलमधली घाटी एवढा प्रांत होता. मुलतानमद्धे त्याचा जास्त काल मुक्काम असावा, कारण तिथल्या भागावर त्यांनी जास्त लेखन केलं आहे. अलबेरूनीने लिहिलेल्या भारतावरील ग्रंथात उद्धृत केलेले विषय अनेक होते..

ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात त्यांना अभ्यासासाठी कोणकोणत्या अडचणी आल्या ते सांगितलं आहे. त्यात, भारतात वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या भाषा होत्या. अल बेरुनी यांचं उर्दू, संस्कृत, अरबी, फारसी, हिब्रू, सिरियन भाषेवर प्रभुत्त्व होतं..त्यामुळे त्यांनी भारतीय भाषेवर आपले विचार मांडले. त्यात ते म्हणतात की इथल्या भाषेत सामान्य नाम-विशेषनाम-क्रियापदं, व्याकरण खूप आहेत..एकाच शब्दांचे दोन अर्थ असतात आणि त्याचा वाक्याशी जसा संदर्भ असेल तसा अर्थ होतो..ते म्हणतात की हिंदूंना ही शाब्दिक श्रीमंती वाटते म्हणून अभिमान वाटतो पण मला तर यात दोष दिसतो. त्यांचं संस्कृत भाषेवर विलक्षण प्रेम जडलं. त्या भाषेतील व्याकरण, काव्यशास्त्र, छंद, ते म्हणण्याचे नियम, याला स्वरशास्त्र आहे आणि हे विलक्षण आहे. भारतीय भाषांचे उच्चार फार कठीण आहेत. पण ते लिहितांना आपल्याला नेमका उच्चार करता येतो हा त्या भाषांचा अलंकार आहे..इथे एकच भाषा सामान्यांसाठी आणि पंडितांसाठी दोन प्रकारे वापरली जाते.

दुसरा फरक धर्माचा आहे. जे बाहेरून आलेले आहेत त्या सर्वांना इथले हिंदू लोक म्लेंछ म्हणतात..त्यांच्याशी संबंध ठेवणे म्हणजे धर्म भ्रष्ट होणे असे ते मानतात. भारतीयांचे रीतिरिवाज, पेहेराव सभ्यता, संस्कार यांच्यात आणि अरबी संस्कृतीत खूपच फरक होता. त्यांनी लिहिलं आहे की आपल्या मुलांना ते अरबी लोकांची भीती घालतात. राज्याराज्यात भाषा बदलत होत्या. वेगवेगळ्या धर्मांचाही त्यात अंतर्भाव होता. वेगळ्या धर्माच्या चालीरीती, श्रद्धा वेगळ्या बदलत होत्या यांचा उल्लेख करतात.

आपला देश सोडून इतर राज्यांमध्ये जाण्याची भारतीयांची मानसिकता नव्हती कारण त्यांचे पिढीजात व्यवहार चालू होते. मीर कासीमच्या सिंधवरील आक्रमणाने, त्याने केलेल्या अत्याचारामुळे मुसलमानांच्याबद्दल हिंदूंना खूप राग द्वेष होता..त्यांच्या भयंकर हिंसक कृत्यामुळे मुसलमानांबद्दल त्यांच्या मनात घृणा उत्पन्न झाली होती. त्यामुळे मुसलमानांना ते जवळ करायला तर नव्हते. आपल्या देशाचा, संस्कृतीचा, पूर्वजांच्या ज्ञानाचा, धर्माचा त्यांना खूप अभिमान होता. अलबेरूनी लिहितात की या लोकांनी कधीही आपला देश सोडून इतर देशांमध्ये प्रवास केला नाही, त्यामुळे जगातील ज्ञानाचा त्यांना गंधही नव्हता..या अडचणींमुळे अलबेरूनींना ज्ञान मिळवण्यासाठी मोठी दरी निर्माण झाली..

हिंदू ईश्वरावर कशी श्रद्धा ठेवतात, त्याच्याबद्दल काय समज आहेत, विश्वास आहेत, ईश्वर अनादि अनंत आहे असा त्यांचा समज आहे, त्याचं वर्णन केलं आणि, हे माझ्या मनातले विचार नाहीत हे दाखवण्यासाठी पतंजलि आणि शिष्य यांचा संवाद घातला आहे हेही सांगायला विसरले नाहीत. गीतेतील कृष्णाच्या वचनांचा संदर्भही मधून मधून घातले. मग सांख्य विचारही मांडले. भारतात येऊन संस्कृत शिकल्यावर भगवतगीतेच्या तत्त्वज्ञानाने तर ते इतका भारावून गेले की त्यांनी गीतेचं अरबी भाषेत रूपांतर केलं. भारतीय पंडितांशी चर्चा करून हिंदू संत आणि ग्रीक संताची तुलना केली. आपल्या भारताच्या आठवणींमद्धे त्यांनी सतत सूफी, ग्रीक, इस्लाम संस्कृतीच्या तत्त्वज्ञानाची तुलना केली.

ईश्वर भक्तीवरील या प्रकरणात त्यांनी सूफी संप्रदाय, प्लेटोचे विचार, सिरियन, इराणी संस्कृतीतील परमेश्वराची विविध नावे, सुशिक्षित हिंदूंचे विचार, महाभूते, यावर भाष्य केलं आहे. सूफी हा मूळ शब्द ग्रीक आहे आणि त्याचा अर्थ प्रज्ञा आहे. आणि प्रज्ञेचं प्रेम ती philosophy. सूफीचा इस्लामशी काहीही संबंध नाही असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. जगातील आद्य प्रमुख सात तत्त्ववेत्त्यांची मते ते मांडतात..ग्रीक लोक जे भव्य ते सर्व परमेश्वर संकल्पनेशी जोडतात पण मुसलमान अल्लाह हा शब्द मात्र सर्व ठिकाणी वापरला न जाता फक्त परमेश्वराला उद्देशूनच आहे हेही ठामपणे लिहून मग देव शब्दांचे हिबरू, ख्रिश्चन, संस्कृतींमधले पर्यायी शब्द सांगितले आहेत.

त्यानंतर त्यांनी हिंदू संस्कृतीतील संकल्पनेची चर्चा करून त्यांचे अर्थ सांगितले. पंच महाभूते, पंचेंद्रिये, आत्मा-प्रेतात्मा यांचा संयोग, सांख्य योगातील प्रकृती आणि शक्तीचा विचार, कर्म आणि प्रकृती, पंचप्राण, ब्रह्म यावर त्यांचं भाष्य आहे. भिन्न भिन्न पदार्थांच्या संयोगाने वेगवेगळे देह बनतात. त्यात हाडं, वीर्य, नाडी ही नरतत्त्वे मांस-अस्थि-रक्त-केस- या नारी तत्त्वांच्या संयोगाने देह तयार करतात. देह तयार झाला की आत्म्याशी त्याचा संयोग होतो. मग जे पंचप्राण संगितले आहेत, त्यातील प्राण आणि अपान या पहिल्या दोन प्राणांनी श्वास आत घेणे आणि बाहेर सोडणे ही क्रिया होते, तिसरा व्यान प्राण पोटातील खाद्य द्रवांमद्धे मिसळतो, चौथा समानाय प्राण शरीराला एकीकडून दुसरीकडे नेतो आणि पाचवा उदानाय प्राण शरीरातील चेतना एका टोकाकडून दुसऱ्या टोकाला नेते हा विचार आपल्या लोकांना लिहिला. पुरुष आणि प्रकृती

म्हणजे अंधाच्या खांद्यावर बसलेली पांगळी प्रकृती. या दोघांची वाटचाल हा संदर्भही देतात, पांगळा खांद्यावर बसून वाट दाखवतो आणि आंधळा त्या मार्गाने जातो. प्रकृती नाना तऱ्हेचे देह धारण करून आपला शिष्य आत्मा याला सर्व वनस्पति, जीव जंतु यांच्यातून फिरवते. रथातील सारथ्यासारखे प्रकृतीमध्ये आतमा आहे. इतक्या बारकाईने भारतीय विचार बाहेरच्या जगाला दाखवले. अंतिम परिणाम, गीतेतील संदर्भ, सूफीवाद, प्लेटोचे, पतंजलिचे विचार मांडले. विष्णू पुराणातील नरक - पुनर्जन्माचे नियम, सांख्य योगातील त्यावरील विरोध, स्वर्गप्राप्तीवरील सूफीचा मतप्रवाह, विष्णू पुराण आणि सांख्य योगामधील कर्म फल आणि पुनर्जन्मावरील मुसलमान लेखकांचे मत यांचा समावेश केला..

मग त्यांनी स्वर्गलोक-मध्यलोक-पाताललोक या तीन लोकांची भारतीय संकल्पना विशद केली. अनेकानेक पशू-प्राणी किडे यांच्यात जन्म घेऊन शेवटी आत्मा मानव देहात प्रवेश करतो यावरील सांख्य, विष्णु पुराण-पतंजलि-आणि सूफीवादातील विचार मांडले. स्वर्गलोक हा पुण्यात्म्यांचा, पाताळलोक हा पापीजनांचा आणि मध्यलोक, म्हणजे नरलोक हा, भोगलोक ही तिन्ही लोक संगितले, त्यापुढे जाऊन वनस्पति आणि पशूंचा एक तिर्यक लोक आहे, आत्मा आधी या लोकात राहतो, तिथले सगळे जन्म झाले की मानव जन्मात येतो. आत्मा तीन कारणांसाठी या तिर्यक लोकात असतो. एकतर आत्म्याचं कर्मफल स्वर्ग वा नरकलोकात राहण्याएवढं पुरेसं -नसेल तर, किंवा आत्मा नरकलोकातून परत येत असतांना, स्वर्गलोकातून परत येताना आत्म्याला मनुष्य जन्म लगेच मिळतो, पण नरकलोकातून मनुष्य जन्मात येताना

त्याला या तिर्यक लोकातून यावं लागतं. मात्र विष्णु पुराणात ८८००० हजार नरक सांगितलेले आहेत आणि वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी वेगवेगळी नावं त्यात दिलेली आहेत. उदा. गळा आवळून निरपराधाला ठार करणाराला रोध नावाचा नरक मिळतो, इ.इ. कर्मानुसार फलप्राप्ती नसते तर त्या कर्माचं प्रयोजन काय असेल, त्यावर फलप्राप्ती असते असं ते लिहितात..जोपर्यंत नवीन देह तयार होत नाही, तोपर्यंत पहिला आत्मा देहत्याग करत नाही..असे विचार या प्रकरणात मांडलेले आहेत...शिवाय सांख्य, विष्णू पुराणांची, मुसलमानांची, ग्रीकांची या संदर्भातील मते भिन्न आहेत..

अलबेरूनींनी मोक्षाचे रूप, पतंजलि, गीतेतील विचार, सांख्ययोगातील मोक्ष आणि ईश्वर संकल्पनेचा अभ्यास करून आपला अभ्यास मांडला. भारतीय तत्त्वज्ञानात मोक्ष तेव्हाच मिळतो जेव्हा, मानव नाशवंत वस्तूंच्या आसक्तीतून मुक्त होतो..अपार ज्ञान मिळवतो आणि अमर होतो तेव्हा आत्मा हा बंधमुक्त होतो. मोक्षप्राप्तीला जातो. मोक्षासाठी अविद्या, आळस, लोभ क्रोध हे गुण अडथळे आहेत..भारतात मूर्तिपूजा का आहेत, कोणत्या स्वभावामुळे मूर्तिपूजेचा उदय झाला त्यावर विचार मांडून त्यांनी स्पष्ट केलं की पापभीरू सामान्य जनता मूर्तिपूजेवर विश्वास ठेवते, पण विद्वान मात्र एकेश्वरवादी आहेत हे मला दिसून आलं. यात सूफी संत वाङ्मय, इराणी-सिरियन भाषेतील ईश्वरांची नावे प्लेटोचे विचार मांडले कारण त्यांचा ग्रीक पौराणिक कथांचाही अभ्यास होता..आपल्या या ग्रंथात पुनर्जन्म संकल्पनेच्या प्रारंभाचा, पतंजलि-प्लेटो-सूफी विचार मांडला. मोक्ष ही संकल्पना त्यांना त्याच्या धर्माने शिकवली

नव्हती, ती अलबेरुनींना गीतेने शिकवली..त्यांनी ब्रह्माबद्दलचे सूफी विचार विषद केले आणि ब्रह्म-अश्वत्थ तुलना, मोक्ष न मिळण्यावर विकार, हेही लिहिलं.

आपल्या पुढच्या प्रकरणात अलबेरुनी सत्त्व-रज-तम यातील भेद सांगतात. ८ अध्यात्मिक वर्गांच्या प्रकारांची नावे - १. देव, पुण्यात्मा, जे उत्तरेत राहतात, २. राक्षस पापात्मा, दक्षिणेत असतात. 3. गंधर्व जे देवांसमोर गायन वादन करतात, अप्सरा या त्यांच्या स्त्रिया असतात, ४. यक्ष जे देवांचे कोषाध्यक्ष असतात, ५ राक्षस जे भयानक रुपाचे, पापात्मा असतात, ६. किन्नर, ज्यांचं शरीर मानवी आणि शीर घोड्याचं असतं, आपल घनिष्ठा नक्षत्र तसं दिसतं, ७. नाग, सर्पाकृती शरीर असलेले प्राणी. ८. विद्याधर, असे निशाचर ज्यांच्याकडे मायावी शक्ति असते, पण ती चिरस्थायी नसते..या प्रकरणात मग ते देवांची ३३ कोटी संख्या, ब्रह्मा-विष्णु-महेश यांचं कार्य, आणि त्यांची महती सांगतात आणि मग पाठोपाठ हेही लिहून टाकतात की पुराणांमद्धे अनेक मूर्खपणाच्या गोष्टी आहेत, पण ग्रीक पुराण कथा वाचल्या तर त्याही तशाच आहेत. सांख्य योगात वर्णन केलेली सृष्टीची विविध रूपं, देव-पितर-ऋषि, रुद्र-नारायण-ब्रह्माची युती, याबद्दलचे विचार, अलबेरूनींनी आपल्या भारतावरील पुस्तकात मांडले..

नंतर राजसिंहासन, ब्राह्मण-क्षत्रिय, वैश्य, शूद्र, आणि अंत्यज-ज्यात परिट, चांभार, डोंबारी, दरवेशी, नाविक, अशा वर्गांचा समावेश होतो, त्यांचे उद्योग यांची माहिती त्यांनी दिली आहे..प्रत्येक वर्णाचं नामकरण त्या त्या व्यवसायाप्रमाणे होतं. जेव्हा एक ब्राह्मण अग्नीची पूजा करतो, त्याला इष्टी

म्हणतात, तीन अग्नींची पूजा करतो, त्याला अग्निहोत्री म्हणतात, जो ब्राह्मण सेवेशिवाय नैवेद्यही देतो त्याला दिक्षित म्हणतात हे भेद त्यांनी मांडले. ब्राह्मण म्हणजे प्रखर बुद्धिमान, ईश्वर भक्तीत रममाण, सत्यवचनी, न्यायप्रेमी शुद्ध, क्षत्रिय म्हणजे जो शूरवीर, उदार, लोकांना जरबेत ठेवणारा, वैश्य म्हणजे व्यापार-शेती-पशुपालन करणारा, आणि शूद्र म्हणजे या तीन वर्णांचा सेवक वर्ग. फारसी समाजातील जातींचाही उल्लेख केला आहे. या लेखात अलबेरूनीने विवाह पद्धतिवर विचार मांडले आहेत, त्यात भारतीय, अरबी, तिबेट आणि प्राचीन विवाहावर माहिती दिली आहे. एक महत्त्वाची माहिती ते देतात ती म्हणजे एकाद्या नियमाचा लोप करणे, तो नियम काळाच्या ओघात रद्द करणे हे भारतीय नीतीमत्तेत सहज होतं. तेच विवाह आणि संतती नियमांमध्ये घडलं. त्यांनी मग तुलनेसाठी अरबी-इराणी नियम लिहिले.

केवळ मूर्ती हा विषय घेऊन त्यांनी स्थानेश्वरची चक्रस्वामी नावाची मूर्ती, मुलतानची आदित्य नावाची मूर्ती, ( हयुएन त्संग यांनीही या सूर्यदेव मंदिराचं वर्णन केलं आहे ) भारतीय देवतांची मूर्ती संकल्पना, यावर माहिती आहे..मूर्ती पूजा कशी सुरू झाली त्या अंबरीश राजाची कथा त्यांनी यात त्यांनी लिहिली आहे..सर्वसंगपरित्याग करून ईश्वर भक्तीत तल्लीन झालेल्या सार्वभौम अंबरीशला इंद्र दर्शन देतो पण राजा त्याच्याकडे काहीही वर मागत नाही, पण मी ज्याची भक्ति करतो आहे, त्याची भेट व्हावी एवढंच अंबरीश राजाने मागितल्यावर शेवटी गरूडावर बसून, कमळ-गदा-शंखधारी योगेश्वर स्वत: दर्शन द्यायला येतात आणि अंबरीशला माझी प्रतिमा-मूर्ती करून त्याची आराधना

कर, त्यावर सुगंधी फुले-पत्री वाहा असं असं सांगतात. तेव्हापासून मूर्तिपूजा सुरू झाली हे मांडतात. ( विठ्ठलाच्या आरतीत " गरुडावर बैसोन माझा कैवारी आला " अशा ओळी आहेत.) राम-बलराम-सांब,सूर्य,यम,स्कंद, अशा अनेक देवतेची मूर्ती कशी असावी याचे नियमही काय काय होते ते त्यांनी वर्णन केले. शिल्पकाराच्या हातून मूर्ती घडवताना प्रमाण बद्धतेत चुका झाल्या तर त्याच्यावर येणाऱ्या संकटांची माहितीही ते देतात..उदा० हात घसरल्याने शिल्पकाराच्या हातून मूर्तीवर घाव बसला तर त्याच्याही शरीरावर घाव बसून त्याचा मृत्यू होतो, मूर्तीचा एक खांदा दुसऱ्यापेक्षा वर चढला तर शिल्पकाराच्या पत्नीचा मृत्यू होतो वगैरे. त्यामुळे मूर्ती ही सांगितलेल्या नियमांप्रमाणे प्रमाणशीरच असायला हवी. देवालयातील मूर्तीचे पुजारी कोण असावेत याबद्दल नियम घालून दिले होते, त्याप्रमाणे विष्णूचा पुजारी भागवत, महादेवाचे पुजारी साधू आणि यती, अष्ट मातांचे पुजारी ब्राह्मण, बुद्धाचा पुजारी बौद्ध, आणि अर्हन्तचा नग्न पुजारी ठरलेले असत. शिवाय इतर देशांच्या मूर्ती संकल्पनेचीही माहिती ते देतात.

पुढच्या प्रकरणात ते चार वेद, पुराणे, वेदापासून निर्माण झालेली, याज्ञवल्कची कथा, महाभारत, वसुक्रने वेद लिहिले, त्यांची सविस्तर माहिती दिली आहे. आधी कधीही माहीत नसलेलं ज्ञान म्हणजे वेद अशी व्याख्या ते देतात. ते अपौरुषेय आहेत म्हणजे ईश्वराने बनवले आहेत अशी हिंदूंची श्रद्धा असल्याचं सांगून ते म्हणतात की वेद पाठांतराने म्हणणारे पण अर्थ माहीत नसलेले खूप ब्राह्मण आहेत. त्याचा अर्थ जाणणारे खूप कमी आहेत. वेद एका

विशिष्ट पद्धतीने ताल-सूरात म्हणावे लागतात. त्याचीही एक शिस्त आहे. त्यामुळे ते लिखित स्वरूपात नाहीत. पाठांतरानेच ते पिढीकडून पुढच्या पिढीकडे पोचतात. क्षत्रियांना ब्राह्मण वेद शिकवतात. पण काश्मीरमधील वसुक्र नावाच्या ब्राहमणाने वेद लोप पावू नयेत म्हणून सगळे वेद लिहून काढले. व्यासांनी वेदांची निर्मिती करून त्याचे चार भाग केले आणि आपल्या एकेका शिष्याला एकेक भाग कंठस्थ करायला दिला. त्यांच्या शिष्यांची नावं होती, पैल, वैंशपायन, जेमिनी, सुमंतु..अलबेरूनींनी मग चारही वेदांची माहिती, १८ पुराणांची माहिती, ब्रह्माच्या २० पुत्रांनी लिहिलेली स्मृति, महाभारताची माहिती हे सखोल ज्ञान त्यांना होतं. भारतीय वेद-पुराणे-मूर्तिपूजनवरून अल बेरूनी मग साहित्याकडे वळले. व्याकरणाची मनोरंजक जन्मकथा त्यांनी लिहिली आहे.

सातवाहन नावाचा राजा आपल्या स्त्रियांबरोबर जलक्रीडा करत असतांना त्याने ‘’ मा उदकम देहि ‘’ असं आपल्या स्त्रीला म्हटल्यावर तिने मिठाई आणली, कारण तिने मोदकम शब्द ऐकला..तेव्हा राजा रूसला..त्यावर त्या स्त्रीनेही आपला राग व्यक्त केला. तेव्हा त्याचा राग घालवायला एक ऋषि पुढे आले आणि त्यांनी भारतीय व्याकरण शिकून येतो, अशी समजूत घातली. मग ते ऋषि महादेवांकडे गेले आणि भाषेचं व्याकरण नियम शिकून आले..लघु, गुरु, मात्रा, चरण, पिंगल यांनी जन्माला घातलेले नियमबद्ध छंदोबद्ध श्लोक, श्लोकातील अक्षर संख्या, मात्रा, वृत्त, यांची माहिती ते लिहितात. हिंदू आणि अरबी भाषेतील श्लोकांची माहिती, यावर आपला अनुभव मांडतात..पाठांतरावर आधारित छंदबद्ध श्लोक त्यांनी पाठ केले..व्याकरणाचा

त्यांनी एवढा गहन अभ्यास मांडला आहे की थक्क व्हायला होतं. मग ब्रहमगुप्तांच्या प्रमाणांचा उल्लेख त्यांनी केला. यात त्यांनी एक महत्त्वाचं वाक्य लिहिलं. हिंदूंना श्लोकात काव्यात साहित्य निर्माण करण्याची अत्यंत आवड आहे. जर एखादं नवीन पुस्तक त्यांच्या हाती आलं तर लगेच ते श्लोकात रूपांतरित करतात. या हिंदू लोकांना सोप्या छंदातील काव्य पसंत पडत नाही. कारण ते जितकं क्लिष्ट तितका तो कवि श्रेष्ठ असा त्यांचा समज आहे. आणि मग यावर स्वत:ची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. त्यांनी लिहिलं की हे जे मी लिहिलंय त्याला देव क्षमा करेल.

फलज्योतिष, नक्षत्र ज्ञान, पंचतंत्र, वैद्यक ग्रंथ यांचा त्यांनी केलेला अभ्यास, त्यांचं स्वत:चं ज्ञान, त्यांनी केलेला या विषयातील भारतीय विचारवंतांच्या पुस्तकांचा अभ्यास, सर्वच अफाट आहे. सूर्य-वसिष्ठ-पुलिश-ब्रह्म-रोमक सिद्धांतानवर त्यांनी विस्तृतपणे लिहिलं. नक्षत्र, ज्योतिर्विद्या, खगोल शास्त्र, हा त्यांचा लाडका विषय..त्यावर ते भरभरून लिहिलंय. मुहूर्त, पत्रिका, यात्रेचा मुहूर्त, कावळा वगैरे पक्षांच्या आवाजांचे संकेत, पुस्तकात सुई टोचून भविष्य सांगण्याची कला, यांचीही माहिती देतात..ज्योतिष शास्त्रानंतर ते वैद्यक शास्त्राची माहिती देतात.. मूळ नाव अग्निवेश असलेल्या, आयुर्वेदिक ज्ञानामुळे बुद्धिमान म्हणजे चरक नावाने प्रसिद्ध झालेल्या चरक यांचं वैद्यक शास्त्रातील पांडित्य मांडतात..पंचतंत्र पुस्तकाचा अनुवाद करण्याची इच्छा प्रगट करून ते हा विषय संपवतात..

अलबेरूनींनी अभ्यासलेले तराजू, वस्तूंचं वजन-माप मोजण्याची, शरीराची उंची, दोन ठिकाणांमधील अंतर मोजण्याची पद्धती, परीघ-व्यास संबंध याची माहिती लिहिली...दोन स्थळांमधील अंतराला योजन म्हणतात, ते ३२००० गजच्या बरोबर असतं, ४ अंगुली= 1 मूठ, २४ अंगुली= एक हात किंवा एक गज, ४ हात = एक व्याम, ४० व्याम = एक नल्व, २५ नल्व = १ कोस..परीघ हा व्यासाच्या तीनपट असतो..त्याला आधार वायु पुराण-मत्स्य पुराण-पुलित्स, आर्य भट्ट यांचा घेतात..हयुएन त्संग यांनी हेच कोष्टक “ ली “ मध्ये दिलं आहे.

सोनं तोळ्यात मोजण्याची भारतीय परिमाण पद्धतीची नोंदही त्यात दिलेली आहे आणि तीही वराहमीहिरने लिहून ठेवलेल्या परिमाण मोजणीची..आपल्या पूर्वजांनी परिमाणे किती बारीक अपूर्णांकापर्यन्त नेली होती, त्याची माहिती होते..त्यात ते लिहितात की तुलना करणे, मोजणे हा मनुष्याचा स्थायी भाव आहे. दोन एकाच प्रकारच्या वस्तूंची तुलना वजनाने वा संख्येने केली जाते. त्यांनी सोने मोजण्याची वजने दिली आहेत..त्यात सोने हे तोळ्यात. मोजले जाते..तोळ्याच्या सर्वात मोठ्या अपूर्णांकला माषा म्हणतात.. तो १ / २१ अंश आहे..१६ माष १ तोळा होतो..पुढील भाग असे - १ माष = ४ एरंड म्हणजे गौर वृक्षाची बीजे..४ एरंड = १ यव, १ यव – ६ कला, १ कला – ४ पाद, १ पद – ४ माद्री.. सोने मोजण्यासाठी प्रत्येक राज्याची आपापली पद्धत होती..वराहमीहिरने मूर्ती बनवण्यासाठी जी मोजमापे लिहून ठेवली तीही या ग्रंथात आहेत०

मूर्ती घडवताना विचारात घेण्याची परिमाणे म्हणजे, मूर्ती घडवतांना अत्यंत बारकाईने विचार केला जात असे, तो असा- एक धुळीचा कण – एक रज, ८ रज - १ केशाग्र, ८ केशाग्र = १ लिखा ( उवांची अंडी) ८ लिखा = १ ऊ, ८ उवा = १ जवाचा दाणा..

अंगठ्याचे अग्र ते किरंगळीचे (कनिष्ठा) अग्र यातील पंजा पूर्णपणे विस्तारल्यावरील अंतर म्हणजे वितस्ता आणि किश्कु, अंगठा ते अनामिका अंतर गोकर्ण, अंगठा ते मध्यमा बोट अंतर म्हणजे ताल, याच तालाच्या आठपट माणसाची उंची असते, माणसांचे पाय हे एकूण लांबीच्या ७ व्या भागाएवढे असतात..मूर्तीच्या प्रमाणाचं हे भारतीय शास्त्र होतं.

अलबेरूनींचा अभ्यास गणित, संख्या, लिपि, ओम शब्दाची उत्पत्ति, भारतीय रीतिरिवाज, बुद्धिबळ, या क्षेत्रात किती होता, हे या प्रकरणात वाचायला मिळतं. प्रकरणाची सुरुवात प्राची भारतात लेखनासाठी काय साहित्य वापरलं जायचं त्याच्या माहितीने होते..त्याबरोबरच अरबी मूर्तिपूजाकांचेही रीतिरिवाज लिहिले आहेत..दक्षिण भारतात ताल-ताडीच्या पानांचा उपयोग करत. ही पानं एक गज लांब आणि 3 बोटं रूंद असत..या पानांच्या मध्यावर एक भोक पाडून ती बांधली जात..उत्तर आणि मध्य भारतात भूर्ज पत्रांवर लेखन करत असत..भूर्ज वृक्षांची साल खूप तेल लावून खूप घोटून तयार केली जाई. ही सारी पुस्तकं एका कापडात लपेटून ठेवत आणि त्याला पोथी म्हणत..भारतीय वर्णमालेत अक्षरांची संख्या जास्त आहे कारण त्यात स्वर-व्यंजन-विसर्ग असे प्रकार आहेत..एका ओळीला ही अक्षरे लटकल्याप्रमाणे

लेखन करतात..सर्वात जास्त प्रसिद्ध वर्णमाला सिद्धूमातृका आहे, ती काश्मीर, कनौज, मध्यप्रदेशात वापरली जाते..या शिवाय मालव, अर्धनागरी, द्रविड, कानडी, बुद्धाची उडूनपूर याही वर्णमालांचा ते उल्लेख करतात. हिंदू लोक आपल्या लेखनाची सुरुवात ओम ने करतात. परमात्म्याशी एकरूप होणे आणि सुखप्राप्ती असे दोन उद्देश यामागे आहेत असं ते लिहितात आणि मग हिबरू, मुसलमान कशी सुरुवात करतात तेही सांगतात. मग संख्या या प्रकारावर येतात आणि दहाच्या पटीत हिंदू संख्या मोजतात हे लिहितात. वेगवेगळ्या वर्णमालेत वेगवेगळ्या प्रकाराने संख्या लिहिली जाते. हिंदू हे एकमेव आहेत जे सहस्त्राच्या पुढचे अंक मोजू शकतात..एकम, दहम, शतम, सहस्त्र, अयत (दशसहस्त्र), लक्ष, प्रयुत (दशलक्ष) कोटी, न्यर्बुद (दशकोटी), पद्म, खर्व, निखर्व, महापद्म, शंकू, समुद्र, मध्य, अन्त्य, परार्ध अशी १८ नावे ते देतात.. यात १८ वा परार्ध म्हणजे आकाश, म्हणजे असीम. पण काही हिंदूंच्या मते परार्ध च्या पुढे भूरी ही संख्या आहे..यात परत इतर ग्रंथातील बारकावेही ते देतात. २५ पर्यंतच्या आकड्यांचं महत्त्व सांगतात..शून्य=आकाश, एक=आदि-सुरवात, चंद्र, धरणी, दोन=नेत्र, महिन्याचे शुक्ल-कृष्ण दोन भाग, तीन=प्रहर, स्वर्ग-भूमी-पाताळ तीन लोक, आदिशक्ती, चार=वेद, दिशा, पाच=इंद्रिये, महाभूते, वगैरे.

याच लेखात मग ते हिंदू रिती रिवाज, कपडे यांचं वर्णन करतात..हिंदू पुरुष आपले केस आणि दाढी कापत नाहीत. जननेंद्रियाजवळचे केसही काढत नाहीत कारण त्याने विषयवासना वाढते अशी त्यांची धारणा आहे. स्नान करताना आधी ते पाय धुतात आणि मग चेहरा धुतात..समागमापूर्वी ते स्नान

करतात..यज्ञोपवीत घालतात, घोड्यांवर जिन न घालता बसतात. जिन चढवलीच तर उजवीकडून घोड्यावर चढतात, उटणे लावून सणाच्या दिवशी स्नान करतात, स्त्रियांसारखे अंगावर खूप दागिने घालतात. नखे वाढवतात आणि त्यांनी आपल्या डोक्यात खाजवतात. मोठ्या मुलापेक्षा धाकट्या मुलाला जास्त प्रेम मिळतं कारण पहिलं मूल हे प्रबळ कामवासनेने जन्मलेलं असतं आणि दुसरं शांत प्रक्रिया आणि चिंतनाने झालेलं असतं असं समजतात. आपल्या पत्नीचा खास प्रसंगात, अडचणीत सल्ला घेतात. हे लोक पाहुणे म्हणून घरात शिरतांना येऊ का अशी परवानगी मागत नाहीत, तर बाहेर पडतांना निघू का अशी परवानगी मागतात. निरोप घेताना समोरच्याच्या तळहाताला न पकडता बाहेरच्या बाजूने हात पकडतात.. लहान मुलं काळ्या चौकटीवर खडूने लिहितात आणि डावीकडून उजवीकडे जातात..बुद्धिबळ आणि नरद नावाचे खेळ हे खेळतात..शिंकणे हा अपशकुन आणि पादणे हा शुभशकून समजतात. सभेमध्ये बसतांना वीरासनात बसतात. ते गोमूत्र पितात पण गोमांस खात नाहीत.

भारतीय रसायन शास्त्र, यावर माहिती देतांना, त्यांनी अत्यंत उत्सुकतेने या विषयातील इतकी दुर्मिळ माहिती गोळा केली होती की त्याचं आश्चर्यच वाटतं. अनेकांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या होत्या. सापाच्या विषावरचा तंत्र-मंत्र-उतारा, त्याचे किस्से, धारच्या राजवड्यातील चांदीच्या तुकड्यावर उमटलेली मनुष्याची आकृती, हिंदू लोक वनस्पतींच्या नानाविध वनस्पतींच्या मिश्रणाने वृद्धाला तरुण करतात, पांढरे केस काळे करणे, मृतप्राय माणसाला जीवंत करणे यांच्या कथा त्यांनी घातल्या आहेत. या रसायनशास्त्राचा जनक

नागार्जुन होता. तो सोमनाथाजवळ दईहक कोटचा राहणारा होता..त्याच्या पुस्तकात त्याने अनेक रसायन मिश्रणे लिहून ठेवली होती..या प्रकरणात रसायन बनवणारे आणि रसायने यांच्या अत्यंत चित्तवेधक कथा आहेत..उज्जैनमध्ये राहणारा शककर्ता विक्रमादित्याच्या काळातील ब्याडी नावाचा सतत प्रयोग करत राहणारा रसायनशास्त्रज्ञ, पंडित, हिंदूंचा तंत्र, मंत्र, जादू टोणा, सर्पदंशावरचा मंत्र यांनी हे भारतीय मानसिकता दाखवणाऱ्या प्रकरणाने भरलं आहे आणि शेवटी, माझा यावर काहीही विश्वास नाही हेही स्पष्ट केलं आहे. रसायन बनवण्याच्या वेडाने भरलेले किती भारतीय होते, तेही अभिमानास्पद वाटतं.

भूगोलाकडे वळलेले अलबेरुनी..हयुएन त्संग यांच्यापेक्षाही या अभ्यासात आणखी पुढे गेले आहेत. या लेखात ते भारताचं इथल्या नद्या, पर्वत, मैदानं, वनसृष्टी, यांचं भरभरून कौतुक करतात..आणि मग आपल्या पाहिल्याच परिच्छेदाच्या शेवटच्या ओळीत म्हणतात, की एकेकाळी जिथे समुद्र होता, त्या समुद्रात या नद्यांच्या गाळाने हळूहळू जमीन तयार होऊन हा भारत देश बनला आहे यावर कोण नाही विश्वास ठेवणार..? अलबेरुनी यांनी भारताची सीमा पश्चिमेकडे सिंध ते पूर्वेकडे बंगाल धरली आहे. त्यामुळे त्यांनी कनोजला भारताचा मध्य धरला होता. सिंध, स्थानेश्वर (कुरुक्षेत्र) वासुदेवाची मथुरा(माहूर) म्हणतात, कनोज(कान्यकुब्ज), जौन(यमुना) ही नावं घेत या स्थळांची माहिती देतात कारण गझनीचा महंमद या ठिकाणी गेला होता..गंगेच्या पूर्व किनाऱ्यावरून बंगालच्या उपसागरात ती विलीन होईपर्यंतची सर्व राज्यांची नवे त्यांनी लिहिली. आणि विशेष म्हणजे त्यांचं अंतरही नमूद केलं. कनोजाहून

नेपाळ आणि नेपाळवरून तिबेटच्या सीमेवरील भोटेश्वरपर्यंतचा प्रवास, दोरखंडांचे डगमगते पूल, खाली बर्फाळ नदी, ह्यावरून नेपाळी लोक खांद्यावरून आपलं ओझं कसं वाहून नेतात तो खरोखर धाडसाचा प्रवास वाटतो.

तो प्रदेश अलबेरुनींना परिचित होता..या सबंध प्रकरणात त्यांनी भारतातील काश्मीर ते श्रीलंकेपर्यंतचे प्रदेश, नद्या, पर्वत, कनौज ते गझनी, कनौज ते नेपाळ, कनौज ते मथुरापर्यंतचे अंतर, कनौज ते गंगेच्या मुखापर्यंतची शहरं, वाटेत लागणारी गावं यांचा तपशील देतात. मथुरा ते कनोज अंतर त्यांनी २८ फर्सुख ( १ फर्सुख=४ मैल ), कनोज ते भारतीय समुद्र तटांचा उल्लेख, माळवा, उज्जैन, मरहट्टा, धार, कोंकण, रामेश्वर, मालदीव, लक्षदीव, अशा महत्त्वाच्या आणि प्रसिद्ध शहरांची ती लिहिली आहे, त्यात रामायणाची कथाही श्रीलंकेला जोडणाऱ्या सेतूच्या ठिकाणी दिली आहे..उत्तर भारतातील कनोज ते गझनी, काश्मीर, सिंधू नदीच्या धारा, पश्चिमी – दक्षिणी किनाऱ्यावरील प्रदेश, भारतातील जलवृष्टी, भारत आणि चीनमधील समुद्रातील द्वीपकल्प, यांची सविस्तर माहिती दिली आहे. काही काही ठिकाणी बादलीने पाणी ओतल्यासारखा पाऊस होतो असं लिहिलं आहे. यानंतर भारतातील जंगलांमध्ये राहणारे प्राणी-त्यांची वर्णने त्यांनी लिहिली.

भूगोल सोडून अलबेरूनी आता खगोल शास्त्रीय माहितीकडे वळतात आणि त्यांनी भारतीय नक्षत्र, मासांची नावं, वार, ग्रह नक्षत्रे, चंद्र, राशी, यांचा किती गहन अभ्यास केला होता ते प्रत्ययाला येतं. श्रीकृष्णाने गीतेमध्ये

मी ६ ऋतूंमधला वसंत आहे, असं म्हटलं आहे हेही सांगतात. १५६ सप्ताहदिन, राशीतील चंद्राचे स्थान यांची नावे देतात. वारांची नावे, नक्षत्रांची अनेक नावं, सूर्योदयापासून तासागणिक बदलत जाणारे त्यांचे स्वामी, सोम, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि यांना असणारी विविध नावेही त्यांनी लिहिली आहेत. सूर्याला आदित्य म्हणतात कारण तो आदि-मूळ आहे, सवितृ – जगाची संतती निर्माण करणारा, रवि म्हणजे द्रवरस निर्माण करणारा असे अर्थही सांगतात. १२ राशींची प्रचलित आणि अप्रचलित नावं लिहितात..बारा राशींच्या प्रतिमांचं वर्णन करतात..भारतीय खगोल शास्त्राची भरभरून माहिती देणारा हा लेख आहे.

ब्रम्हांडवर विचार..- हे सबंध प्रकरण ब्रम्हांड, त्याची हिंदू शास्त्राप्रमाणे भागातून झालेली उत्पत्ति, ग्रीकांचे विचार, कुरणातील सिद्धान्त, पौलीश, ब्रह्मगुप्त, वासिष्ठ, ब्रह्मगुप्त, आर्यभट्ट, बलभद्र यांचे सिद्धान्त, प्लेटोच्या टिम्युस ग्रंथातील विचार, ग्रंथातील विचार यावर अल बेरूनी भाष्य करतात. मग ॲरिस्टोटल, प्लेटो, जोहानीस ग्रामाटीकस, यांच्या विचारांची मांडणी करतात. अत्यंत गहन चर्चा आणि अलबेरुनी यांचा प्रकांड अभ्यास यांचं दर्शन हा प्रकरणात होतं..

धार्मिक विचारानुसार आकाश आणि पृथ्वी यांचं वर्णना ते पहिल्या परिच्छेदतच स्पष्ट करतात की अनेक भाषा आणि एका विशेष नामाला अनेक समानार्थी नावे, यामुळे भारतीयांच्यामध्ये सिद्धांतावर मतभेद बसले तरी विशेष नामांचे अर्थ बदलल्यामुळे गोंधळ आहे..हिंदूंना ती आपली भाषा समृद्धी वाटते पण तो खरा त्यांचा दोष आहे..यात हिंदूंना दोष देण्याचा हेतू नाही पण ज्यांना

अभ्यास करायचा आहे त्यांच्या संकल्पना स्वच्छ असाव्यात एवढाच उद्देश आहे. पृथ्वी आणि धार्मिक अंगाने सात पृथ्वी वर्णन केल्या आहेत..यात वायु पुराण, विष्णू पुराण, आदित्य पुराणातील भेद त्यांनी दाखवला आहे. ॲरिस्टॉटल, प्लेटो, होमर, जोहान्स ग्रामटिकस यांचे सिद्धान्त मांडतात..सात पृथ्वी, सात आकाश आणि लोक यांचं वर्णन झाल्यावर ते द्वीप आणि समुद्र याकडे वळतात..यात सिंहल-द्वीप, लक्ष-द्वीप माल-द्वीप यांची नावं आहेत. ही बेटे उदयाला येतात आणि मग गडप होतात..पतंजलिने सांगितलेली द्वीप आणि समुद्र यांची परिमाणे यावर केलेली भाष्ये त्यात आहेत. हिंदू सिद्धांताप्रमाणे समुद्र हा धरतीला कॉलरसारखा विळखा घातलेला आहे. वायुपुराणात सांगितलेली जीव सृष्टी यात वर्णन केली आहे. पृथ्वीच्या मधल्या घेराचा पतंजलीने सांगितलेला आकडा आहे. पृथ्वीच्या अगदी शेवटच्या स्तरावरील, एक हजार शीर्षस्थांनावर पृथ्वी तोलून धरलेल्या शेष नागाचाही उल्लेख त्यांनी केला आहे..यात दोन पृथ्वी सूर्य, सप्तर्षि- शनि, बुध-चंद्र अशी सर्वच ताऱ्यांची अंतरं दिली आहेत.

वायुपुराण, सोमदत्ताची कहाणी, ध्रुवाची कथा, दक्षिण ध्रुवाची निर्मिती, विष्णु धर्म यावरील अभ्यास अलबेरूनींनी केला. त्यांनी दक्षिण ध्रुवाच्या निर्मितीची एक मनोरंजक कहाणी सांगितली आहे. एक पुण्यशील सोमदत्त राजा जेव्हा मरण पावला तेव्हा त्याने आत्म्याला विलग न करता, शरीरसकट स्वर्गात जाण्याची इच्छा ऋषि वासिष्ठांना बोलून दाखवली. पण ती त्यांनी मान्य केली नाही. मग सोमदत्ताने त्यांच्या पुत्रांना विनंती केली, पण त्यांनीही ती अव्हेरली.

तेव्हा सोमदत्ताने विश्वामित्र ऋषींना गाठून आपली इच्छा सांगितली. त्याबरोबर वासिष्ठांनी नाही म्हटलं हे कळल्यावर विश्वामित्रांनी संतापून लगेच पृथ्वीच्या दक्षिणेला एक वेगळा स्वर्ग निर्माण करण्याची प्रतिज्ञा केली. ते ऐकल्यावर इंद्र घाबरला आणि धावत येऊन विनयाने ऋषींना म्हणाला की आम्ही सोमदत्ताचा आत्मा त्याच्या शरीरसकट घेऊन जातो पण नवीन स्वर्ग करू नका. म्हणून दक्षिणेला ते काम थांबलं. तो हा दक्षिण ध्रुव. पृथ्वी ही दोन टोकांच्या धृवांना जोडणाऱ्या शलाकेभोवती (आस) फिरते असा समज आहे, पण हिंदू लोक, आकाशाला घुमट आणि त्यावर एकच ध्रुव मानतात असं अल बेरुनी सांगतात. वायुपुराणात कुंभाराच्या चाकाची उपमा त्याला दिली आहे. धृव तारा आपल्या जवळपासच फिरतो आणि त्याचा परिभ्रमण काल ३० मुहूर्त म्हणजे एक दिवस एक रात्रीत संपतो असं दिलं आहे..मुलतानच्या लोकांना ग्रीष्म ऋतुत लाल रंगाचा तारा दिसतो, त्याला शूल-काठी, नावाने ओळखतात आणि तो अशुभ आहे असं ते मानतात. चंद्र जेव्हा पूर्वा भाद्रपदात असतो तेव्हा हिंदूलोक दक्षिणेचा प्रवास करत नाहीत कारण तो शूल तारा मार्गामध्ये असतो. अल जहानींच्या सूसरीसारख्या दिसणाऱ्या ज्वर ताऱ्याची कहाणी, ब्रह्मदेवाने विश्व निर्माण करण्यासाठी स्वत:ला दोन भागांमध्ये विभागलं, त्यात उजव्या भागाला विरज आणि डाव्या भागाला मनु म्हणतात, ज्यातून काल निर्देशक मन्वंतर शब्द आला आहे. मग यात उत्तानपदाचा पुत्र धृवच्या अढळपणाची कथा आहे, विष्णूपुराणातील विचार, अशी सर्व रंजक आणि अभ्यासपूरणही माहिती यात आहे.

पृथ्वी आणि मेरू पर्वत यावर ब्रहमगुप्ताचे विचार – या लेखात फक्त मेरू पर्वत याचाच विचार मांडला आहे. भारतीय पुराणात मेरू शब्दाला फार मोठी महती आहे. मेरू पर्वतावर राहणाऱ्या देवतांची रात्र सहा महिने आणि दिवस सहा महिने असतो. असं ब्रहमगुप्ताने लिहून ठेवलं आहे. मेरू पर्वत चतुर्भुज आहे की गोल यावरही वेगवेगळे मतप्रवाह आहेत..बलभद्र म्हणतो की की मेरू प्रकाशमान आहे पण मानवी वस्तूपासून कैक योजने दूर असल्यामुळे तो दिसत नाही, आणि ती नंदनवन अरण्यात आहे. मत्स्य पुराणात मेरू पर्वत हा सोन्याचा असून चौकोनी आहे. त्याच्या एकेका बाजूला पंधरा, लाल काळा, आणि सोनेरी रंग आहे. तिथे देव देवता गंधर्व सोन्याची घरं बांधून राहतात, असूर, राक्षसही राहतात. गोड पाण्याच्या इथे नद्या वाहतात, या पर्वताभोवती मानस सरोवर आहे. त्याभोवती लोकपाल राहतात.. मेरू पर्वताच्या आजूबाजूला महेंद्र, माळय, साह्य, शुक्तिमान, विंध्या, ऋक्षबाम, पारित्राय असे ७ मोठे पहाड आहेत आणि अनेक लहान पर्वत आहेत..त्यावर मानवी वस्ती आहे..मेरू पर्वताच्या आजूबाजूला हिमवंत पर्वतावर राक्षस पिशाच, हेमकूटावर गंधर्व-अप्सरा, निषाध वर ताक्षक-अनंत-वासुकी, असे ७ नागराज, नील पर्वतावर ऋषि, श्वेत पर्वतावर दैत्य राहतात. श्रृंगवंतावर देवतांचे पितर राहतात. हिमवंत आणि या पर्वताच्या मध्यावर कैलास पर्वत आहे..अलबेरुनी मग वायु प्राण, मत्स्यपुराण, आदित्य पुराणातील वर्णन करतात. हिंदू धर्मशास्त्रातील कल्पना वाचल्यावर ते बौद्धांची काय कल्पना होती, याचा शोध घेतात. बौद्ध विचारांप्रमाणे मेरू पृथ्वीच्या मध्यभागी असून ती तळाशी चौकोनी आणि शिखरावर गोल आणि

नीला आहे, म्हणून आपल्याला आकाश निळं दिसतं..ते मग झरतुष्ट्राचा विचारही वर्णन करतात..

जंबू-शाक-क्रौंच-पुष्कर-गोमेद-कुश आणि शाल्मल या ७ द्विपांची मत्स्य आणि विष्णू पुराणातील माहिती अलबेरूनी यांनी या प्रकरणात लिहिली आहे..जंबूद्वीप हे नाव त्या नावच्या वृक्षावरून पडलं आहे..या द्वीपवरील दीर्घायुषी पुरुष सोनेरी कांतीचे आणि स्त्रिया सुंदर असतात असं त्यात लिहिलं आहे. नैसर्गिक मृत्यू येणे हे विषप्रयोगाचं लक्षण मानतात..शाकद्वीप हे रत्नांचं आणि औषधी वनस्पतींचं भांडार आहे. यात कद्रू आणि विनीता, गरुड आणि सापांची कथा अल बेरूनी लिहितात..या बेटावरील लोक धर्मशील असतात. पुढील कुश द्वीपावर अनेक औषधी वनस्पतींनी भरलेला द्रोण पर्वत आहे. मृताला जीवंत करणारी, संजीवनी देणारी वनस्पति इथे उगवते. रत्नांचे ७ पर्वत आहेत. या बेटावर यमुना नदी आहे..चौथ्या क्रौंच द्वीपावर गोरे, धर्मशील लोकं राहतात. पाचवं आहे शाल्मल द्वीप, ज्यावर सदा सुखी सुंदर लोक राहतात. ते अग्नीला नैवेद्य अर्पण करतात. इथे एकाच प्रकारचं सुंदर हवामान असतं. तिथे कधीही दुष्काळ पडत नाही. हे लोक संतुष्ट असल्यामुळे इथे राजाचं शासन लागताच नाही. हे लोक मातेच्या गर्भातून जन्मत नाहीत..यानंतर आहे गोमेद द्वीप. यावर सुमनस हा काळया रंगाचा आणि कुमुद हा सोनेरी रंगाचा असे दोन पर्वत आहेत. नंतर वर्णन आहे ते पुष्कर द्वीपाचं, जे न्यग्रोध वृक्षामुळे सुरू झालेलं आहे ज्यावर ब्रहमाची मूर्ती आहे. या गोल द्वीपावर गोलाकार मानसोत्तम नावाचा पर्वत आहे..

पुढील संपूर्ण प्रकरण भारतातील नद्या, हिमालयातून निघालेल्या नद्या, मुलतान, युरोप आणि आशियातील नद्या यांच्यावर लिहिलेलं आहे..गंगा सरस्वती, यमुना, सिंधू त्यांना मिळणाऱ्या नद्या, पंजाब या साऱ्यांचा उल्लेल्ख यात केलेला आहे. उत्तर भारतातील सर्व महान लहान नद्यांचे उगम, त्यांच्या उपशाखा, त्यांना येऊन मिळणाऱ्या नद्या, त्यांचे सागर मिलन यांचा इतका बारीक सारिक तपशील अलबेरूनी सांगतात की थक्क व्हायला होतं. वायु पुराण, मत्स्य पुराण, विष्णू पुराणांच्या आधारे ही माहिती दिली आहे.

हे सबंध प्रकरण पृथ्वीची गोलाई, ती चल की अचल, उत्तर-दक्षिण भागात वाटली गेलेली पृथ्वी, तिचा मेरूदंड, वायू-मत्स्य पुरणांचा संदर्भ, गुरुत्त्वाकर्षण यावरील चर्चेचं आहे..या लेखाच्या सुरूवातीला इस्लाम मधील पृथ्वीचं मत आणि मग हिंदू शास्त्रबद्दल ते लिहितात. ते खोचकपणे लिहितात की, भारतात ज्योतिष शास्त्राने खगोल शास्त्रावर इतकी मात केली आहे की राशीचक्र, भविष्य सांगणारा ज्योतिषी कायम स्वर्गातच जातो, एकही ज्योतिषी नरकात जात नाही, अशी हिंदूंची गाढ श्रद्धा आहे. धार्मिक पुस्तकं आणि पुराणातील सांगितलेल्या धार्मिक विधी, मुहूर्त सांगणे, शुभशकून सांगणे हे करणारांवर या हिंदू लोकांचा परम विश्वास आहे. त्यामुळे खगोल शास्त्रज्ञ मागे पडतात. हिंदू शास्त्रज्ञ पृथ्वी गोल आहे, तिचा उत्तरी भाग शुष्क आणि दक्षिण भाग पाण्याने भरलेला आहे, असं मानतात. मग पृथ्वीचे दोन ध्रुव मेरूदंडाने जोडले आहेत असा हिंदूंचा सिद्धान्त ते मांडतात. वसिष्ठ, वराहमीहिर, आर्यभटापर्यंत सर्व पृथ्वी, जल-अग्नि-वायू-आकाश या पाच तत्त्वांना मानतात

ही माहिती देतात..भिन्न स्थलांच्या भिन्न वेळा हे पृथ्वी गोल असण्याचा पुरावा आणि ग्रहणकाळ हे पुरावे हिंदू मानतात..पृथ्वीचा आकार कासवाच्या पाठीसारखा आहे हाही सिद्धान्त ते लिहितात. मग पृथ्वी चल की अचल, पृथ्वीचा भ्रमण काल, सूर्य स्थिर की चल यावर विविध पंडितांचे सिद्धांत ते लिहितात..

कालगति, ६० घटिकांमधील विभाजन, स्थिर तारे, त्यावरील मत्स्य-वायू-विष्णूधर्मांचा उल्लेख आहे..आकाश-तारे-त्यांचं भ्रमण- वारे- दिशा यावर सतत चिंतन करून या पृथ्वीचं गूढ शोधण्यासाठी भारतीय खगोल शास्त्रज्ञांनी खूप आकाश निरीक्षण केलं, त्यावर संकल्पना मांडल्या आणि सिद्धान्त तयार केले..अलबेरूनी यांचा खगोलशास्त्र हा अत्यंत जिव्हाळयाचा विषय होता..म्हणून त्यांनी सर्व पुराणं वाचून काढली. त्यांचा संस्कृतचा अभ्यासही इतका दांडगा होता की ते उरग: म्हणजे छातीवरून जाणारा म्हणजे सर्प हेही त्या नमूद करतात..ज्यांना आपल्या पुराणांमद्धे काय विचार मांडले आहेत ते समजून घ्यायचं असेल त्यांना अलबेरूनी यांच्या लेखांमद्धे भरपूर बौद्धिक खाद्य आहे..आपल्या शास्त्रज्ञांनी कोणत्याही तंत्रज्ञानाशिवाय केवळ निरीक्षण आणि विचार यावरच सिद्धान्त तयार केले होते ही आवर्जून लक्षात ठेवायला हवं. त्यात बलभद्र, वराहमीहिर, आर्यभट्ट यांनी केवढं संशोधन केलं आहे याची माहिती होते. अलबेरुनी मग कोणत्याही आकाशास्थ ग्रहांचा अभ्यास हा लांबी-रुंदी आणि अंतर, ते कुठे एकमेकांना छेद देतात, दशदिशा यावर विचार मांडतात.

ग्रीक आणि अरब खगोल शास्त्रज्ञांनी वारे वाहण्याचा विचार केला तो भारतीय सिद्धांतांमध्ये नाही असं नमूद करतात. त्यामुळे ग्रीकांच्या १६ दिशा आहेत..

पुढे ते खोचकपणे लिहितात की हिंदू लोकांना कोणताही, काल्पनिक असो वा बौद्धिक, त्याचं मानवीकरण करण्यात अतिशय रस असतो. म्हणून त्यांनी सप्तर्षीचा मुख्य तारा अत्री याचा विवाह दिशांशी करून त्यांना एक चंद्रमा प्रसवला असं मानतात. पुढे ते म्हणतात, मानवाप्रमाणे स्त्री-पुरुष विवाह आणि त्यांना अपत्य होणे हा न्याय, याला मुस्लिम लोक हसतील पण अशी पूर्वाषाढा, कृत्तिका, नक्षत्रे आणि त्यांच्या विवाहातून निर्माण होणारी संतती, अशी कितीतरी उदाहरणं सांगता येतील..एकेका दिशांचा एकेक स्वामी हा विचार हिंदूमद्धे दृढ आहे..त्यानंतर ते या शास्त्राचा आणि ज्ञानाचा जुगार खेळायला, डाव जिंकायला कसा उपयोग करतात त्याचं सचित्र वर्णन करतात. शेवटी म्हणतात की यावर विश्वास ठेवून खेळणारे आणि फासे फेकण्यावर आपण जास्त विचार न केलेला बरा..

पृथ्वीच्या विस्ताराची माहिती, भुवनकोश ऋषींच्या पुस्तकाने या प्रकरणात सुरू होते. हिंदूंच्या मते त्यांचा देश हाच एकमेव देश आणि हिंदू हीच एकमेव जात आहे. हिमवंताच्या दक्षिणेला सुरू झालेली मानवी वस्ती, या देशाचे ९ भाग ज्याला प्रथमा म्हटलं जातं, भरताच्या नावाने या देशाला भारत नाव पडलं हे सांगितल्यावर, अलबेरूनी वायु पुराण आदि इतर सिद्धांताकडे वळतात..वायु पुराणात पांचाल, मगध, सिंधू, कालिंग, मथुरा अशी नावे देऊन ते कालानुसार स्थानांची बदलेली नावेही सांगतात.. उदा० मुलतानाची

बदललेली कश्यपपुर, सांभापूर, हंसपूर, मग मुलस्थान, ही ती नावं. शिवाय उच्चार नीट करता न आल्यामुळे बदलेली नावेही असतात. या सबंध प्रकरणात त्यांनी दिशांवरून तयार झालेली नावं वाचायला मिळतात. या पृथ्वीच्या विस्ताराचा आकार अष्ट दिशांमुळे, कासवासारखा आहे विचार वाचायला मिळतो. हिंदू लोक लंका हा रेखांशाच्या दृष्टीने मध्यवर्ती स्थान होंडू ज्योतिशी मानतात, त्याचा पूर्वेला यमकोट, आणि पश्चिमेला रोमाक आहे असं लिहितात. मग यमकोटी संकल्पनाही वर्णन करतात. यमकोटीचा उल्लेख हिंदू साहित्यात अजिबात नाही पण तुर्की साहित्यात आहे. त्यांनी ८ दिशांच्या सर्वच्या सर्व राज्यांची विस्तृतपणे एवढी नावे दिली आहेत की आपला देश होता तरी किती मोठा, याचं मनोज्ञ दर्शन घडतं. हिंदू लोक अक्षांश रेखांश कसे शोधतात तेही त्यांना शिकायला मिळालं असा त्यांनी सांगितलं आहे आणि अखेरीला, जास्त दिवस जगलो तर निशापूरचे रेखांश यावर प्रबंध लिहिण्याचा मानस व्यक्त करून या प्रकरणाचा शेवट केला आहे. .

पृथ्वीचा घुमटाकार आकार, पूर्व ते पश्चिमच्या मध्यावर असलेली लंका ही हिंदूंची धारणा आहे असं अलबेरूनी सांगतात. लंका ही राक्षसांची गढी मानली जाते म्हणून सत्शील लोक शुभ कार्यासाठी दक्षिणेकडे जात नाहीत..ज्योतिष शास्त्राप्रमाणे लंकेहून मेरूपर्यंत ओढलेली सरळ रेषा उज्जैनवरून मथुरा, यमुना नदी, स्थानेश्वर, वरून सरळ रोहटकपर्यन्त जाते. लंका शब्दावरून अलबेरूनींना लवंग शब्द आठवला. त्यांनी एक वेगळाच विचाऱ त्यात मांडला आहे. कारण लवंगा लंग देशावरून येतात. सर्व खलाशांचा

एकमताने होकार आहे की लंगच्या किनाऱ्यावर अनेक निर्याती वस्तू कातडी चादरीवर मांडून ठेवलेल्या असतात. त्यावर व्यापाऱ्याचं नाव निशाणी असते. मग ते खलाशी आपआपल्या जहाजांवर परत जातात.. दुसरे दिवशी जेव्हा परत येतात तेव्हा त्या मालावर लवंगा किंमतीच्या रूपात ढीग मांडून ठेवलेल्या असतात. म्हणून लंका हा शब्द तयार झाला..त्याचा उल्लेख लंगबलूस असा आहे, इतिहासकार त्याला सध्याचा देश निकोबार नावाने ओळखला जातो. (हे नाव आता गुगलवर सापडत नाही) तिथे नरभक्षक राहतात आणि तिथे मागे राहिलेला माणूस परत दिसत नाही. हिंदूंचा दृढ विश्वास आहे की लंकेवरून येणारा वारा देवीचा रोग आणतो..हा आजार जर तीव्र असेल तर एक अवयव तोडला जातो. लवंगा आणि सुवर्ण भस्म यांचं मिश्रण रोग्याला पाजवलं किंवा त्या गळयात बांधल्या तर त्या उपायाने दहापैकी नऊ रोगी ठीक होतात..

हिंदूंनी शोधून काढलेली रेखांश ठरवण्याच्या रीतीवर आहे. रेखांश ठरवण्याची हिंदू पद्धत, पृथ्वीचा परीघ आणि उज्जैनचे काल या संकल्पनेवरील हिंदू विचार धारणा, ब्रहमाचे जागणे -झोपणे, या जगाचा अंत कसा होईल यावर विविध पंडितांचे विचार मांडले आहेत यावर अत्यंत अभ्यासनीय व्यासंगपूर्ण विवेचन त्यांनी लिहून ठेवलं. एक दिवस आणि एक रात्र यांचा सूर्याच्या अर्धगोलातील भ्रमण काळाशी असलेला संबंध यात अलबेरूनी दाखवतात. हा काल दोन भागांमध्ये वाटला गेला आहे. क्षितिजावर सूर्य उगवताना दिसणे हा दिवस आणि क्षितिजावर सूर्य मावळताना दिसणे ही मनुष्य अहो-रात्रची व्याख्या हिंदू करतात हे ते सांगतात.ही मनुष्य अहोरात्र, दुसरं प्रकाश आणि अंधारवर

आधारित चंद्रलोकात राहणाऱ्या पितरांचं अहोरात्रही हिंदू मानतात. उदयास्तावर दिवस रात्र न मानता, चंद्रप्रकाशावर अहोरात्र-दिवसरात्र अवलंबून असल्यामुळे पितरांचं शुक्लाष्टमी ते कृष्णाष्टमी अहोरात्र हिंदू मानतात. त्यामुळे पूर्ण प्रकाश म्हणजे पौर्णिमा आणि पूर्ण अंधार म्हणजे अमावास्या यांचा विचार यात केलेला आहे. मग येते ती दिव्याहोरात्र जी देवादिकांची असते. ही संपूर्णत: उत्तरायण आणि दक्षिणायन या सूर्य परिक्रमेवर अवलंबून आहे..

यात दक्षिणायनाला सुरुवात झाली की उत्तर ध्रुवाच्या खाली अंधार आणि दक्षिण ध्रुवावर उजेड अशी विभागणी मानली गेली आहे..अहोरात्र-दिवस रात्रीचा विचार, यात मानव-पितर यांचे अहोरात्र आणि देव-ब्रह्माच्या दिनाची संकल्पना आहे. देवांचं निवासस्थान दोन्ही धृवांच्या खाली असतं, त्याला देव अहोरात्र म्हणतात. यात अर्धं वर्ष देवांचं आणि अर्धं वर्ष दानवांचं असतं. आर्यभट्ट म्हणतो की सूर्य जेव्हा सर्व राशींमधून फिरतो, तो देव आणि दानवांचा एक दिवस, एक रात्र होते. यानंतर येते ती ब्रहमाची अहोरात्र. ती इतकी मोठी असते की या एका अहोरात्रीत दिवसा सृष्टीची निर्मिती, आणि रात्रीत विलय होतो. ब्रह्माच्या एका दिवसा आणि रात्रीला कल्प म्हणतात. शेवटी येतो तो पुरुषाहोरात्र. ज्याला महाकल्प म्हणतात. भारतीय चार ठळक आणि त्यांच्यामधील चार अशा ८ दिशा आणि शिवाय ऊर्ध्व आणि अधर दिशा २ अशा १० दिशा मानतात हे सांगतात..

एकदा काल हा विषय घेतल्यावर अलबेरुनी मग काल त्याचे प्रहार-घटिका-क्षण-निमिषपर्यंतचे भाग, मुहूर्त, त्याची स्थिरता-अस्थिरता, फल

ज्योतिष, याची माहिती देतात. यात त्यांचं पहिलं वाक्य म्हणजे हिंदू लोक समय - कालमापनाच्या सूक्ष्म विभाजणात उगीचच श्रम करतात. कारण त्यात एकवाक्यता झालेली नाही. त्या विभाजनात अनेक पायऱ्या आहेत. त्यात एका मिनिटाचे ६० भाग म्हणजे सेकंद म्हणजेच चषक-विघटिका. परत या एका विघटिकेत एका संपूर्णपणे शारीरिक आणि मानसिक सुदृढ असलेल्या माणसाचे निद्रासमईचे ६ श्वास होतात ज्याला प्राण म्हणतात. १५ सेकंद म्हणजे एक क्षण, निमिष म्हणजे ज्यात दोन वेळा पापणी उघडमिट करते. त्याही आणखी काल परिमाण म्हणजे लव ज्यात त्रुटि हा सर्वात लहान अंश आहे. यात एक त्रुटि म्हणजे अंगठ्याजवळ पहिलं बोट दुमडणे, ज्याचा अर्थ उत्तम असाही केला जातो. याप्रमाणे हिंदूंच्या मते, २ त्रुटि म्हणजे एक लव आणि २ लव म्हणजे एक निमिष. या कालगणनेत वेगवेगळ्या पंडितांचे भिन्न भिन्न विचार आहेत..

हिंदूंचा या पुढचा विचार आहे तो म्हणजे प्रहर म्हणजे एका दिवसाचे ८ भाग. प्रत्येक प्रहर मोजण्यासाठी जलकुंभाची योजना असते. प्रत्येक प्रहरानंतर गावात नगारा आणि शंख वाजवला जातो. एका दिवसाच्या ३० घटिका असतात. पण त्यात सुसूत्रता नाही. म्हणून एक मुहूर्त म्हणजे दोन घटिका एवढाच ढोबळ अंदाज केलेला असतो. या प्रकरणात मुहूर्ताचा काल, पंडितांची त्यावरील मतमतांतरे, घटिका आणि श्वासाचा कालगणनेतील संबंध यावर विचार आहे. श्वास म्हणजे प्राण हा, अपान म्हणजे श्वास आत घेणे आणि प्राण म्हणजे बाहेर सोडणे असा बनलेला असतो. एक मुहूर्त हा ३६० अपान आणि ३६० प्राण यांनी बनलेला असतो हे कालमापन श्वासाच्या तुलनेतील आहे. हिंदू

कालगणनेत वक्र होरा ही आणखी एक संकल्पना आहे, ज्यात दिवस आणि रात्रीचे १२ समान भाग असतात. इथे अलबेरुनी व्यासांचा उल्लेख करतात आणि सांगतात की युधिष्ठिराचा जन्म ज्येष्ठातील पौर्णिमेला, मध्यान्हय काळाच्या आठव्या मुहूर्तावर झाला होता, त्यादिवशी पौर्णिमा होती अशी दुरूस्ती मार्कंडेयांनी केली आहे हेही सांगतात. यानंतर प्रत्येक मुहूर्त आणि त्याचा स्वामी-अधिपति यांची नावं ते देतात, यात विष्णू धर्मात सांगितलेली कुलिक काळसर्प वेळेचीही माहिती आहे.

नंतर चंद्रमास, सौर मास, त्यांची गणना, मासांची नावे, विविध मास वर्षे यांची माहिती अलबेरुनी देतात..सूर्य आणि चंद्राच्या एका संयोगापासून दुसऱ्या संयोगापर्यंतच्या काळाला हिंदू लोक एक मास-महिना म्हणतात. चांद्रमासावर याची गणती होते. कलेकलेने वाढत जाणाऱ्या आणि उतरत जाणाऱ्या कलांवर चंद्रप्रकाश अवलंबून असतो. पूर्णचंद्राची ती अवस्था काही काल का असते ते या सुशिक्षित लोकांनाही माहीत नाही असं ते सांगतात. कारण चंद्र हा सूर्यापेक्षा खूप लहान आहे आणि त्याच्या मोठ्या भागावर सूर्यप्रकाश असतो, याचा विचार ते करत नाहीत हे कारण ते देतात. हिंदूंना चंद्राचा द्रव पदार्थांवर परिणाम होतो, म्हणून भरती ओहोटी येते, हे उत्तम रीतीने माहीत आहे. अंगतील ज्वरही त्यावर अवलंबून असतो हेही त्यांना माहीत आहे. पशू पक्षी वृक्ष यांच्यावरही चंद्राचा असर होतो. हिंदू शेतकरी कापूस, काकडी, खरबूजांची लागवड चंद्राचा परिणाम लक्षात घेऊन करतात. ज्योतिषीही आपल्या अभ्यासात चंद्रालाच महत्त्व देतात.

हिंदू खगोल शास्त्रज्ञांनी चंद्राचा उदय आणि अस्त काळात, प्रकाशित आणि अप्रकाशित भाग पूर्णपणे दृश्यमान होण्यात २ घटिकांचा फरक पडतो हे लक्षात घेतलं आणि चांद्रमास हा २९ पूर्ण १८९००५ / ३५६२२२ दिवसांचा असतो. आणि सौर मास ३० पूर्ण १३६२९८७/३११०४०० काळाचा असतो असा हिशेब लावला आहे. म्हणून चांद्रवर्ष हे ३५४ पूर्ण ६५३६४/ १७८१११ दिवसांचं होतं. बारा महिन्यांचं एक चांद्रवर्ष होतं. दुसरं असतं ते सौर वर्ष. ज्याची गणना सूर्यभ्रमणावर अवलंबून असते. सूर्याचा एकाद्या राशीत प्रवेश म्हणजे संक्रांत. मकर राशीतील प्रवेश म्हणजे मकर संक्रांत, ज्या दिवशी उत्तरायणाला सुरुवात होते. अलबेरुनी त्यानंतर पितर, ब्रह्मा, देवतांच्या मासांचेही किती दिवस ते सांगतात. याचा विस्ताराने केलेला विचार म्हणजे कालमापन यात केला आहे.

या प्रकरणात अलबेरूनी हिंदू वर्ष, ऋतू, मास यांची माहिती देतात. सूर्याचा अवकाशातील भ्रमण मार्गाला क्रांतीवृत्त म्हणतात, हा वर्तुळाकार असल्यामुळे ३६० अंशातून होतो. दक्षिणेच्या मकर वृत्तापासून कर्कवृत्तापर्यंतचा सूर्याचा उत्तरेकडील प्रवास म्हणजे उत्तरायण. आणि कर्क ते मकर भ्रमणकाळ म्हणजे दक्षिणायन. दोन्हीच्या मध्ये असते ती विषुववृत्त रेखा. हिंदू पंचांगात प्रत्येक ऋतु २ महिन्यात वाटला गेला आहे. त्यामुळे वसंत, ग्रीष्म, वर्षा, शिशिर आणि हेमंत ऋतु १२ महिन्यात वाटले गेले आहेत. या चैत्र ते फाल्गुन १२ महिन्यांचे शुक्ल पक्ष आणि कृष्ण पक्षाचे अधिपतीही अलबेरुनींनी सविस्तर लिहिले आहेत. उदा० चैत्राच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षाचे स्वामी त्वष्टु आणि

याभ्य, वैशाखाचे इंद्राग्नी आणि आग्नेय, ज्येष्ठाचे शुक्र आणि रौद्र, आषाढ-विश्वदेव आणि सर्प, श्रावण -विष्णू, पित्र, भाद्रपद- आजा, सांत. अश्विन- अशन, मैत्र, कार्तिक- अग्नि, शक्र मार्गशीर्ष- सौम्य, निरुन्ती, पौष-जीव, विष्णू, माघ-पित्र्य, वरुण, फाल्गुन-भाग, पूपन. पण सोमनाथचे लोक तीनच ऋतु मानतात असाही उल्लेख ते करतात.

ब्रह्मापेक्षा मोठे असलेले कालाचे परिमाण याकडे ते वळले आहेत. हे आकडे मोठे मोठे आहेत. काश्मिरी पंडित उत्पल याने लिहलेल्या स्रूधव नावाच्या पुस्तकात, केशव, महादेव आणि ब्रहमाची वयं दिलेली आहेत. त्याप्रमाणे इंद्राचं वय हे एक मन्वंतर, आहे. २८ मन्वंतरं म्हणजे ब्रह्माचा एक दिवस. ब्रहमाची १०० वर्षे म्हणजे केशवाचा एक दिवस. केशवाची १०० वर्षे म्हणजे महादेवाचा एक दिवस असं सांगितलं आहे. आणि मग अलबेरूनि ही सर्व वर्षांच्या आकड्यात सांगतात. मग हिंदूंच्या कालमापनाचं कोष्टक ते देतात. त्याप्रमाणे २ त्रुटि = १ लव. २ लव = एक निमिष, ३० निमिष = १ काष्ठ, ३० काष्ठ = १ कला, ६० कला = एक घटिका. मग ते लांबलचक आकडे सांगितल्यावर अलबेरूनी खोचकपणे म्हणतात हे आकडे लिहिणारांनी गणिताचा जरा चांगला अभ्यास केला असता, तर एवढे मोठे आकडे झाले नसते. पण परमेश्वर आहे म्हणून आकाशाला भिडणारे आकडे झाले नाहीत.

त्यानंतरचा विषय म्हणजे संधिकाळ. सूर्योदय आणि सूर्यास्त यांच्या मधला काल. इथे ते विष्णू पुराणातील द्वितीय खंडातील, प्रल्हाद आणि हिरण्यकश्यपूची कथा सांगतात. प्रल्हादाचे वडील हिरण्यकश्यपू हे दानवांचा

राजा होते, पण त्यांचा पुत्र प्रल्हादला मात्र विष्णूची म्हणजे पित्याच्या शत्रूची भक्ति होती. त्यावर राजाला राग आला आणि त्याने शत्रू आणि मित्राची व्याख्या शिकवायला एक गुरु नेमला. पण जेव्हा बापाने परीक्षा घेतली तेव्हा प्रल्हाद म्हणाला की माझी सर्वांशी मैत्री आहे, शत्रू कुणीही नाही. तेव्हा राजाने रागाने त्याला मारण्यासाठी विष दिलं, विस्तवात, समुद्रात फेकलं अन तरीही तो जीवंत राहिलाच. विष्णू मला वाचवतो आणि तो सर्वत्र आहे असं प्रल्हादने उत्तर दिल्यावर राजाने विचारलं की या समोरच्या खांबातही आहे का, तर प्रल्हाद हो म्हणाला. हिरण्याकश्यपूने त्या स्तंभावर लाथ मारली, तेव्हा त्यातून नरसिंहाच्या रूपात विष्णू प्रकटले. त्यांनी दिवसभर राजाशी लढाई केली आणि संधिकालात वायुत त्याला ठार केलं. त्यामुळे राजा ना पृथ्वीवर मेला ना आकाशात. मग प्रल्हाद राजा बनला. प्रल्हादला वर मागण्यास सांगितलं तेव्हा त्याने अमरत्त्व मागितलं. पण अमरत्त्व फक्त देवांनाच असल्यामुळे, वर मागितल्यावर प्रल्हादाने आपला मृत्यू हा देव, दानव, मानव, आकाश, धरती, रात्र आणि दिवस यात कुठेच होऊ नये अशी इच्छा दर्शवली आणि तसा वर त्याला मिळाला..या संधिकालाचा फलज्योतिषी उपयोग करतात. प्रत्येक संधि ही ४८ मिनिटांची मानतात. ही संधि कल्पना हिंदू कोणत्याही प्रवर्तनाशी जोडतात असं ते लिहितात..

पुढचा लेख चतुर्युगाची आणि कल्प विषयाची माहिती देणारा आहे. यात ते सांगतात की हिंदू लोक १२००० वर्षांचं एक चतुर्युग आणि १०० चतुर्युगे म्हणजे एक कल्प अशी कालगणना करतात. या कल्पाच्या दिनांना अर्हगण

म्हणतात. त्यात अर्ह म्हणजे दिवस आणि गण म्हणजे समूह असा अर्थ असतो. एका कल्पाच्या आदि आणि अंतामद्धे ७ ग्रह आणि त्यांच्या पात बिंदूंचा संयोग होतो. पृथ्वी सूर्याभोवती फिरते, त्याला आयनिकवृत्त – ecliptic, म्हणजेच वार्षिक सूर्यमार्ग म्हणतात. चंद्र भ्रमणाची कक्षा ही सूर्यमार्गाला ५ अंशांनी तिरपी आहे. या दोन भ्रमणकक्षा जिथे एकमेकांना छेडतात, त्याला पात बिंदू म्हणतात. तेच दोन बिंदू, राहू आणि केतू नावाने लोक जाणतात..त्यानंतर ते कल्पबद्दल, आदित्य पुराण, ब्रह्मगुप्त आणि व्यासांच्या व्याख्या सांगतात..

चार युगांचे भाग, सौर वर्षाची वेगवेगळी मापन पद्धती. पौलत्स्यचे विचार यात मांडले आहेत. १२००० दिव्यावर्षे म्हणजे एक युग, त्याच्या दुप्पट वर्षे द्वापार युग, तिप्पट वर्षे त्रेता युग, आणि चौपट वर्षे कृतयुग मानलं आहे. ही चार युगे म्हणजे चतुर्युगं. ब्रहमगुप्ताच्या मते, ३६०० वर्षे म्हणजे एक त्रेता युग, २४०० वर्षे म्हणजे एक द्वापार युग, आणि १२०० वर्षे म्हणजे एक कलियुग होतं. यात आर्यभट्ट, पुलिश, यांच्या विचाराने झालेल लांबलचक आकडे दिले आहेत. चार युग, त्यांची समाप्ती, प्रलय, कलियुग वर्णन, विष्णू धर्मातील कृतयुगावरील विचार, चरक आणि आयुर्वेदाची निर्मिती यावरील हिंदू लोकांचे काय विचार होते त्यांचं वर्णन ते पुढच्या लेखात करतात. हिंदूंच्या संकल्पनेत काल हा चार युगांचा आहे. कृत उग, त्रेतायुग द्वापारयुग आणि कलियुग. महाभारत युद्धाचा शेवट इ. स. पूर्व ३१४० मध्ये झाला. कृष्णाच्या मृत्यूनंतर इ. पू. ३१०२ मध्ये कृष्णाने देह सोडला आणि ३ / ४ महिन्यात कलियुगाला सुरुवात झाली हे आता कालमापनाने सिद्ध झालेलं आहे.

हिंदूंच्या मते कृतयोगात केवळ सुखं, शांती, समृद्धी, समाधान सामंजस्य होतं. मग त्यात हिंसा शिरायला लागली. अधर्म वाढायला लागला. कृतयुगात सर्वत्र समृद्धी, शांती, ज्ञान, स्वास्थ्य, शक्ति सर्व मानवांमद्धे होती. पण हळूहळू त्यात अधर्म आणि अवगुणांनी प्रवेश केल्यावर, त्रेता युग सुरू झालं, ज्यात स्वास्थ्य संपन्नता तीन चतुर्थांश राहिली. हयाच काळात यज्ञ, आणि पशूबली प्रथांना सुरुवात झाली. त्या आधी ही अनुष्ठाने कुणाला माहीत नव्हती. रामाने रावणाला मारणे, अशा अधर्माच्या घटना या युगात सुरू झाल्या. परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा असा दुराचार वाढायला लागला. द्वापार युगात हा अधर्म काळाच्या प्रवाहात इतका वाढला की अधर्म आणि धर्म यांचं प्रमाण सारखंच झालं. आणि कौरव पांडव युद्ध ही द्वापारयुगातील अवनति होती. त्यानंतर आलं ते कलियुग. महाभारतात शौनक कथेमद्धे कलियुगाचं जे वर्णन आहे, त्यात ब्रह्माने शुक्राला सांगितलेल्या वर्णनात योगेश्वर सांगतात की,

कृतयुग-त्रेतायुग-द्वापायुगात मानवाची अवनति इतकी नीचतम पातळी गाठते की कलियुगाचा प्रारंभ होतो. या काळात मी शुद्धोधन पुत्र बुद्धोधनाला पाठवतो. त्यांचा जन्म हा पुढचा अवतार. ( ११ व्या शतकात बुद्ध हा योगेश्वराचा अवतार होता हे सिद्ध होतंय ) याचे लालवस्त्रधारी शिष्य सगळीच व्यवस्था बदलून टाकतील. या काळात ब्राह्मणांचा अनादर करणे सुरू होईल, तो इतक्या टोकाला जाईल की, त्यांचे खालच्या वर्गातील सेवक, दान आणि नैवेद्यात भाग घेतील. पापीमार्गाने धनसंचय करणारे माजतील. गुन्हेगारांना भय राहणार नाही. कारण न्यायसंस्था क्षीण होतील. संतान आपल्या आई वडील आणि सेवक आपल्या श्रेष्ठांविरुद्ध बंद करतील. सर्व जातीव्यवस्था एकमेकांच्याविरुद्ध

उठतील. चारी वर्ण लोप पावतील आणि अनेक विचारपंथ, धर्म उदयाला येतील. त्याच्यामुळे मतभेद वाढून, मतामतांचा गलबला वाढेल. अनेक पुस्तके निघतील पण त्यामुळेच समाजाचा एकसंघपणा नाहीसा होईल. मंदिरं पाडली जातील आणि विद्यालये ओस पडतील. राजे लोक लांबलचक आशेमध्ये मूर्खतेने फसतील आणि प्रजेवर अत्याचार, लुटणे, संपवणे, लुबाडणे, यात प्रजेला गिळून टाकतील. या काळात कुणी नवजात तर कुणी शैशव काळात मरेल. मानवाचं आयुष्य दीर्घ नसेल. धर्मपरायण लोकांना संपवण्यात येईल आणि पापी आणि धर्मभ्रष्ट लोक दीर्घायुषी होतील. मनुष्याला चांगलं आणि वाईट यातील भेद कळेनासा होईल. धर्मपंडितांना ही त्यांच्या पूर्वजांपेक्षा ज्ञान कमी असेल. ब्राह्मणांचे नियमही मोडतील. राजे लोभी लांडग्यासारखे दुसऱ्याच्या आवडत्या वस्तू लुटतील. थोड्याश्या गुणांना मोठे पुरस्कार मिळतील, आणि थोड्याश्या भक्तीने मोठे माहात्म्य आणि यश मिळेल. आणि मग या युगाच्या अंताला गर्ग काली नावाने जन्म घेतील, ज्यांच्या तेजापुढे कुणीही उरणार नाही. ज्याच्या सामर्थ्यपुढे कुणी शिल्लक राहणार नाही..याचा जन्म संभल नावाच्या गावात होईल. धर्मपरायण, पवित्र लोकांचा परत सन्मान होईल. कल्की हा नवयुगाचा तरुण, उत्तम संतती एकत्र करेल. भूमी दुर्जनांपासून मुक्त करेल. त्यानंतर परत कृत युगाचा प्रारंभ होईल.

विष्णू पुराणातील मत, इंद्र आणि त्याची मुले यावरील माहिती..यात नुसता एक नामावलीचा तक्ता दिला आहे. पुढील प्रकरण हे सप्तर्षि ताऱ्यावर हे सबंध प्रकरण आहे. या सप्तर्षींची कथा ते सांगतात. ती अशी आहे की, वसिष्ठ,

त्यांची भार्या अरुंधति, मरीच, अंगिरस, अत्री, क्रतु, पुलह पुलत्स्य या सप्त ऋषींच्या नावाने बनलेलं सप्तर्षि हे तारामंडल आहे. हे ऋषि कमलदेठांचं भक्षण करून राहत. एकदा धर्म तिथे आले आणि त्यांनी अरुंधतीला लपवून ठेवलं. ती सापडेना तेव्हा सारे ऋषि लज्जित झाले. तेव्हा त्या तोंड लपवून राहणाऱ्या ऋषींना धर्माने उच्च स्थानावर स्थापन केलं, जिथे ते आपल्याला दिसतात. त्यावर प्रत्येक नक्षत्रात हे किती वर्षे राहतं यावर वराहमीहिर, गर्ग, काश्मिरी पंडितांची मते, असा हा सबंध खगोलशास्त्रीय गणितावर आधारित लेख आहे. वेगवेगळ्या मन्वंतरातील सप्तर्षींचे वर्णन यात आहे..खगोल शास्त्रीय अभ्यासकांना ही पर्वणी ठरावी. अल बेरूनी म्हणतात की हिंदू पंडितांना खगोलशास्त्रसुद्धा काव्यमयरित्या छंदांमद्धे बांधून लिहायला आवडतं आणि वाचकही त्याची प्रशंसा करतात हे या सप्तर्षीच्यावर लिहिलेल्या वराहमीहिरच्या काव्यात सापडतं असं म्हणून ते कल्पना लालित्य मांडतात. गळ्यात मोत्याची माळ आणि सुंदर गुंफलेल्या फुलांचा हार घालून एखादी रमणी दिसेल त्याप्रमाणेच सप्तर्षि उत्तर परदेशात आकाशात ध्रुव ताऱ्याच्या अवतीभोवती नाचतांना दिसतात, असं सप्तर्षिंचं वर्णन त्यात केलं आहे. आणि असं वर्णन खगोल शास्त्र अभ्यासकांना आवडतं असं सांगतात. हे सबंध प्रकरण खगोलशास्त्रीय अभ्यासकांना आपल्या पूर्वजांच्या या अभ्यासातील पांडित्याचा गर्व करावा असं आहे. हे सगळं आत्मसात करतांना अलबेरूनी सतील त्याचाही अंदाज येतो.

नारायण ही संकल्पना, वेगवेगळ्या नारायणांची माहिती, बळीराजाची कथा, यावर त्यांनी केलेला अभ्यास यात आहे. हिंदू लोक नारायण ही एक अद्वितीय शक्ति आहे असं मानतात अशी नारायणाची ओळख अलबेरुनी करून देतात. ही लोकोत्तर शक्ति विष्णू या नावाने मनुष्यलोक जाणतो. मग विष्णूचे सर्व अवतार, बळी राजाची कथा यात अलबेरुनी यांनी सांगितली आहे. शेवटी, नारायण हा कृतयुगात सत्य हे श्वेत असल्यामुळे धवल रंगात, त्रेतायुगात लाल, द्वापार युगात पिवळा, आणि कलियुगात कला रंग धारण करतो अशी माहिती देतात.

आता अलबेरुनी महाभारताकडे वळतात. त्यात वासुदेव शब्दाची उत्पत्ति, त्याची वेगवेगळी नावे, कौरव -पांडव, युद्धसमाप्तीने हे प्रकरण संपते...प्रत्येक मासात वासुदेवाचं नाव वेगवेगळं आहे त्याचीही माहिती ते देतात. त्याप्रमाणे, चैत्र-विष्णू, वैशाख-मधुसूदन, ज्येष्ठ-त्रिविक्रम, आषाढ-वामन, श्रावण-श्रीधर, भाद्रपद-हृषीकेश, आश्विन-पद्मनाभ, कार्तिक-दामोदर, मार्गशीर्ष-केशव, पौष-नारायण, माघ-माधव, फाल्गुन-गोविंद अशी मानली जातात. मग कौरव पांडव, श्रीकृष्णाचा शेवट याने हे प्रकरण संपतं. महाभारतानंतर फक्त अक्षौहिणी या संख्येची माहिती त्यांनी लिहिली आहे. यात रथाचा कधी आणि कुठे शोध लागला याची ग्रीक पुराणकथेसह माहिती देतात. ते लिहितात की ग्रीकांच्या मते अथेन्समधे रथाचा शोध मंकलूस याने लावला, पण त्याही आधी ९०० वर्षे इजिप्तमध्ये हिंदूंनी रथ तयार केला होता. त्याला दोन घोडे होते. मग रथाची रचना कशी असे तेही सांगतात. रथाला चार घोडे असत.

रथाचा सारथी रथ चालवत असे. रथ बाणांनी सुसज्ज असे. योद्धयाच्या दोन्ही बाजूला त्याचे साथीदार असत. आणि एकजण मागच्या बाजूला उभा असे. तो योद्धयाचं मागच्या बाजूने रक्षण करत असे. प्रत्येक रथाबरोबर एक छकडा चालत असे. त्यानंतर सैन्याचं वर्णन ते देतात.

ते सुरुवातीलाच लिहितात की हिंदू लोकांना मोठे मोठे लाखात, कोटीत आकडे देण्याची फार हौस आहे, पण ते त्रासदायक होतात म्हणून संक्षिप्त रूपही ते घेतात. यात वेगवेगळ्या काळातील हर्ष, विक्रमादित्य, गुप्त, वल्लभ, शक आदि हिंदू सम्राटांनी सुरू केलेली संवत्सरे, त्यांचा काल, तिथी लिहिण्याची पद्धत, काबूलचा शहा कनिष्कची कथा, तिबेटी वंशांचा अंत, आणि ब्राह्मणांची उत्पत्ती याची माहिती यात दिली आहे. या संवत कालमापनात प्रमुख आहे – १० ब्रह्माच्या अस्तित्त्वाची सुरुवात. २. कल्पची सुरुवात. ३. सातव्या मन्वंतराची सुरुवात. ४. अठ्ठाविसाव्या चतुर्युगाची सुरुवात, ५. चौथ्या कलियुगाची सुरुवात. ६. पांडवाच्या महायुद्धाचा काल. मग मोठे मोठे काळाचे आकडे, पारसी कालमापन, यांची परिपूर्ण माहिती ते देतात. भारताच्या विविध भागातील वर्षारंभ मासाचीही माहिती यात आहे. पण त्याचवेळी हिंदू लोक कालजंत्रीकडे शास्त्रशुद्ध लक्ष देत नाहीत अशी ते तक्रार करतात. तिबेट हे मूळ स्थान असलेल्या, बरहत्कीन या काबूलच्या राजघराण्याच्या मूळ पुरुषाच्या आरंभाची एक रंजक कथा अलबेरुनी देतात..काबूलमध्ये हा पुरुष आला आणि एका गुहेत शिरला. त्यात तो रांगत रांगत आत गेला इतकी ती गुहा अरूंद होती. तिथे त्याने अन्न नेलं होतं..त्या गुहेच्यासमोर काही शेतकरी काम करत होते.

त्यांनी हे पाहिलं आणि रात्रंदिवस काम करत त्यावर पहारा ठेवला. काही कालानंतर त्या गुहेतून एक रांगणारं मूल बाहेर आलं. त्याने कुडता, उंच टोपी, बूट घातले होते आणि त्याच्या हातात शस्त्र होतं. त्याच्या या अलौकिक रूपाला पाहून कष्टकऱ्यांनी त्याला आपला राजा घोषित केलं. या राजाने आजूबाजूचा प्रदेश जिंकून घेतला. त्याला शाहीया ऑफ काबूल म्हणू लागले. या राजाच्या पुढच्या ६० पिढ्यांनी काबूलवर राज्य केलं अशी आख्यायिका आहे. या कथेनंतर अलबेरुनी खोचकपणे लिहितात की की हे लोक ऐतिहासिक कालक्रमानुसार परंपरा सांगण्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांना त्याबद्दल जरा रेटून विचारलं तर काहीतरी कथा ऐकवतात. मी असं ऐकलं की रेशमी कापडावर लिहिलेली या राजाच्या वंशावळीची नाव नागराकोटच्या किल्ल्यात ठेवली आहेत. अवसर न मिळाल्यामुळे मला ती बघता आली नाही.

यानंतर त्यांनी काबूलमधील लगतूरकमन या राजाच्या तिबेटी वंशाचा अंत आणि कल्लर या ब्राह्मण वंशाच्या उदयाची कथा सांगितली आहे. तिबेटी राजाच्या कारभारला कंटाळून लोक कल्लरकडे तक्रार करतात. कल्लर राजाला कैदेत टाकतो कारभार स्वत:कडे घेतो, आणि त्याच्यापासून ब्राह्मण राजघराण्याला सुरुवात होते. त्यांच्या घराण्यातील कामलू, भौम, जयपाल, आनंदपाल, त्रिलोचनपाल या राजांनी राज्य केलं. त्रिलोचनपाल इ. स. १०२१ मध्ये मेला आणि त्याचा पुत्र ५ वर्षांच्यानंतर मारला गेला असं अलबेरूनी लिहितात. या आनंदपालच्या काळात गझनीचा महंमद काबूलवर सवारी करायला आला होता. त्या लढाईत आनंदपाल पराभूत झाला. पण त्याचा

सुस्वभाव दाखवणारं त्याने सुलतानाला लिहिलेलं पत्र अलबेरूनी यांनी घातलं आहे..

अलबेरूनी यांचा हा, चार युगांमधील तारांगण, कलियुगातील ग्रह स्थिति, आर्यभट्ट, ब्रहमगुप्ताची मते, अरबी भाषेत आर्यभट्टाचे रूपांतर, अबु अल हसनच्या मताप्रमाणे ग्रहांचे कालचक्र. अत्यंत क्लिष्ट, गहन विषयावरचा हा लेख आहे. वेदांमध्ये दिलेली दिनाची व्याख्या. अधिकमासाची निर्मिती, त्यावरील विचार, उनरात्र, आणि अहर्गण यांची व्याख्या..त्यांचा गणिती विचार यांनी हा लेख आहे. त्यांत खगोलशास्त्रीय पंडितांसाठी मेजवानी ठरेल असा आहे. पुढची माहिती अहर्गणाची, ऊनरात्र दिन गणनेची रित आणि तिथीच्या बनवण्याची रीत यावर चर्चा चर्चा केली आहे. त्यानंतर नक्षत्र, तारे, परिभ्रमणकाळ, यावरच्या माहितीत अलबेरूनी त्यात गुंतून गेले आहेत.

अहर्गण, करण टिलक आणि अरबी पंचांग पद्धती, नक्षत्रांच्या मध्यम स्थानांची निश्चिती, ग्रहांचे, ताऱ्यांचे अंतर, त्यांचे परीघ, सूर्य-चंद्राचे व्यास, त्यासाठी वायुपुराण, विष्णू धर्म, वराहमीहिर यांची मते, नक्षत्रांची माहिती, नावे, अरबी नक्षत्रे आणि हिंदू नक्षत्रे यावर विचार, स्वाती-श्रवण नक्षत्रांची माहिती, रोहिणी नक्षत्रावरील वराहमीहिरचा भाष्य..दृश्यमान होण्यासाठी नक्षत्रांचे सूर्यापासूनचे अंतर यावर त्यांचं सखोल भाष्य आणि वर्णन त्यांनी केलं आहे. मग ते वळतात, समुद्रातील भरती ओहोटी, वराह मीहिरच्या मते लिंगाची रचना, लिंगाची उत्पत्ति या विषयांकडे. लेखाची सुरुवातच, समुद्राचं पाणी कायम भरलेलं का राहतं यावरील मत्स्य पुराणातील विचाराने सुरुवात होते. त्यात जी

कहाणी आहे ती सांगते की आधी १६ पर्वत होते, त्यांचे पंख इंद्राने आपल्या किरणाने कापले तेव्हा त्यातील ४ पर्वत समुद्रात जाऊन पडले, बाकी उरलेले पूर्व-पश्चिम-दक्षिण उत्तर यात वाटले गेले. पूर्वेला ऋषभ, बलाहक, चक्र, मैनाक, उत्तरेला चंद्र, कंक, द्रोण, गुह्य, पश्चिमेला चक्र, वध्र नारद, आणि दक्षिणेला जीमूत, महर्षण, मैनाक होते. या तिसऱ्या आणि चौथ्या दिशांच्या मध्ये संवर्तक अग्नि जो समुद्रजल पितो आणि समुद्राला येऊन मिळणाऱ्या नद्यांना जागा करून देतो. मग ते और्व राजाची कथा सांगतात. ह्या और्वच्या पित्याला देवांनी मारून टाकलं होतं, म्हणून क्रूद्ध झालेला और्व तलवार घेऊन देवांवर धावून जातो. तेव्हा देव त्याला शांत करतात. मग तो विचारतो की माझ्या या क्रोधाग्नीला काय करू ? तेव्हा देव त्याला तो क्रोध समुद्रात फेकायला सांगतात तोच हा वडवानल - अग्नि. चंद्रावरील शशलक्ष - सशाची आकृती म्हणजे समुद्रात पडलेल्या पर्वतांची आकृती. काही लोक म्हणतात की नद्यांच्या पाण्याने समुद्राचं पाणी वाढत नाही कारण इंद्र देवता मेघांच्या रूपाने ते पाणी वर उचलतो. आणि वर्षाकालात परत खाली आणतो..पण विष्णुधर्मात लिहिलं आहे की चंद्रावरील वातावरण जलमय असल्याने डोंगर, जंगल, असलेल्या पृथ्वीची छाया त्यावर दिसते. यानंतर अलबेरुनी चंद्र, त्याचा प्रजापतीच्या कन्यांशी विवाह, चंद्राची आवडती पत्नी रोहिणी, इतर कन्यांची वडिलांकडे याबद्दल तक्रार, प्रजापतीने त्याला कोड आलेल्या चेहऱ्याचा शाप, मग चंद्राच्या दया याचनेनंतर त्याला मिळालेला उ:शाप म्हणजे ज्यामुळे चंद्राचा पंधराफटक चेहरा झाकला जातो, परत केलेल्या विनवणीनंतर प्रजापतीने पापक्षालनासाठी शंकराचं लिंग स्थापन करण्याचा दिलेला आदेश ही सारी कथा सांगितली आहे.

म्हणून सोम -चंद्र, ह्या शब्दाला नाथ म्हणजे स्वामी म्हणून सोमनाथ शंकर सोमनाथ झाला हेही त्यांनी लिहिलं. सोमनाथावर स्वारी करून महंमदने मूर्तीचा काही भाग गझनीला नेला. तिथल्या मशिदीसमोर तो टाकला. त्यावर गझनीतील लोक आपले पाय त्यावर घासून स्वच्छ करतात हे अलबेरूनीने नमूद केलं आहे. महंमदची कृती त्यांना अजिबात आवडली नाही, म्हणून अलबेरुनी लिहितात की देव त्यांच्यावर दया करो.

मग ते शिवलिंग उत्पत्तीची कथा सांगतात. त्यांनी ऐकलेली कथा अशी होती की एका ऋषींनी महादेवांना पार्वतीबरोबर पाहिलं पण ते भगवान शंकर नसावेत अशी ऋषींची कल्पना झाली. त्यामुळे त्यांनी शाप दिल्याबरोबर शंकराचं लिंग गळून पडलं. पण नंतर शंकर असल्याची खात्री ऋषींना खात्री पटली. त्यांनी आपल्या या चुकीचं परिमार्जन म्हणून शंकराला सांगितलं की मी तुझ्या या अवयवाचं मानवाच्या भक्तीचा मार्ग म्हणून रूपांतरित करीन. लोक तुझी या रूपात पूजा करतील. वराहमीहिरने या शिवलिंगाची रचना कशी करायची त्याचेही नियम दिले आहेत. तो म्हणतो की मूर्तीला योग्य दगड निवडा. त्याला तीन भागात वाटा. अगदी खालचा भाग चौकोनी असावा. मधला भाग अष्टकोनी ठेवावा आणि त्याचा पृष्ठभाग ४ भागात विभागलेला असावा. त्यावरचा तिसरा भाग गोल असावा. यातील पहिला १/३ चौकोनी भाग जमिनीच्या खाली असावा आणि अष्टकोनी भागासाठी पिंड नावाने एक आवरण करावं. गोल भाग फक्त दर्शनी असावा. यातील गोल भाग लहान आणि पातळ घडवला तर त्या देशावर संकट येईल. चौकोनी भाग पूर्ण आता गाडला

गेला नाही तर त्या देशातील लोक आजारी पडतील. पिंडी घडवतांना मेखेने ठोकली तर राजा आणि राज घराणं संपेल. घडवलेली शिवपिंडी दुसरीकडे नेतांना त्यावर काही आपटलं आणि ते चिन्ह राहिलं तर शिल्पकाराला आजार होतील. या देवस्थानांमध्ये सोमनाथ मंदिर खूप गजबजलेलं असतं कारण चीनला जाण्यासाठी ते उत्तम बंदर आहे. भाविकही तिथे खूप येतात. या शिवपिंडीच्या पूजेसाठी रोज काश्मीरची फुले आणि गंगाजल मागवलं जातं.

यानंतर अलबेरूनी भरती – ओहोटी या विषयाकडे वळतात. हिंदू लोकांच्या मते समुद्रातील भरती आणि ओहोटी ही समुद्रात असलेल्या वडवानल अग्निमुळे होते. त्याचा श्वास आणि उछवास म्हणजे भरती ओहोटी असं हिंदू मानतात. सुशिक्षित हिंदू मात्र भरती आणि ओहोटी चंद्रामुळे घडते असं मानतात. पण त्यांना त्याचं भौतिक कारण माहीत नाही. सरसुती नदीच्या मुखाजवळ ३ मैलांवर, बरोई किल्ल्याजवळ वासुदेवाचं सुवर्ण निवासस्थान होतं. वासुदेवाच्या मृत्यूनंतर जिथे त्या परिवाराला अग्नि देण्यात आला, तिथे हे शिवलिंग होतं. चंद्रोदय आणि चंद्रास्त यामध्ये ते शिवलिंग भरतीने झाकलं जाई आणि ओहोटीने उघडं पडत असे. अशातऱ्हेने चंद्रमा सतत त्या शिवलिंगाच्या सेवेत असे. म्हणून त्याच नाव सोमनाथ पडलं. सोमनाथ मंदिराची अशी कहाणी आहे. ह्या सुवर्ण किल्ल्याप्रमाणेच मालदीव आणि लक्षद्वीप बेटे निर्माण झाली आहेत..अशी बेटं या समुद्रात तयार होतात, काही काळ राहतात आणि परत समुद्रात बुडून नाहीशी होतात..मग त्या बेटांवर राहणारी वस्ती आपापली नारळाची कलमे घेऊन नवीन उत्पन्न झालेल्या बेटावर राहायला जातात. या

बेटाला सुवर्णद्वीप म्हणतात कारण तिथली माती थोडी खणून धुतली तर त्यातून सोनं मिळतं..

सूर्य ग्रहण आणि चंद्र ग्रहण. अलबेरुनी या प्रकरणात कबूल करतात की हिंदूंना चंद्रग्रहण म्हणजे पृथ्वीची सावली आणि सूर्यग्रहण म्हणजे चंद्राची सावली हे माहीत आहे. ते मग राहू, अमृतमंथन, राहूची स्थापना या गोष्टी सांगतात. वराहमीहिरच्या श्लोकांमधला अर्थ सांगतात. ग्रहण हा ग्रहांचा संयोग किंवा भूकंप-वादळ-उल्कापात यांचं कारण असतं हे खरं नव्हे असा वराहमीहिरचा आपल्या देशबांधवांना संदेश आहे. आणि मग हाच पंडित आपल्या लोकांना सांगतो की ग्रहणाच्या वेळी जर वायू जोरात वाहत असेल तर पुढील ग्रहण सहा महिन्यांनी होईल, उल्कापात झाला तर १२ महिन्यांच्या नंतर होईल, त्यावेळी धूळ उडत असेल तर १८ महिन्यांनी होईल, त्यावेळी भूकंप झाला तर २४ महिन्यांच्या नंतर घडेल, वायु गहिरा असेल तर ३० महिन्यांनी आणि गारा पडत असतील तर ३६ महिन्यांनी ग्रहण होईल. मग खोचकपणे लिहितात की अशावेळी मौन राखणेच, योग्य राहील. पण पाठोपाठ हिंदूंनी लिहून ठेवलेल्या निरिक्षणाचं कौतुकही करतात की जेव्हा चंद्रग्रहण अर्ध्यापेक्षा कमी व्यापलेलं असतं एव्हा त्याचा रंग भुरा असतो, जेव्हा ग्रहण भाग अर्धा आच्छादित असतो तेव्हा कोळशासारख्या काळया रंगाचं असतं, जेव्हा अर्ध्यापेक्षा जास्त भाग आच्छादित असतो तेव्हा काळया आणि लालच्यामध्ये असतो आणि पूर्ण बिंब व्यापलेलं असतं तेव्हा पिवळया आणि भुऱ्या रंगाचं असतं..

पुढचा विषय पर्वणी कालावर माहिती सांगताना अलबेरुनी लिहितात की दोन चंद्रग्रहणाच्या मधल्या काळाला हिंदू लोक पर्वणी म्हणतात. मग पर्वण कालाचं गणितही शिकवतात. यात दोन पद्धती आहेत, पण दोन्हीचा अभ्यास करून अलबेरुनी निष्कर्ष मांडतात की दोन्ही एकमेकांपासून दूर आहेत. कदाचित पहिल्या पद्धतीत काहीतरी गहाळ झालं असेल किंवा नक्कल करतांना चूक झाली असेल. यातील वराहमीहिरने लिहिलेली वाक्ये कुणी ऐकली तर वेडा माणूस बडबडतो आहे असंच वाटेल पण कदाचित त्यामागे एक गुप्त हेतू ही असू शकतो ही शंकाही तेच लिहितात. नक्षत्र विद्येच्या दृष्टीने काल निर्णय. नक्षत्रांचे अधिपति आणि मासाधिपती जाणून घ्यायची पद्धत यावर गणिती विषयावरील माहिती त्यांनी लिहिली आहे. .

संवत्सर म्हणजे काय..? संवत्सर म्हणजे सूर्य आणि बृहस्पती यांच्या परिभ्रमणाच्या कालातील वर्षांच्या चक्र यांची वैज्ञानिक परिभाषा आहे. बृहस्पती आणि सौर लग्नाला याचा आरंभ मानला जातो. हे चक्र ६० वर्षांनी पूर्ण होतं म्हणून त्याला शष्ठ्यब्द म्हणतात..( ६० वर्षे पूर्ण होण्याचा शष्ठ्यब्द पूर्तीचा वाढदिवस. ) संवत्सराची नावं, षष्ठब्दीतील कालचक्रे..त्यांना कनोजमध्ये अशी माहिती मिळाली की ते लोक १२४८ वर्षांचं संवत्सर मानतात. १०४ वर्षांचे एक संवत्सर असे १२ संवत्सरांचे एक चक्र. पण मग अलबेरुनी आणखी खोलात जाऊन चौकशी करायला लागले तर त्यांना त्याची उत्तरं देता आली नाहीत, म्हणून अलबेरूनींनी लिहिलं – परमात्मा सर्वज्ञ आहे.     हिंदू लोकांच्या चातुर्वर्ण्य पद्धतीकडे ते वळले. ब्राहमणांशी संबंधित माहिती, त्यांचे

४ आश्रम, त्यांचे धर्म..यांची संपूर्ण संदर्भासकट माहिती यात दिली आहे..सातव्या वर्षांनंतर ब्राह्मण मुलाचं आयुष्य चार भागात वाटलं जातं. ८ व्या वर्षी त्याला विद्येची शिक्षा दिली जाते. ते मौजिबंधन, त्यात त्याचा हातात एक दंड, एक यदन्योपवीत, बोटात एक दर्भाची अंगठी घातली जाते. हा ब्रह्मचर्य काल असतो, यात गुरुगृही राहून, गुरुकडून धर्मशास्त्र, वेद-पुराणे यांचा अभ्यास करणे, भूमीवर झोपणे, गुरूची सेवा करणे, मांसाहार न करणे, सकाळी, रात्री, दोन वेळा अग्निपूजा करणे, ही कर्तव्ये तो करतो. सर्व शिष्यवर्ग ५ घरी जाऊन भिक्षा मागून आणतात आणि ते सर्व गुरुसमोर ठेवतात. गुरु आपल्याला हवा तेवढा भाग काढून घेतो, मग शिष्यवर्ग आपलं जेवण करतात. हा ब्रहचर्याचा काल ओळखला जात असे. ब्राह्मण त्यांच्या आहारात कांदा, लसूण, भोपळा, अस्वच्छ नाल्याजवळ उगवणाऱ्या भाज्या, जमिनीच्या आत उगवणारी गाजरं खात नसत० जीवंत असेपर्यंत ब्राह्मण दिवसातून फक्त दोन वेळच जेवतं. जेवण्यापूर्वी अन्नातला काही भाग अवचित येणाऱ्या पाहुण्यासाठी वेगळा, मग उरलेल्या भागातील काही भाग पशू पक्ष्यांसाठी राखणे, स्वत:च्या जेवणाचा भाग काढून, उरलेलं अन्न भुकेल्या कुणाहीसाठी बाहेर ठेवतो अशी रीत होती.

यानंतरची ब्राह्मण युवकाची दुसरी अवस्था ही गृहस्थाश्रमाची असे. ती २५ व्या वर्षापासून ५० व्या वर्षापर्यंत धरली जाई. विष्णुपुराण ७० वर्षांपर्यंत गृहस्थाश्रम मानत असे. या काळात त्याचा विवाह वंश संवर्धनासाठी होतो. पत्नी रजस्वला झाल्यावर महिन्यातून एकच वेळा तो आपल्या पत्नीशी समागम करतो. वधू ही १२ वर्षाच्या आतली असते. आपल्या उपजीविकेसाठी ब्राह्मण

तरुण विद्यादानाने अर्थप्राप्ति करतो. शिवाय होम करून मिळवतो. पण कुणाकडूनही हट्टाने कमाई करत नाही. श्रीमंतांच्या घरी ब्राह्मण नेमलेले असतात, त्यांना पुरोहित म्हणतात. त्या घराण्यातील सर्व धार्मिक कृत्ये, रितीरिवाज पार पडतात. त्या यजमानांच्या दिलेल्या अन्न, वस्त्र, दक्षिणा यावर संसार चालवतो. ज्या देशात गावात उगवत नाही, हरणांना खाण्यासारखं गावात नाही त्या देशात जाण्याची त्यांना परवानगी नाही. तिसरी अवस्था ही वानप्रस्थाची आहे. यात वृद्ध पुरुष आपला स्थावर जंगम संसार मुलाच्या स्वाधीन करून अरण्यात राहायला पत्नीसह निघून जातो. तिथल्या फळफुलांच्या रसावर जगतो. शेवटचा संन्यास आश्रम हा मोक्ष मिळवण्यासाठी ध्यानमार्गाने जाण्याचं आहे. तो यात्रेला जात असेल तर एका गावात एक दिवसापेक्षा जास्त काल आणि नगर असेल तर ५ दिवसांपेखा जास्त काल राहत नसे. अंगात कफनी घालतात.

आता अलबेरुनी क्षत्रिय समाजाचं वर्णन करतात. यात क्षत्रियांना वेद शिकण्याची आज्ञा आहे पण शिकवण्याची नाही, कारण त्यांनी समाजाचं रक्षण करायचं असतं. या प्रकरणात ते अन्य वर्ण आणि त्यांची कर्तव्ये यांची माहिती देतात. मुलगा १२ वर्षांचा झाला की त्याची मुंज केली जाते, त्याच्याही गळ्यात जानवं असतं. वैश्यांनी व्यापार करणे, जमीन नांगरणे, पशुपालन करणे, ब्राह्मणांना दान करणे ही कर्तव्ये करायची असतात. ब्राह्मणांना कामात मदत करणाऱ्या वर्गाला शूद्र वर्ण म्हणतात. हे सारे वर्ण आपापले व्यवसाय सोडून इतरांच्या व्यवसायात शिरत नाही कारण तो गुन्हा ठरतो. त्याला शिक्षा होते.

यानंतर अलबेरुनी अश्वमेध यज्ञ म्हणजे काय, सामान्य यज्ञ कोणते याची माहिती देतात. मग हिरण्यक्ष, त्याची कन्या, तिचा महादेवाशी विवाह, अग्नीला महारोगाचा शाप आणि मग परत मुक्ति ही कथाही ते सांगतात. हिंदू लोकांची यात्रा या विषयावर अलबेरूनी लिहितात की प्रसंगानुरूप यात्रा करणारे हे लोक आहेत. यात्रा करणे हे सक्तीचं नाही. हे लोक पवित्र धार्मिक स्थळी किंवा प्रमुख पवित्र नद्यांच्या दर्शनाला जातात. ते तिथे जाऊन मंत्र म्हणतात, उपवास करतात, दानधर्म करतात, आणि मुंडन करतात आणि परत येतात. वायु आणि मत्स्य पुराणातील मेरू आणि गंगा, शंकर, भागीरथाची कहाणी सांगतात. भगीरथामुळे त्याच्या पितरांना मुक्ति मिळाली म्हणून सर्व हिंदू काशीला जाऊन गंगेत अस्थि विसर्जन करतात ते सांगतात. यानंतर ते लिहितात की हिंदूंनी अनेक सुंदर सरोवरं पवित्र स्नानासाठी निर्माण केली आहेत. त्याभोवतीचे घाट इतके सुंदर आहेत की आपल्याला म्हणजे अरब लोकांना शब्दातसुद्धा त्याचं वर्णन अशक्य आहे, मग असे घाट बांधणे तर दूरच. ह्या घाटांचचं इतक सुंदर ते वर्णन करतात की त्यांना भारतीय शिल्प कलेचं त्यांना किती कौतुक वाटलं असेल ते कळतं. सरोवराभोवती बांधले गेलेले हे घाट धातूच्या पट्टीने दगड एकमेकांना जोडून केले आहेत. त्यांच्या पायऱ्या विस्तृत असतात त्यामुळे कितीही लोक स्नानासाठी सरोवरात उतरले तरी गर्दी होत नाही, आणि झालीच तर भाविक दुसऱ्या मार्गाने जाऊ शकतो. मुलतानाच्या घाटाची आणि बनारसची माहिती सांगतात.

हिंदू समाज आपल्या अर्थार्जनाचा कसा विनियोग करतात, काय विचार करतात याची माहिती ते देतात..ब्राह्मण वर्ग सोडून बाकी सर्वांना कर भरावा लागतो, कारण ब्राह्मण व्यवहार व्यापार करत नाही, फक्त विद्यादान करतो. काही लोक उत्पन्नाचे भाग करतात तर काही 3 भाग करतात. त्यातील एक भाग गुंतवणुकीसाठी, एक भाग दानधर्मासाठी आणि एक भाग प्रापंचिक खर्चासाठी ठेवतात. मग ते हिंदूंच्या आहाराची माहिती देतात. धर्म रक्षण करणारे ब्राह्मण सोडून बाकी सारे लोक मांसाहार करतात.. त्यात सर्व लोक मांसाहार करतात. गळा दाबून या प्राण्यांना मारलं जातं. त्यात मेंढी, बकरी, हरिण, ससे, म्हैस, आणि मासे, चिमणी-मोर असे पक्षी ह्यांना मान्यता आहे. पण मांसाहारसाठी घोडा, हत्ती, उंट, खेचर, गाढव, गोवधाला आणि पोपट, बुलबुल, सर्व प्रकारची अंडी, मदिरा ह्यावर बंदी आहे. शूद्राला मदिरा पिण्याला मान्यता आहे, पण मांस विकणे हा गुन्हा आहे. काही लोकांनी गोमांस न खाण्याचं कारण अलबेरुनी यांना सांगितलं की गोमांस खाल्ल्याने पचनाचा त्रास होतो, कारण आमचा देश उष्ण हवामानाचा आहे, पण शरीरात शीतलता असते, गोमांस हे पचनाला थंड आणि जड असतं, पण गोमांसामुळे त्यामुळे शीतलता वाढून नैसर्गिक उष्णता दुर्बल होते, आणि पचनशक्तीवर परिणाम होतो. त्याने शरीरातील शीतोष्ण प्रमाण बिघडतं. त्यासाठी हे लोक जेवणानंतर विडा खातात, कारण विड्याचं पान उष्ण असतं, त्यावर चुना लावतात कारण तो पोटातील आर्द्रता कमी करते, त्यात सुपारी घालतात ती दात, हिरड्या मजबूत करतात, सुपारीने पचनशक्ती सुधारते. या कारणामुळे, शरीराला घातक असल्यामुळे गोमांस निषिद्ध करण्यात आलंय. त्याशिवाय गाय हा अत्यंत उपयुक्त प्राणी आहे. तिच्यामुळे मिळणारे

बैल हे शेतीसाठी, जमीन नांगरण्यासाठी, सामान वाहण्यासाठी, शेणासाठी, आणि दुधासाठी अत्यंत उपयुक्त आहे. गायींच्या श्वासोश्वासाने गोठ्यातील तापमान उष्ण राहतं, त्याचा हिवाळ्यात उपयोग होतो. उपयुक्त प्राणी म्हणून गायीचा मोठा फायदा आहे, म्हणून गोवध बंदी केली आहे. त्यानंतर अलबेरुनी माहिती देतात की मेसापोटेमियाचा प्रमुख अल हज्जाज याने देश उजाड होऊ लागला तेव्हा गोमांस खाण्यावर बंदी आणली होती.

अलबेरुनी पुढे विवाह संस्था विवाहाची आवश्यकता, त्याचे नियम, मासिक पाळी, प्रसूतिकाळ, वेश्यावृत्तीचं कारण यावर भाष्य करतात. कोणतंही राष्ट्र, विवाह संस्थेशिवाय जगू शकत नाही, त्यामुळे ती टिकवणे गरजेचं आहे. विवाहामुळे मनुष्याच्या मानसिक संतुलनाची गरज संपते. पण विवाहाबाहेरील अतिरिक्त समागम, वेश्यांकडे जाणं याने विकासाची गती साध्य होत नाही. प्रत्येक देशात विवाहाचे वेगवेगळे नियम आहेत. भारतात मुलांची बालवयात लग्ने होतात म्हणून मातापिता आपल्या मुलांची लग्ने ठरवतात. लग्नात पुरुषाने स्त्रीला दिलेली भेट वस्तू तो परत मागू शकत नाही, मात्र स्त्री आपल्या पतीकडून स्वत: दिलेली वस्तू परत घेऊ शकते. पतीनिधनानंतर स्त्री सती जाणे पसंत करते कारण विधवेचं आयुष्य तिच्यासाठी फार खडतर असतं. पण ज्या स्त्रीला मुलगे आहेत, ती मुलांच्या आधाराने जागते. नात्यांच्या बाहेरील मुलांशी लग्ने करणं सर्वमान्य आहे. भारतीयांना आपआपल्या जातीत लग्ने करण्याची परवानगी आहे. त्याप्रमाणे ब्राह्मण ४ बायका, क्षत्रिय 3 बायका, वैश्य दोन बायका आणि शूद्र एक बायको करू शकतो. पण साधारणपणे हिंदू पुरुष एकाच विवाह करतो.

जन्माला येणाऱ्या अपत्याला त्याच्या आईचा वर्ण मिळतो. आई ब्राह्मण तर मुलं ब्राह्मण, ती शूद्र तर मुलं शूद्र. स्त्रीच्या मासिक पाळीच्या काळात पुरुष तिच्या जवळही जात नाही. या देशात मासिक पाळी जास्तीत जास्त १६ दिवसांची समजली जाते, पण साधारणपणे ४ दिवसांचीच असते. त्यानंतरही रक्तस्राव होत असला तरी समागमाला हरकत नसते कारण तो भ्रूण बनण्याचा स्राव समाजाला जातो. स्त्रीच्या या ९ महिन्यात ४ वेळा विधी केले जातात. त्यातला पहिला गर्भादान विधी पुरुष लज्जेस्तव टाळतात, मग ४ थ्या महिन्यात सीमान्तोन्नयन विधीच्या वेळी एकत्र करतात. अपत्याच्या जन्मानंतर नामकरण विधी केला जातो. या काळात ब्राह्मण घरात ८ दिवस, क्षत्रियाच्या घरात १२ दिवस, वैश्य घरात १५ दिवस आणि शूद्राच्या घरात ३० दिवसांचं सोयर असतं, त्याकाळात धार्मिक विधी होत नाहीत. बाळाला जास्तीत जास्त तीन वर्षांपर्यंत आईचं दूध देतात. मुलाचे कान सातव्या वर्षी टोचतात आणि तिसऱ्या वर्षी जावळ म्हणजे केस कापतात. वेश्यावृत्ती हा गुन्हा इथे गंभीरपणे घेतला जात नाही. त्यासाठी राजा जबाबदार आहे. कारण मंदिरात देवासमोर नाचणाऱ्या, गाणाऱ्या, नट्या या आकर्षणाचं साधन बनवून राजेलोक आपल्या लष्करी खर्च वसूल दंड आणि कराच्या रूपाने गोळा करतो. बुईयाचा राजा याच मार्गाने आपल्या खजिना भरत असे, त्याचा आणखी एक उद्देश हा आपल्या प्रजेचा अविवाहित सैनिकांपासून रक्षण करण्याचा होता.

भारतातील न्यायव्यवस्थेची माहिती देतांना ते सांगतात की न्यायाधीश फिर्यादीला लेखी तक्रार करायला सांगतात. मग ४ साक्षीदार आणवले जातात.

या न्यायव्यवस्थेत अनेक प्रकार आहेत. एक प्रकार म्हणजे आरोपीला विष दिले जाते, तो सत्य बोलत असेल तर त्या विषाचा आरोपीवर काहीही परिणाम होत नाही. त्यापेक्षा जास्त कडक शिक्षा म्हणजे आरोपीला खोल विहीरीजवळ, वा वेगवान नदीजवळ नेलं जातं. तिथे तो आरोपी पाण्याला उद्देशून म्हणतो की तुझा संबंध निष्कलंक देवांशी आहे. माझी रक्षा कर. मग ५ जण मिळून त्याला पाण्यात फेकतात. जर तो आरोपी गुन्हेगार नसेल तर तो बुडून मरत नाही. हयाही पेक्षा कठोर शिक्षा म्हणजे आरोपी आणि फिर्यादी, दोघांना गावातील मंदिरात पाठवतात. तिथे दोघे एक रात्र राहतात. दुसरे दिवशी देवळाचा पुजारी देवावर घातलेलं जल आरोपीवर जल टाकतो. जर आरोपी गुन्हेगार असेल तर त्याला रक्ताची वांती होते. या पुढची पायरी म्हणजे तेल आणि लोणी एकत्र गरम केलं जातं. त्यात एक पान टाकून ते कडकडीत तापलं आहे की नाही ते बघतात. मग त्यात एक सोन्याचं नाणं टाकून ते आरोपीला काढायला सांगतात. आरोपी निर्दोष असेल तर तो ते नाणं काढतो. आरोपीचा निर्दोशापणा सिद्ध करण्याचा कठोरतम उपाय म्हणजे लोखंडाचा तापलेला तुकडा त्याच्या हातावर ठेवतात. पंजा आणि लोखंडाचा तुकडा यामध्ये झाडाच्या पाणाशिवाय काहीही नसतं. मग त्याला ७ पावले चालायला सांगतात. एवढ्या शिक्षेनंतर तो दोषी की निर्दोषी हे सिद्ध होतं असा त्यांचा विश्वास आहे.

अलबेरूनी त्यानंतर कारभार-कायदे आणि त्याचा अंमल याकडे वळतात. त्यात म्हणतात की हिंदू आणि ख्रिश्चन यांची विचारसरणी सारखी आहे. तुमचा कोट कुणी चोरला तर त्याला दया दाखवत तुमचा शर्टसुद्धा द्या.

म्हणजे तुमच्या गालावर कुणी थप्पड मारली तर दुसरा गाल पुढे करा. शत्रूला माफ करा. तत्त्वज्ञान म्हणून हे महान असलं तरी राज्य करताना ते उपयोगी पडत नाही. राज्यकर्ते हे विद्वान तत्त्वज्ञानी नसतात. म्हणून ते फटके आणि शिक्षा करून राज्य करतात. या देशात ब्राह्मण हत्या, गोहत्या, मद्यपान, गुरु पत्नीशी व्यभिचार, हे मोठे गुन्हे मानले जातात. राजासुद्धा क्षत्रिय आणि ब्राह्मणाला मारत नाही. प्रायश्चित्त नियमात ब्राह्मणांनी जर इतर जातीतील कुणाची हत्या केली तर त्याला दंड, उपवास, दानधर्माची शिक्षा देऊन आर्थिकरित्या कमकुवत केलं जातं. त्याची संपत्ति जप्त केली जाते. चोरीच्या शिक्षा वेगळ्या असतात. साध्या चोरीला त्याला पकडून त्याची टिंगल करणे वगैरेवर भागतं, पण मोठी चोरी असेल तर चोराला आंधळं केलं जातं, त्याचे हात पाय तोडले जातात. व्यभिचारी स्त्रीला घरातून हाकलून लावतात. मी पाहिलं आहे की दास म्हणून पकडले गेलेले हिंदू, मुस्लिम देशातून जेव्हा सुटका करून पळून परत येतात, तेव्हा त्यांना शेण, गोमूत्र, दूध आणि पाणी यात बुडवून ठेवून मग समाजात परत घेतलं जातं. पण अधिक चौकशी करताना हे खोटं आहे असंच त्यांना कळलं.

हिंदू परंपरेत कन्येला हुंड्याच्या रूपाने बापाच्या संपत्तीतील वाटा मिळतो पण स्थावर जंगमातील संपत्तीतील वाटा मिळत नाही. विधवा पत्नीला, ती सती न गेल्यास तिच्या पोषणाची व्यवस्था मृत पतीच्या उत्तराधिकाऱ्याकडून केली जाते, तसंच मृताचं कर्ज त्यानेच फेडायचं असतं. वारस नसलेल्याची संपत्ती राजा जप्त करतो. एक वर्षभर पुत्र आपल्या पित्याच्या मरणाचे सूतक दिवस पळतो, सण करत नाही. मात्र अन्नदान करतो, आणि रोज रात्री

आत्म्यासाठी आपल्या अंगणात एका ताटात जेवण ठेवतो. मृताचा भुकेजलेला आत्मा जेवतो यावर त्यांचा विश्वास आहे. आपल्या फेडो ग्रंथात प्लूटोनेही ही श्रद्धा दाखवली आहे. आपल्या शरीराच्या उरलेल्या प्रेमपायी आपल्या कबरीभोवती मृताचा आत्मा भटकत असतो आणि दुसऱ्या जगात जाण्यासाठी पूर्वीच्या एकेका अवयवाचा त्याग करत जातो. सुरूवातीला प्रेतं शेतात टाकली जायची. उघड्यावर पडलेली ही प्रेतं मग पारशी लोकांप्रमाणे इमारतीच्या गच्चीवर वाऱ्यावर ठेवायला लागले. पण मग नारायणाने दिलेल्या आज्ञेनुसार लोक मृत शरीर जाळायला लागले. हिंदूंना आत्महत्या करण्याचा अधिकार धर्माने दिलेला नाही. फक्त सती जाणारी स्त्री, रोगाने जर्जर पीडित हे करू शकतो. ब्राह्मण क्षत्रिय पुरुष, आयुष्य संपवायचं असेल तर एखाद्या माणसाला पैसे देऊन बरोबर घेतो आणि नदीत मरेपर्यंत बुडवायला सांगतो. मग अलबेरूनी गंगेच्या काठच्या वटवृक्षाची माहिती देतात. गंगा-यमुनेच्या संगमावर प्रयागला एक अतिविशाल वृक्ष आहे. या वृक्षाच्या काही शाखा खाली आणि काही वरच्या बाजूला जातात. खाली जमिनीकडे जाणाऱ्या मुळांना पाने नसतात. ती वृक्षाचा आधार बनतात. ज्यांना आत्महत्या करायची आहे ते या वृक्षावर चढून नदीत उडी मारून आयुष्य संपवतात. हिंदू लोक अंत्यसंस्कार झालेल्या प्रेताच्या अस्थि गंगेत विसर्जित करतात. भागीरथाने मुक्ति दिली तशी मुक्ति मृताला मिळेल असं ते मानतात. शेवटी अलबेरुनी सॉक्रेटिस याचं वचन लिहितात. तो म्हणाला होता की परमेश्वराने दारूण दु:ख दिल्याशिवाय आत्महत्या करू नये, कारण आपण त्याच्या पिंजऱ्यातील कैदी आहोत. त्याचे गुलाम असल्यामुळे त्याचं आपल्यावर लक्ष आहे.

अलबेरुनी मग हिंदू लोकांची उपवास करण्याची पद्धत, कारण, प्रकार सांगतात. एखाद्या देवतेच्या नावाने ते उपवास करतात म्हणजे त्यादिवशी काहीही खात नाहीत. या उपवासात अनेक प्रकार आहेत, पहिलं एकनक्त ज्यात दिवसभर काहीही न खाता फक्त संध्याकाळी जेवायचं. दुसरं कृच्छ, तिसरा प्रकार फराक ज्यात 3 दिवस दुपारी, पुढचे तीन दिवस संध्याकाळी आणि नंतरचे तीन दिवस पूर्ण लंघन करून उपवास असतो, चंद्रयान पद्धतीत पौर्णिमा ते पौर्णिमा उपवास करतात, आणखी एक प्रकार म्हणजे मासोपवास, ज्यात संपूर्ण महिनाभर उपवास करतात. प्रत्येक मासातील संपूर्ण उपावसाचं मरणोत्तर आयुष्यात फळ मिळतं. त्यात चैत्रमासातील उपवासाचं फळ धन आणि मुलांचा उत्कर्ष, वैशाख- समुदायाचा प्रमुख आणि सैन्याचा प्रमुख, ज्येष्ठ- स्त्रियांचा लाडका, आषाढ-दौलत, श्रावण- विद्वत्ता, भाद्रपद- संपत्ति, शौर्य, पशुधन, अश्विन- शत्रूवर सतत विजय, कार्तिक-लोकांच्या नजरेत महान आणि सर्व कामनापूर्ती, मार्गशीर्ष- संपन्न देशात जन्म, पौष- दिगंत कीर्ती, माघ- नवकोट नारायण, फाल्गुन-सर्वप्रिय. अशी फलप्राप्ती होते. .

मग अलबेरूनी गोवर्धन पर्वताची त्यांनी ऐकलेली कथा सांगतात. ती अशी की एकादशीला, ११ व्या दिवशी कृष्णाने मथुरा जिंकली. तेव्हा त्या नगरीतले लोकांना तो दिवस आनंदाचा म्हणून आपल्या नावाने करायला सांगितला. त्या आधी ते नगरवासी इंद्राची भक्ति आणि उपवास करत असत. कृष्णाच्या या अरेरावीने इंद्र मथुरावासीयांवर संतापला. त्याने मथुरेवर जोरात मुसळधार पाऊस सुरू केला. त्यात गावातील गुरं, लोक वाहून जायला लागले,

तेव्हा कृष्णाने आपल्या बोटांवर मथुरेजवळचा गोवर्धन पर्वत उचलला. त्या पर्वताखाली लोकांनी आसरा घेतला. त्यात इंद्राची प्रतिमा वाहून गेली आणि मथुरा वाचली म्हणून हिंदू लोक एकादशीचा उपवास करतात. अलबेरूनी यांनी किती तरी उपवास, त्याचे महिने, त्याची विशेषता दिली आहे.

त्यानंतर ते यात्रा आणि सण हा विषय सांगतात. त्यात पहिलं वाक्य लिहितात की सर्व भारतीय आणि उपवास इथे हिंदू स्त्रियाच साजरा करतात. मग भारतभरच्या यात्रांचं आणि सणांचं वर्णन करतात. यात चैत्री द्वितीयेचा काश्मिरी लोकांचा मुत्तई राजाने तुर्कांवर मिळवलेल्या विजयाचा सण, चैत्रातील ११ व्या दिवशी बाळकृष्णाचा जन्म, पाळणा हा कृष्ण मंदिरात साजरा होणारा चैत्री हिंडोल सण, छत्री पौर्णिमा, वैशाखातील गौरी तृतीया, ज्येष्ठ प्रतिपदेला सर्व फळांच्या बिया नदीत टाकण्याचा सण, मग ज्येष्ठी पौर्णिमा, श्रावणातील सण, भाद्रपदातील हरतालिका, ( यात हरतालिका सण आहे, पण गणेशोत्सव नाही ) पितरांचे दिवस, अश्विनातील अशोक वृक्षाचा सण, दिवाळी, असे सगळे सण सांगतात. यातील अनेक सण आता त्या त्या देशातून, समाजातून नष्ट झाले आहेत, काही शिल्लक आहेत. शिवाय मुलतानपासून दक्षिण भारतापर्यंतचे सारे सण यात आहेत.

यानंतर अलबेरूनी ज्योतिष, जन्मपत्रिका, त्यातील परिभाषा, यावर ओळीने ३ प्रकरणे लिहितात. ती सर्व त्यांच्या देशबांधवासाठी लिहिलेली आहेत. करण -४ स्थावर करण, ७ जंगम करण, मुक्तिची व्याख्या. योग – योगाचे २७ प्रकार, अशुभ योग. यांची माहिती देतात. आपल्या शेवटच्या प्रकरणात

फलज्योतिषावर माहिती त्यांनी त्यांच्या ज्योतिषांच्या माहितीसाठी विशद केली आहे. यात ग्रह, फल, ग्रहांची दृष्टी, वक्रता, भिन्नता, प्रभाव, अति उंचीवरील धूमकेतू, माध्यम उंचीवरील धूमकेतू, उल्का, ही फलज्योतिषातील परिभाषा मांडली आहे. फलज्योतिषाचा विस्तृत विचार त्यांनी यात मांडला आहे. सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, शुक्र, शनी, या शुभ ग्रह, अशुभ ग्रहांची माहिती दिली आहे. मग राशींची नावं, त्यांचा स्वामी हे लिहिले आहेत. जन्मपत्रिकेतील १२ स्थानं, प्रत्येक घरातील स्थानांची परिभाषा, दृष्टी, बल, अंश, धूमकेतू, उल्का, या सर्वांची शास्त्रीय व्याख्या, यांची माहिती दिली आहे. अलबेरूनींची भारताची माहिती यानंतर संपते. शेवटी ते लिहितात,

“ ज्यांना हिंदूंशी त्यांच्या धर्म, विज्ञान, आचार विचार साहित्य यावर चर्चा करायची असेल, त्यांच्यासाठी ही ओळख पुरेशी आहे. आधीच या लांबलचक मजकूराने सर्वांना दमवून टाकलं असेल. यातील चुकीच्या मजकुराबद्दल परमेश्वराने आम्हाला माफ करावं. गहू चाळून भुसा वेगळा करावा तसं आमचं अज्ञान दूर करण्यासाठी मार्गदर्शन त्याने करावं. सर्व मंगल करणारा तोच आहे, आपल्या दासांवर कृपा करणारा तोच आहे. तिन्ही लोकीच्या परमेश्वराने सुलतान महंमद आणि त्याच्या परिवाराला सुखात ठेवावं. तो परमेश्वर धन्य आहे. ‘’

या ग्रंथात अलबेरुनी यांनी विज्ञान – धर्म संस्थापक – ऋषी या ज्या विद्वत जनांचा उल्लेख केला आहे, त्यात एक आहेत सर्वात प्राचीन असलेले ज्योतिष विद्येतील अग्रणी **पराशर**. भूगोल आणि समकालीन ग्रीक अभ्यासाची

त्यांना ओळख होती. भारताच्या भूगोलावर त्यांनी माहिती लिहिली. त्यानंतर आहेत **गर्ग.** या ग्रंथकारामुळे इसवीसनाच्या दुसऱ्या शतकाचा बोध झाला. ग्रीकांचा ज्योतिषाचा अभ्यास हिंदूंच्यापेक्षा जास्त होता हे त्यांनी लिहून ठेवलं आहे. त्यांनीच द्वापारयुगाची समाप्ती कौरव-पांडव महायुद्धानंतर होऊन कलियुगाला सुरुवात झाली हे सांगितलं. बौद्ध काळात निर्माण झालेला त्यांचा सूर्य सिद्धान्त आणि पंचसिद्धांत ग्रंथ अतुलनीय आहेत.

सन ४७६ मध्ये पाटलीपुत्रात जन्मलेले **आर्यभट्ट** हे भारतीय ज्योतिषशास्त्राचे पहिले संस्थापक मानले जातात. तेच या विषयावर लिहिणारे पहिले भारतीय ग्रंथकार. गणितावरही त्यांनी अनेक पुस्तकं लिहिली. आपल्या गोलपाद ग्रंथात त्यांनी १२ राशींची नावे दिली आहेत. सूर्य-चंद्र ग्रहणे कशी होतात ते त्यांनी भारतीयांना सांगितलं. त्यांनीच पृथ्वीच्या फिरण्यामुळे आकाशातील तारे पूर्वेकडून पश्चिमेकडे जातांना दिसतात हे मत मांडलं. त्यांचा मृत्यू ५८७ सालामध्ये झाला. अवंतीचे प्रसिद्ध ज्योतिषी आदिदास यांचे पुत्र **वराहमीहिर,** यांचा जन्म सन ५०५ मध्ये झाला. हे आर्यभट्ट यांचे शिष्य मानले जातात. त्यांचे प्रसिद्ध सिद्धान्त म्हणजे, ब्रह्मसिद्धान्त, सौरसिद्धांत, विशिष्टरोमक आणि पुलिशसिद्धांत. त्यांच्या बृहतवराही संहितेत त्यांनी सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वी, वीज, भूकंप, वायु, इंद्रधनुष्य, शकुनविवाह-राशीचक्र, यावर विस्ताराने भाष्य केलं आहे. विक्रमादित्याच्या दरबारात नवरत्नांमध्ये ते होते. तेही ५८७ मधेच आर्यभट्ट निवर्तले. वराहमीहिर यांच्या बृहत-संहिता, बृहत्जातकम, लघुजातकम, पंचसिद्धांतिका, होरान्विशोत्तरी या ग्रंथांचा अभ्यास अलबेरूनींनी

केला होता. त्याच शतकाच्या अखेरीला सन ५९८ मध्ये **ब्रह्मगुप्त** या शास्त्रज्ञाचा जन्म झाला. वयाच्या ३० व्या वर्षापर्यंतच त्यांनी अनेक पुस्तकं लिहिली होती. यांनी लिहिलेलं ब्रहमसिद्धांत अतिशय गाजलं होतं. सन ११३४ मध्ये जन्मलेले आणि विख्यात झालेले गणितज्ञ म्हणजे **भास्कराचार्य**. यांचा "सिद्धान्तशिरोमणी" लेखसंग्रह. यांनीच भूमिती, बीजगणित आणि अंकगणिताला उंच स्थानावर नेऊन ठेवलं. त्यांनी जी गणितं सोडवली ती त्यानंतर ५ / ६ शे वर्षे युरोपियन पंडित सोडवू शकले नव्हते.

सबंध पुस्तकातील गणित, संस्कृत, गीता-पुराणे, फलज्योतिष, आणि खगोलशास्त्राचा व्यासंग असलेले प्रज्ञावंत लोकमान्य टिळक महाराष्ट्रात होऊन गेले. प्राचीन खगोलशास्त्र, गणित, पंचांग, वेद-पुराणे, संस्कृत भाषा, या प्रज्ञेचे भारतीयांना भारताची ओळख करून देणे हे अत्यंत थोर उपकार आहेत अलबेरुनी यांचे.

ह्युएन त्संग आणि अलबेरुनी यांची ज्ञानाची ओढ भिन्न होती. ह्युएन त्संग केवळ बौद्ध धर्माच्या अभ्यासाच्या ओढीने भारतात पोचले आणि अलबेरूनी भारत भेटीत गोवले गेले, पण दोघांनीही विज्ञान-ज्ञान आणि कुतूहलच्या पोटी भारताचं लोकजीवन, सजगपणे पहिलं आणि लिहून ठेवलं. त्यामुळे भारताच्या प्राचीन काळापासून इ. स. ६०० च्या काळातील भारत आणि १००० सालातील भारताची ओळख झाली. आपल्या वेगवेगळ्या विष्णुपुराण, आदित्यपुराण मत्स्यपुराणांची माहिती कळत गेली. सर्व वैज्ञानिकांची गणित तज्ञांची माहिती मिळाली. दोघांच्यातील एक साम्य म्हणजे

त्यांनी दोघांनी संगीत या कलाविष्कारकडे पाहिलं नाही. त्याची नोंदही केली नाही. माळवा पाहिला, पण बाणभट्ट, भास, भवभूतींच्या, साहित्याचा उल्लेख त्यात आला नाही. फक्त कालिदासाचा एकेठिकाणी उल्लेख आहे.

बुद्धं शरणं गच्छामी, ज्ञानाला शरण जा असा संदेश जगाला देणाऱ्या तथागतांचेच हयुएन त्संग आणि अलबेरुनी हे सुपुत्र...


**संदर्भ ग्रंथ** –


**अल बेरूनीका भारत.-अनुवादक-रजनीकांत शर्मा..मूळ लेखक अलबेरूनी.**

**Alberuni's India – by Sachau Edward.**

==========================================


**ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली डॉ. स्मिता दामले यांची इतर 13 पुस्तके**


















इतिहासाची
विलग
पाने
डॉ. स्मिता दामले


डॉ. स्मिता दामले
कावेरीचा
दुभंग



डॉ. स्मिता दामले
एका
ओथमनचा
अंत


डॉ. स्मिता दामले
कलाटणी


डॉ. स्मिता दामले
असं
घडलं
होतं


डॉ. स्मिता दामले
सल्तनत-ए-दिल्ली


डॉ. स्मिता दामले
रक्षा


मनसोक्त
डॉ. स्मिता दामले


डॉ. स्मिता दामले
सूर्यपुत्र
लोकमान्य

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १७ वे वर्ष.**

**डॉ. स्मिता दामले यांचे हे चौदावे पुस्तक.**

डॉ. स्मिता दामले या मध्ययुगीन इतिहासावरील सुप्रसिद्ध विद्वान आहेत. त्यांची मध्ययुगीन इतिहासावर डॉक्ट्रेट झालेली आहे. त्या जरी अमेरिकेत रहात असल्या तरी सातत्याने भारतीय इतिहासाच अभ्यास व लेख त्या करत असतात. आजवर इतिहासात फ़ारशा न चर्चिल्या गेलेल्या भागांवर त्या लिहितात. हल्लीच्या गुगल पंडितांच्या काळात असे मूळ बखरी व दस्त वापरून इतिहास अभ्यासणारे विरळाच. त्याचबरोबर त्यांची इतिहासलेखनाची एक ओघवती शैली आहे. त्यामुळे त्यांचे इतिहासावरचे पुस्तक अत्यंत वाचनीय असते. त्यांची अनेक पुस्तके वाचकांनी अभ्यासली आहेत.

डॉ. दामले यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१४), डॉ. नितीन मोरे (५६पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत

पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), डॉ. वृषाली जोशी (५३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१३), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२६), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (७), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे, सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(२), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन

यादव(२), दिगंबर सलगर(३), कैलास बडगुजर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।